# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# परिवर्तनाचे आणि विकासाचे समाजशास्त्र

**(Sociology of Change and Development)**

**(समाजशास्त्र : SOE-12)**

**एम. ए. भाग–१ : सत्र–२**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१४
**द्वितीय आवृत्ती :** २०१५
**सुधारित तिसरी आवृत्ती :** २०१९
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २००**

■

**प्रकाशक**
**डॉ. डी. व्ही. मुळे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-548-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **सल्लागार समिति** ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ **समाजशास्त्र समन्वय समिती** ■

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
  सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■**

प्रभारी अध्यक्ष - **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शिवाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली
- **डॉ. महेंद्रकुमार जाधव**
  नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

# प्रस्तावना

दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनींचे आम्ही हार्दिक स्वागत करीत आहोत. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे सत्रपद्धतीनुसार एकूण आठ पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी एक पेपर **परिवर्तनाचे आणि विकासाचे समाजशास्त्र** SOE-12 असा आहे. या पेपरमध्ये एकूण चार अध्ययन घटक समाविष्ट केलेले आहेत. त्याचे लेखन हे अत्यंत चांगल्या व उत्कृष्ठ पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे तुम्हा सर्व विद्यार्थ्यांना **परिवर्तनाचे आणि विकासाचे समाजशास्त्र** या पेपरचे यथार्थ आकलन होईल याची आम्हाला खात्री आहे.

प्रमुख संपादक या नात्याने आम्ही सर्वप्रथम सन्माननीय कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे, तसेच अभ्यासमंडळाचे प्रभारी अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे, तसेच सर्व सदस्य आणि सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक प्रा. डी. श्रीकांत, प्रा. महेंद्रकुमार जाधव या सर्वांचे आम्ही सुरुवातीलाच आभार मानतो. तसेच दूर शिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. बालाजी केंद्रे**
समाजशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अरुण पौडमल**
यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज,
कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. डी. श्रीकांत**<br>समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. बालाजी केंद्रे**<br>समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई | २, ४ |
| **डॉ. महेंद्रकुमार आनंदराव जाधव**<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. अरुण पौडमल**<br>के. एम. सी. कॉलेज, कोल्हापूर | ४ |

■ संपादक ■

**डॉ. बालाजी केंद्रे**
समाजशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अरुण पौडमल**
यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज,
कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व प्रकार | १ |
| २. | सामाजिक परिवर्तनाचे घटक | १७ |
| ३. | समकालीन भारतातील सामाजिक परिवर्तन | ४१ |
| ४. | विकासाचे मार्ग | ६३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व प्रकार

(Meaning, theories and factors of Social Change)

**घटक संरचना :**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ विषय सादरीकरण/मांडणी

१.३.१ सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व स्वरूप

१.३.२ सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत

१.३.३ सामाजिक परिवर्तनाचे घटक

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठीचे प्रश्न

१.७ चिंतन आणि कृती

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ उद्दीष्टये (Objective)

सदर पाठाची उद्दीष्टये यातुन आपणास खालील गोष्टी कळण्यास मदत होईल.

- काही समाजशास्त्रज्ञानी दिलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्यानुसार सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व स्वरूप समजावून घेता येईल.
- उत्क्रांती, प्रगती व सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया समजावून घेता येईल.
- सामाजिक परिवर्तनाची उगमस्थाने समाजावून घेता येईल.

## १.२ प्रस्तावना (Introduction)

एखाद्या गोष्टीतील परिवर्तन ही संकल्पना ही सत्यातील परिवर्तन, रंगातील परिवर्तन, संरचना किंवा रचनेतील परिवर्तन परिवर्तन तापमानातील परिवर्तन इ. गोष्टीतून परिवर्तनाची जाणीव मानवात निर्माण होते आणि मानवाच्या जागरूकतेचा भाग बनते. या परिवर्तनाच्या पार्श्वभुमीवर एखादा माणुस खरच जागरूक बनतो का हा चर्चेचा वा वादाचा विषय होवू शकेल. पण भौतीक किंवा सामाजिक जगात हे परिवर्तन घडते ही वस्तुस्थिती आहे.

परिवर्तन घडतच नाही असे म्हणणाऱ्या व्यक्तीसाठी ते त्याचे वैयक्तीक मत ठरेल. पण वस्तुस्थिती अशी की, परिवर्तन ही अटळ अशी गोष्ट आहे. अवकाश व वेळ या संदर्भातील परिवर्तन हा चटकन कळू शकतो कारण या गोष्टी सहज अनुभवता येतात जेव्हा तात्कालीक जगात परिवर्तन हे महत्वाचे वैशिष्टय आहे असे म्हणतात याचा अर्थ तेथे अतीशय महत्वाचे भौतीक पर्यावरणविषयक किंवा सामाजीक परिवर्तन घडत असतात. समाजाच्या सामाजिक पद्धतीतील बदलावर आपले लक्ष केंद्रीत केल्यावर बदलत्या परिस्थितीला कसे व का प्रतीसाद मिळतात ही गोष्ट महत्वाची ठरते. एक गोष्ट मात्र स्पष्ट होते की सर्वच समाजात परिवर्तन हे एकतर कमी किंवा जास्त वेगात होत असतात. समाजकल्याणासाठी ज्ञानाच्या नव्या शाखातील संशोधन समजावून घेताना वा करताना हा घटक महत्वाचा ठरतो.

सामाजीक पद्धतीत परिवर्तन का घडते वा घडवले जाते हे शोधताना सामाजिक पद्धतीत काय चुकते आहे या प्रश्नाचा उगम होतो. या प्रश्नामुळे कोणत्याही सजग माणसाला सामाजिक परिवर्तनाच्या समस्येबद्दल चिंतन करणे वा त्यास प्रतिसाद देणे आवश्यक ठरते सर्व समाजशास्त्रज्ञानी सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासात रूची दाखविलेली आहे. ऑगस्ट कॉम्त पासून ते तात्कालीक समाजशास्त्रज्ञ टॉलकट पार्सन, ॲण्टनी गीडस, एम. एन. श्रीनिवास, ए. आ. देसाई, डी. पी. मुखर्जी, बी. आर. आंबेडकर या सर्वांनीच ऑगस्ट कॉम्त प्रणित सामाजिक स्थिरता आणि सामाजिक बदल या समाजशास्त्रातील मुख्यविषयावर आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

सामाजिक गतीमानतेत आपणास सामाजिक परिवर्तन ही संज्ञा सापडते सामाजिक परिवर्तनाच्या समाजशास्त्रीय अर्था पेक्षा सामान्य माणसाला अभिप्रेत असणारा अर्थ वेगळा आहे. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजव्यवस्थेतील प्रस्थापीत घटकातील परिवर्तन किंवा सामाजीक मुल्ये व नियमातील परिवर्तन किंवा समाजाच्या संरचनेतील परिवर्तन किंवा उपसंरचनेतील परिवर्तन की जे समाजातील गहांच्या सभासदाच्या गरजांशी संबंधीत असतात.

## १.३ विषयाचे सादरीकरण (Presentation of Sabject Matter)

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रथमतः आपणास प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञानी केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या काही व्याख्या अभ्यासणे महत्वाचे ठरते. यामध्ये उत्क्रांती आणि प्रगतीचा सामाजिक बदलाच्या प्रक्रियेशी संबंध तपासणे उचित ठरते. या प्रक्रियांच्या वैशिष्ट्यांच्या अभ्यासामुळे आपणास सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप करण्यास मदत होते.

### १.३.१ सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व स्वरूप(Meaning and Nature of Social change)–

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ समजावून घेताना मान्यवर समाजशास्त्रज्ञानी केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या निरनिराळ्या व्याख्या अभ्यासने महत्वाचे आहे. त्या खालील प्रमाणे आहेत.

**१) हॅरी जॉन्सन–**

''मूलभूत अर्थाने, सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल होय''.

(Harry Johnson- "In its basic sense, Social Change means Change in Social Structure").

**२) मॅक ऑयव्हर आणि पेज–**''सामाजिक संबंधातील बदलासच सामाजिक परिवर्तन म्हणतात''.

(MacIver & Page – "It is the change in social relationships which alone we shall regard as a social change").

**३) हॉर्टन आणि हंट–** ''सामाजिक संरचनेतील आणि सामाजिक संबधातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय''.

(Horton and Hunt – "Social Change Change in the Social Structure and Social relationships").

**४) टिशलेर, व्हायटन आणि हंटर–**

''समाजाच्या सामाजिक संघटनात, दर्जे, संस्था आणि सामाजिक संरचनेत घडून येणाऱ्या बदलाचा सामाजिक परिवर्तनात समावेश होतो''.

(Tishler, Whitten and Hunter – " Social Change Consists of alterations in Societys Social organization, Statuses, institutions and Social Structure").

**५) मॉरिस सिन्सबर्ग–**

''अभिवृत्ती आणि श्रद्धा यांच्यात होणाऱ्या बदलांचाही सामाजिक परिवर्तन या संज्ञेत समावेश केला जाणे आवश्यक आहे. कारण या घटकामुळेच सामाजिक संस्था टिकून राहतात आणि त्यांच्या बरोबरच त्या बदलतात''

(Morris Ginsberg – "Term Social Change must also include Changes in attitudes and beliefs in so far as they sustain institutions and change with them").

**६) गिलीन आणि गिलीन–**

''**समाजमान्य जीवन पद्धतीतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय**''.

(Gillin and Gillin – "Social Changes are variations From the accepted modes of life").

**७) किंग्जले डेव्हीस–**

''**सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संघटनात अर्थात समाज संरचना व कार्यात झालेला बदल होय**''.

(Kingsley Devis – "By Social Change, we mean only Such alteration as occur in social organization that is structure and function of Society").

वरील सर्व व्याख्या – समाजाच्या मुख्य घटकावर प्रकाश टाकतात की ज्यात सामाजिक परिवर्तन आढळते. यावरून आता आपण सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व स्वरूप सविस्तर समजावून घेऊ या.

★ मुलतः सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संबंधाच्या संरचनेतील बदल होय. यात प्रस्थापीत व मानले गेलेले नियम व मुल्ये यांचा समावेश होतो.

★ सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक दर्जा व भुमिका यातील बदल.

★ सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल.

★ सामाजिक परिवर्तन म्हणजे समाज संघटनातील बदल.

★ सामाजिक परिवर्तन म्हणजे समाज संस्थेतील बदल.

★ सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संस्थांच्या कार्यातील बदल.

★ समाजाच्या उपव्यवस्थेमधील परिवर्तन म्हणजे सामाजिक दृष्टीकोन व मुल्यांतील बदल.

यावरून सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक मुल्ये, संस्था, वितरणव्यवस्थेचे नियम व नियमणे आणि मोबदला, सामाजिक संस्था व मुल्यांतील हे सर्व बदल ठराविक मुल्ये उच्च वा हीन, एकता वा विविधता, या संस्था ताठर वा लवचिक, ठराविक बाजूच्या वा विरोधातील अशी स्पष्टता व्यक्त करत नाहीत. म्हणून सामाजिक बदलाची प्रक्रिया ही प्रबळ अशा सामाजिक परिस्थितीशी निगडीत असते.

## सामाजिक नियम व मूल्यातील बदल–

व्यक्तीचे वागणे व सामाजिक संबंध हे सामाजिक नियम व मुल्ये यावरून मोजता व पडताळता येतात. हे नियम व मुल्ये पवित्र–अपवित्र, नैतिकता–अनैतिकता, शुद्ध–अशुद्ध अशा तत्वांवर आधारलेली असतात. नैतिक मुल्यांची कल्पना वर्गानुसार, गटानुसार व समूहानुसार वेगवेगळी असते. जातीव्यवस्थेवर आधारीत समाजातील उच्च मुल्ये एकजिनशी समाजाला लागू होतीलच असे नाही. दुसऱ्या शब्दात सांगताना भारतीय समाजातील जातीव्यवस्था विविधतेच्या तत्वावर आधारलेली आहे, तर लोकशाही समाजील वर्गव्यवस्था एकतेच्या तत्वावर आधारलेली असते. मुल्ये बदलली की व्यक्तीगत वागणुकीत बदल होतो. उदा–जुन्या सरंजाम समाज व्यवस्थेतील जमिनदारांना असणारा उच्च दर्जा बदलंत्या परिस्थितीत म्हणजेच लोकशाही समाजव्यवस्थेत इतरांबरोबर असेल कारण लोकशाहीत सर्वांना समान कायदा व दर्जा असतो सरंजामशाही समाज व्यवस्थेतील सामाजिक वारसा हा लोकशाही समाजव्यवस्थेत निकामी ठरेल. असे बदल त्या त्या समाजव्यवस्थेच्या प्रकारावर अवलंबून असतात. तसेच त्यांत सामाजीक बदल असतात.

## संस्थात्मक बदल ही सुद्धा सामाजीक परिवर्तनाची प्रक्रीया आहे.–

विवाहव्यवस्था, किंवा कुंटुंबव्यवस्थेतील बदल यामुळेही समाज परिवर्तन होत असते. उदा–आंतरजातीय विवाह किंवा एकत्र कुंटुंबांचे विभक्त होणे हे सुद्धा सामाजिक परिवर्तन होय कारण यात नविन मुल्ये, धारणा यांची स्विकृती होते. त्यात समता, संधी व स्वातंत्र्य यांची समानता असते.

## अर्थव्यवस्थेतील परिवर्तन–

मुख्यतः सरंजामशाही अर्थव्यवस्थेकडून भांडवलशाही अर्थव्यवस्था किंवा सामाजिक अर्थव्यवस्था असे बदल घडताना मालकी हक्क, वाटणीची पद्धत व नियम यात बदल घडतात. जुन्या नियमाप्रमाणे जन्महक्काने व वारसाहक्काने येणाऱ्या मालमत्तेची वाटणी ही श्रमाचे मानधन व गुणवत्ता या नियमाने होईल. समाजवादी समाजरचनेत मालकी हक्कच निकालात निघाल्याने वर्गव्यवस्था संपुष्टात येते.

## धर्मव्यवस्थेतील परिवर्तन–

धर्मव्यवस्थेतील बदलांमुळे दर्जा व वागणुकीचे नियम यावर परिणाम होतो. त्यामुळे आपण लक्षात घेतले पाहीजे की उच्च किंवा कमी दर्जाच्या हिंदूचे दुसऱ्या धर्मात, नव्या दर्जात व भुमिकांत परिवर्तन होते. हा रचनात्मक बदल म्हणजेच सामाजिक परिवर्तन होय. यावरून सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप समजणे सोपे आहे.

## सामाजिक परिवर्तन हा सार्वत्रिक स्वरूपाचा आहे–

मानवी समाज हा निसर्गाचा एक भाग असल्यामुळे समाजात बदल होत असतो म्हणून कोणताही समाज

अपरिवर्तनीय नसतो सामाजिक परिवर्तन चा सविस्तर अर्थ समजावून घेतल्या नंतर आपण आता सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप समाजवून घेणार आहोत. त्यात शिथिलता येवू शकते पण पुर्णतः ठप्प पणा नसतो महान तत्वज्ञ, विचारवंत व विध्दानांच्या मते 'बदल हा निसर्गाचा नियम आहे' हा बदल गतीमान किंवा संथ असू शकतो. समाजाच्या एका भागाशी वा एकाच समाजाशी तो संबंधीत नसतो, तर सर्वच समाज हे बदलाशी संबंधीत असतात. म्हणून परिवर्तन हे सार्वत्रिक असते. जगातील सर्व मानवी समाज हे समाजाच्या गरजा भागविणाऱ्या अर्थव्यवस्थेशी जोडलेले  असतात.

वाणिज्य व व्यापारातून चांगल्या बदलाची बीजे जगातील सर्वच देशातील समाजात रूजलेली आहेत. त्याबरोबर काही मुक्त व लपलेली राजकीय ध्येयेही असतात.

**सामाजिक परिवर्तन ही संकीर्ण आणि बहुविध कारणांची घटना आहे–**

सामाजिक घटना ही कार्य किंवा संघर्षाच्या दृष्टीने पाहिल्यात अंतर्गत परस्पर संबंधाने जोडलेला असतो. बदलामुळे एका भागातून दुसऱ्या भागाकडे रचनेत व आकारात बदल घडतो. त्यातील अंतर्गत संबंध व उदासीनता हा सुद्धा सामाजिक बदलाची अंगे असतात. म्हणून तार्कीकतेने सामाजीक बदलाची प्रक्रिया ही गुंतागुंतीची जागतिकघटना आहे. या व्यतीरीक्त इतर कारणांनी सामाजीक बदल घडूशकत नाही. सामाजिक बदलासाठी वेगवेगळ्या कारणाची आवश्यकता असते. बदलाच्या प्रक्रियेत सर्वच घटकांवर पुर्णतः नियंत्रण ठेवणे अशक्य असते. भूक किंवा अस्वस्थता हे बदलाचे एकमेव कारण नसते. सत्तेचे एका किंवा ठराविक ठिकाणचे केंद्रीकरण ही अस्वस्थतेचे कारण असू शकते. दोन विचारांमधील संघर्षही बदलाचे कारण असू शकते बदलाचे तंतोतंतपणे पूर्वकथन करता येणे अशक्य आहे.

**सामाजिक बदल म्हणजे मुलतः संरचनात्मक व कार्यात्मक बदल होय**

समाजशास्त्रीय दृष्टीने सामाजीक बदल हा संरचना व कार्यातील बदल होय. व्यक्तीच्या वैयक्तीक आयुष्य किंवा स्थितीत त्यामुळे बदल होईलच असे नाही. उदा– सरंजामशाही समाजात एकावेट बिगाराकडे जमीनीचे मालकीपणा आले की सर्वच वेटबिगारांच्या दर्जामध्ये परिवर्तन होते असे नाही. म्हणून जमीनीच्या हस्तातंरणामुळे वैयक्तीक व्यक्तीच्या जीवनात बदल घडत नाही. एखाद्या व्यक्तीतील बदलाने त्यांच्या गटाची किंवा जातीचा दर्जा बदलत नाही. सामाजीक बदल हा दर्जा, रचना व भुमिकेशी निगडीत घडतो. म्हणजेच चेतक घटक बदलला की सामाजीक बदल असतो. उदा–बलुतेदारी पद्धतीतील आपली पिढीजात कामे सोडण्याने जातीतील लोकात झालेला बदल आधुनिक अर्थव्यवस्थेमुळे परंपरागत कामांमध्येही बदल घडून येतात. त्यालाच भारतीय समाजातील बदलाचा घटना अविष्कार म्हणता येईल.

**सामाजिक परिवर्तन हे सर्वसाधारपणे नियोजन असते.**

सामाजिक बदल हा नियोजीत असतो असे मानले जाते. कारण बदल हा अडथळ्यांवर मात करण्यासाठी असतो असे मानतात. त्यामुळे बदलास अनुकूल परिस्थिती, रचना वा पार्श्वभुमी तयार केली जाते. अपेक्षीत बदल घडविण्यासाठी सातत्यपुर्ण प्रयत्न केले जातात. पण काहीवेळा नियोजना शिवाय ही सामाजिक बदल घडतात. उदा– राष्ट्रीय आपत्तीवेळी जुन्या पद्धती किंवा जीवनाच्या सवयी टिकत नाहीत, असा बदल अनियोजीत  असतो.

## सामाजिक परिवर्तन कालसंबंध असते

सामाजिक परिवर्तन विशिष्ठ कालखंडानंतर घडते. यातील कालखंडाचा विचार बदलाच्या प्रक्रियेशी संबंधीत असतो. काही बदलासाठी लागणारा कालावधी पुढच्या बदलासाठी तोच असेल असे नाही. सामाजिक परिवर्तन सामाजिक स्थिती कशी होते याच्याशी संबंधीत असतो. याती कालसंबंध बदलाची व्याप्ती ठरवतो वेगवेगळ्या काळातील तांत्रीक शोध, नवे विचार यामुळे बदल घडतात पण ते त्या त्या कालखंडाशी संबंधीत असतात. काही जागतीक घटनांचा त्या युगावर परिणाम होतो. उदा-आधुनिक युगांवर औद्योगीक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, विज्ञान व तंत्रज्ञानाचा उदय, संगणक यांचा प्रभाव आहे. मध्ययुगाला काळे युग म्हणतात कारण राजेशाहीच्या व धर्मशाहीचा कडक व क्रुर नियमांचा फटका स्त्रिया व कामगार वर्गास मोठ्या प्रमाणात बसला. त्यामुळे राज्यकर्त्यांना देवदवाची उपमा दिली गेली. चातुवर्ण्य पद्धतीत क्षुद्रांनाही गुलामी सहन करावी लागली. आधुनिक युगात या अत्याचाराच्या विरोधात बंडाची भावना शुद्रांना महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराजांचे नेतृत्व मिळाले. सदर नेतृत्वामुळे त्यांच्यात सामाजिक परिवर्तन घडून घडल्याचे दिसून येते.

## सामाजिक परिवर्तनाची गती/वेग, वेळ समाजानुसार वेगळी असते

एखाद्या समाजातील बदलाचा तुलानात्मक अभ्यास असे दर्शवता की, काही समाज वेगाने बदलतात तर काही अत्यंत हळू बदलतात. एखाद्या विशिष्ट काळाशी हे निगडीत असते. त्यासाठी अंतर्गत व बाह्य घटक हे त्याला पुरक किंवा विरोधात काम करतात. पाश्चिमात्य देशात हे घटक बदलाच्या बाजूने काम करतात तर पौर्वात्य देशात त्या विरोधात काम करतात. गरज ही शोधाची जननी असते तर कमी प्रतीची प्रेरणा ही स्थिरतेची जननी असते. पौर्वात्य व पाश्चिमात्य देशात हे दोन्ही ही घटक कार्यरत असतात. पण पाश्चिमात्य देशात बदलाचा दर वेगवान असतो. पौर्वात्य देशात जागतिक महायुद्धानंतर हा वेग वाढला. मध्ययुगीन भारतावर कडक शिक्षा मिळत. कोणत्याच बदलास आवश्यक वातावरण नव्हते. बौद्धीकप्रगती व कारणवादास जागा नव्हती डि.पी. मुखर्जींच्या मते राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ सुद्धा बौद्धीक प्रगतीच्या विरोधात होती. म्हणूनच विज्ञानाचा उगम व प्रसार, तंत्रज्ञानाचा विकास, मानवी प्रगती यांचा भारतात अभाव होता. ती उशीरा सुरू झाली. म्हणून बदलाचा वेग इथे कमी आहे. पाश्चिमात्य देश इतर देशाच्या पुढे आहे. तिथे बदलाचा वेग जास्त आहे.

## सामाजिक परिवर्तनाला विशिष्ट दिशा असते

सामाजिक परिवर्तन हे समाजाच्या कल्याणासाठीच असतात. समाजकल्याणाव्यतीरीक्त बदलांना दिशा नसते. बदल का व कोणासाठी हे महत्वाचे घटक असतात. सामाजिक बदलात दिशा लपलेली असते. समाजशास्त्रज्ञांनी त्याच्या अभ्यासासाठी एकरेषीय, बहुरेषीय व चक्रीय, सैद्धातीक दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे परिवर्तनाच्या परिणाम शोधण्यावरती त्यांचे प्रमुख कक्ष होते. पुरोगामी एकरेषीय/सिद्धांत करांनी पुरोगामी परिवर्तन हे सामाजिक पाठ परिवर्तनाचे केंद्र असते असे म्हटले आहे. बहुरेषीय सिद्धांतकाराणी सामाजिक परिवर्तनाचे म्हटले आहे. बहुरेषीय सिद्धांतकारांनी सामाजिक असे केंद्र असते असे परिवर्तनाचा अनेक बाजू असतात असे म्हटले, चक्रिय सिद्धांतकारानी चलप्रमाणे समाजात परिवर्तन होते आणि एका एकदा अवस्थेत दिसणारी प्रगती दुसऱ्या अवस्थेत अप्रगत मानले जाते म्हणून विकासाला दिशा नसते असे म्हटले आहे.

## सामाजिक परिवर्तन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे

प्रत्येक मानवी समाजात सामाजिक बदल ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. मानव सातत्याने प्रगती करत असल्याने जीवन पद्धती, चारीतार्थाची साधन, तसेच जुने टाकून नविन स्विकारणे सतत बदलणाऱ्या या क्रिया सुरू असतात. निसर्ग व मानवी जीवन निगडीत असल्याने बदलाची प्रक्रिया सातत्यपुर्ण आहे. मानवी जीवन सातत्याने सुरू असल्याने सामाजिक बदलाचे प्रतिबिंब त्यात दिसते म्हणूनच सामाजिक बदल हा मानवाच्या अस्तित्वाचा पुरावा आहे.

## सामाजिक परिवर्तन म्हणजे अमुर्त अशी गोष्टी होय

सामाजिक संबंधातून समाज तयार होतो. तरी त्या समाजाला प्रभावीत करणाऱ्या गोष्टी त्यात दिसतील असे नाही. काही विचार लोकांच्या मनात असतात ते त्यांच्या सांस्कृतिक जीवनात दिसतात. सामाजिक बदल ही अमुर्त संकल्पना आहे. प्रयोग शाळेतील गोष्टीप्रमाणे आपण ते दाखवू शकत नाही.

### स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्न-१

प्र. १) कोणकोणत्या समाजशास्त्रज्ञानी ऑगस्त कॉम्प्त प्रणित सामाजिक स्थिरता आणि सामाजिक परिवर्तन या विषयावर लक्ष केंद्रीय केले आहे.

प्र. २) सामाजिक परिवर्तनाची कोणतीही एक व्याख्या लिहा?

प्र. ३) चक्रीय सिद्धांतकारानी सामाजिक परिवर्तन कसे विशद केले आहे.

## १.३.२ सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत (Theories of Social Change)

सामाजिक परिवर्तना संबंधीच्या सिद्धांताचा अभ्यास वेगवेगळ्या सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासामध्ये, अभ्यासकांनी केलेला आहे. समाजशास्त्र, इतिहासतज्ञ सामाजिक मानवशास्त्राचे अभ्यासक यांनी सामाजिक परिवर्तना संबंधीचा त्याचा असणारा दृष्टीकोन सिद्धांताच्या माध्यमातून स्पष्ट कोन आहे. त्यापैकी सरळरेषात्मक (Linear Theory) आणि चक्रीय (Cyclical) सिद्धांताचे स्परूप पुढील प्रमाणे आहे.

### १) सरळ रेषात्मक सिद्धांत (Linear Social Change) :

हा सिद्धांत अशा स्वरूपाच्या गृहितावर आधारीत आहे की, ज्यामध्ये कोणत्याही मानवी समाजातील परिवर्तनाचे स्वरूप, अशा स्वरूपाचे असते की, तो समाज सावकाशपणे साध्या अवस्थेकडून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे वाटचाल करीत असतो. अशा प्रकारचा विचार समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्ट यांनी मांडला होता. त्याला उत्क्रांतीवादावा सिद्धांत म्हणून ओळखले जाते.

कॉम्टच्या मते जगातील सर्व मानवी समाज एकदम प्रगत अवस्थेला पोहचले नाहीत, तर ते एका विशिष्ट अवस्थांच्या मधून हळूवारपणे प्रगत होत-होत शेवटी विकसित अवस्थे पर्यंत गेलेले असतात. त्यामुळे कॉम्ट यांनी, सामाजिक परिवर्तनाची परिभाषा करताना त्याला 'प्रगती' (Progress) असे म्हटले आहे. कॉम्ट यांनी सामाजिक परिवर्तनाचा सरकारात्मक विचार करताना कोणत्याही मानवी सामाजातील परिवर्तन प्रगतीच्या दिशेने होत असते. मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा आढावा घेत असताना त्यांनी जगातील सर्व मानवी समाज अदिम अवस्था पासून ते प्रगत मानवी संस्कृतीच्या दिशेन एका सरळ रेषेतून गेलेले असतात. म्हणून त्यांनी अशा

परिवर्तनाला (Linear Theory of Social Change) म्हटले आहे.

१९ व्या शतकामध्ये साम्राजवादी देशांनी आपला विस्तार करताना त्यांचा इतर देशांनी संपर्क आला. त्याचे लष्कर, मिशनीर, व्यापारी वर्ग आणि प्रशासक ज्या वेळी अनोळखी अशा भूप्रदेशात गेले त्यावेही त्यांच्या असे लक्षात आले की, अजूनही काही समाज मागासलेल्या अवस्थेत आहेत. अशा मागसलेल्या किंवा अदिवासी अवस्था मध्ये असणाऱ्या मानवी समाजाचा अभ्यास मानव शास्त्रज्ञांनी करण्याचा प्रयत्न केला व त्यांनी संकलित केलेल्या माहितीच्या आधारे असे नमूद करण्यात आले की, मानवी उत्क्रांतीची प्रक्रिया ही संपूर्ण विश्‍वव्यापी असून ते साध्या अदिवासी अवस्थेतून, सभ्य मानवी प्रगत समाजाकडे वाटचाल करतात.

एल. एच. मॉर्गन या अभ्यासकाच्या मते, उत्क्रांतीच्या प्रक्रियेचे प्रमुख तीन टप्पे असतात. ते म्हणजे क्रूर रानटी मानव, रानटी मानव आणि मानवी सभ्यता. ऑगस्ट कॉम्ट यांनी सुद्धा मानवी विकासाच्या अवस्थांचा नियम (Law of Three Stage) स्पष्ट करताना मानवी विकासाची पहिली अवस्था धर्मशास्त्रीय, अध्यात्मिक आणि वैज्ञानिक अशा स्वरूपात स्पष्ट करताना मानवाच्या बुद्धीच्या विकास एका सरळरेषेत होत असतो. म्हणून या सिद्धांताना सरळ रेषात्मक सिद्धांत म्हणून संबोधले जाते.

- **डार्वीनच्या जैविक उत्क्रांती वादाचा प्रभाव :**

सामाजिक परिवर्तनासंबंधी असलेल्या उत्क्रांतीवादी सिद्धांतावरती चार्लस डार्वीन या जीवशास्त्र अभ्यासकाच्या 'जैवीक उत्क्रांती' (Organic Evalution) सिद्धांताचा प्रभाव दिसून येतो. ज्या अभ्यासकांनी डार्वीनच्या सिद्धांता स्वीकार केला त्यांनी तो सिद्धांत मानवी समाज रचने संदर्भात लागू करून असे विचार मांडले की, कोणतेही मानवी समाज साध्या अवस्थेकडून गुंतागुंतीच्या अवस्थेकउे वाटचाल करीत असतात.

हर्बट स्पेन्सर या ब्रिटिश समाज शास्त्रज्ञाने समाज आणि जीव यांची तुलना करताना समाज हा एखादा सजीव घटका सारखा असतो. तसेच डार्वीनच्या 'The Survival of the Fittest' या तत्वाचा अवलंब स्पेन्सर यांनी मानवी समाजाला लागू केला. स्पेन्सर यांच्या मते कोणतेही मानव समाज हळूवार पणे एका विशिष्ट अवस्थेकडून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असतात. पाश्‍चात समाज, वंश वर्ग, संस्कृती एका प्रगत अवस्थे पर्यंत येण्याचे कारणे म्हणजे त्यांनी विशिष्ट अशा सामाजिक परीस्थितीचा अनुभव घेवून त्यावर मात केली असल्याने ते आज प्रगत अवस्थेमध्ये आहेत. अशाप्रकारे डार्वीनचा जीव सृष्टी साठीचा सिद्धांत, सामाजिक जीवनासाठी कसा लागू पडतो, हा विचार १९ व्या शतकात अधिक प्रसिद्धीला आला.

त्यानंतरचा विचारवंत एमिल डरखायिम यांनी, सामाजिक उत्क्रांतीच्या संदर्भात कारणाचा शोध घेण्याच्या प्रयत्न कला. डरखायिम यांच्या मते मानवी समजा आणि त्या समाज अंतर्गत असणाऱ्या सामाजिक नियंत्रणाच्या औपचारीक साधनाचे महत्त्व वाढल गेले आहे. कारण सामाजिक परिवर्तनामुळे मानवी समाजातील विविधतेचे प्रमाणे वाढत गेल्याने समाजातील घटक परस्परावलंबी स्वरूपाचे होत आहेत. त्याच्या मते, ज्यावेळी समजा प्राथमिक अवस्थेत होते त्या वेळी त्या ठिकाणच्या श्रमविभाजनाचे स्वरूप सुद्धा प्राथमिक किंवा साध्या अवस्थेत होते. अशा समाजाअंतर्गत असणारे ऐक्य म्हणजे यांत्रिक ऐक्यासारखे असते. परंतू त्यानंतर मानवी समाजाचे प्राथमिक स्वरूप बदलत जाऊन त्या ठिकाणच्या श्रमविभाजनाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत जाऊन समाज देखील गुंतागुंतीचा होतो. त्यामुळे अशा समाजातील ऐक्य (Organic Solidarity) किंवा जैविक ऐक्यासारखे असते.

सामाजिक परिवर्तना संदर्भात असणाऱ्या, उत्क्रांतीवादी सिद्धांताचा स्वीकार इतर काही अभ्यासकांनी केलेला नाही. कारण त्यांच्या मते, पाश्चात्य अभ्यासकांनी आपल्या प्रगती संस्कृतीची तुलना अदिवासी सारख्या अप्रगत संस्कृतीशी करून आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच या सिद्धांतामध्ये पाश्चात संस्कृती मधल्या अर्थिक आणि तांत्रिक परिवर्तनावरच केवळ भर दिला आहे. त्या मुळे इतर क्षेत्रात घडून आलेल्या परिवर्तनाबाबत हा सिद्धांत स्पष्टीकरण देऊ शकत नाही. तसेच परिवर्तनाचे स्वरूप एका विशिष्ट अवस्थांच्या मधून घडून येतेच असे नाही.

### २) **सामाजिक परिवर्तनाचा चक्रीय सिद्धांत** (Cyclical Theory) :

चक्रीय परिवर्तनचा सिद्धांत सामान्यता मानवी संस्कृती अशा प्रकारे उदयास आल्या आणि काळाच्या ओघात कशा नष्ट झाल्या या संबंधीचा विचार मांडतो. चक्रीय सिद्धांताची प्रामुख्याने ज्या विचारवंतानी मांडणी केले त्यामध्ये, स्पेंलजंर, टॉयननी आणि सोरोकिन यांचा समावेश होतो.

#### **अ) स्पेंलजरचा चक्रीय सिद्धांत :**

जर्मन विचारवंत ओसॉल्ड स्पेलजंर यांनी त्यांच्या 'The decline of the west - 1918' पुस्तकामध्ये चक्रीय सिद्धांता संबंधी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते त्यांनी मानवी संस्कृतीची तुलना मानवेत्तर सजीव प्राण्यांशी करताना म्हटले आहे की, ज्या प्रमाणे सजीव प्राणी जगताचा विचार केला तर, त्याचे एक जीवन चक्र (Life cylce) असते. त्यामध्ये प्रमुख तीन अवस्था असतात. १) जन्म (Birht), २) परिपक्वता (Maturity), ३) अंत (Death) याच प्रमाणे जगातील सर्व मानवी संस्कृती सुद्धा याच अवस्था मधून जात असतात. त्यांनी आपल्या सिद्धांताची मांडणी करण्यापुर्वी जगातल्या प्रमुख आठ मानवी संस्कृतीचा अभ्यास केला होता. त्यामध्ये पाश्चात्य संस्कृतीचा देखील समावेश होतो. त्यांच्या मते आधुनिक प्राश्यात्य संस्कृती म्हणजे, मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा शेवटचा टप्पा आहे. कारण, पाश्चात्य संस्कृती या अंतीम टप्प्यात आहेत कारण, या समाजा अंतर्गत असणाऱ्या संघर्षाची तीव्रता, सामाजिक विघटन इ. मुळे त्यांचा अंत किंवा शेवट जवळ आला आहे. अर्थात स्पेलंजरचा हा सिद्धांत आजच्या काळात निरूपयोगी ठरला आहे. कारण स्पेलंजरच्या विचारातून सामाजिक परिवर्तना बाबतचा अर्थ स्पष्ट होत नाही. तसेच त्यांनी मानवी संस्कृतीची तुलना सजीव सृष्टी सोबत केली असल्याने या सिद्धांताना वैज्ञानिक अर्थाने महत्व रहात नाही.

#### **ब) टॉयनबीचा चक्रीय सिद्धांत :**

ब्रिटीश इतिहासतज्ञ ॲरनॉल्ड टॉयनबी, यांनी सामाजिक परिवर्तनाचा चक्रीय सिद्धांत स्पष्ट केला आहे. ' A Study of History' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी २४ मानवी संस्कृतीचा अभ्यास करून माहिती संकलित केली आहे. टॉयनबी यांच्या चक्रीय सिद्धांतामध्ये महत्त्वाच्या प्रमुख दोन संकल्पना आहेत. त्या म्हणजे.

### **१) आव्हान (Challenge) आणि प्रतिसाद (Response)**

त्यांच्यामते, जगातील प्रत्येक मानवी समाजास उदयास येण्यासाठी विशिष्ट आव्हांनाना तोंड द्यावे लागते. साधारणता मानवी समाजापुढे येणारी आव्हाने ही निर्सगाकडून असू शकतात किंवा ती समाजा अंतर्गत किंवा अन्य इतर बाहेरच्या समाजाकडून येवू शकतात. परंतु अशा स्वरूपाच्या आव्हांनाना प्रत्येक मानवी समाज कशा स्वरूपाचा प्रतिकार देतो. यावरून त्या समाजाचे भवितव्य अवलंबून रहाते. त्यामुळे कोणत्याही

मानवी समाजाचे यश अथवा प्रगती ही त्यांच्या समोर आलेल्या आव्हांनांना दिलेल्या प्रतिकाराच्या स्वरूपावर अवलंबून आहे. आणि ज्या मानवी समाजांना त्याच्या समोर आलेल्या आव्हांनाना प्रभावी रित्या प्रतिसाद देता आला नाही. ते मानवी समाज काळाच्या ओघात नष्ट झाले.

स्पेलंजर पेक्षा टॉयनबी यांचे विचार अधिक सकारात्मक दिसून येतात. कारण टॉयनबी आपल्या विचारात कोणतेही मानव समाज आपोआप नष्ट होतात असा विचार मांडत नाही. त्यांच्या मते, मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर अनेक मानवी संस्कृती नष्ट होत आल्या असल्या तरी, जन्माला येणारी प्रत्येक नविन संस्कृती इतर संस्कृती कडून काही नविन गोष्टी शिकून आपल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे प्रत्येक मानवी समाजाला, विशिष्ट अवस्थांमधून जात असताना आपली उद्दिष्ट अधिक चांगल्या प्रकारे प्राप्त करून घेता येवू शकतात. टॉयनबी यांच्या सिद्धांता मध्ये मात्र अजून काही घटकाचा उलघडा होत नाही. तो म्हणजे, जर एखादा समाज त्याच्या पुढे असणाऱ्या आव्हांनाना प्रभावी पणे प्रतिकार करत असतो. त्याच वेळी इतर दुसरा समाज तशा स्वरूपाचा प्रतिकार का करू शकत नाही किंवा एखादा समाज त्याच्या पुढे येणाऱ्या एका आव्हानाला प्रतिकार करतो आणि त्या पुढच्या आव्हानांला प्रतिकार न केल्यामुळे त्याचा अंत का होतो?

**क) पिट्रीम सोरोकीनचा चक्रीय सिद्धांत :**

१९३८ मध्ये रशियन अमेरिकन समाजशास्त्रज्ञ पिट्रीम सोरोकीन यांनी त्यांच्या 'Social Cultural Dynamics' या ग्रंथात सामाजिक परिवर्तना संबंधी विचारे मांडले आहेत. सोरोकिन यांनी, जगातील मानवी संस्कृती मधल्या परिवर्तनाचा अभ्यास करताना मानवी संस्कृतींचा विकास आणि अंत या पद्धतीने परिवर्तनाची मांडणी न करता, मानवी संस्कृती संदर्भात त्यांनी दोन प्रकारच्या संस्कृतीच्या प्रकारातून कशा प्रकारे समाजिक परिवर्तन घडून येत असते. या विषयी मांडणी केली आहे. सोरोकिन यांच्या मते, संस्कृती दोन स्वरूपाच्या असतात. १) भौतिक संस्कृती - जी प्रत्यक्ष डोळ्याला दिसते. ज्या संस्कृतीचा अनुभव मानव प्रत्यक्ष अनुभव शकतो. उदा :- नागरीकरण, औद्योगिक विकास, शासन व्यवस्था, कुटूंब, विवाह इ. २) काल्पनकि संस्कृती - या प्रकारची संस्कृती जी केवळ व्यक्ती आपल्या मनामध्ये त्या बद्दलची कल्पना करीत असते. या संस्कृतीचा संबंध व्यक्तीच्या श्रद्धा व अमूर्त घटकाशी असतो. उदा :- धार्मिक स्वरूपाच्या कल्पना इश्वराचे अस्तीत्व इ. किंवा आपल्या बाहेर असणाऱ्या सामाजिक जीवना बद्दल आपल्या मनात असलेल्या कल्पना यांचा त्या मध्ये समावेश होतो.

सोरोकीन च्या मते, संस्कृतीचे दोन्ही प्रकार परस्पर विरोधी स्वरूपाचे असतात. त्यामुळे ज्या वेळी दोन्ही पैकी कोणत्याही एका संस्कृतीचा विकास होतो. त्या वेळी त्याच्या विरूद्ध असणारी संस्कृती तिला प्रतिकार करण्याचा प्रयत्न करते. तसेच दोन्ही पैकी कोणत्याही एका संस्कृतीच्या विकासावर अधिक जोर दिल्यास, तात्काळ दुसऱ्या विरूद्ध संस्कृतीकडून प्रतिकार होत असतो. अशा स्वरूपाच्या संस्कृतीमधील द्वंद मानवी समाजात तणाव, संघर्ष आणि अस्थिरता निर्माण करीत असते.

सोरोकिन यांच्या मते, वरील दोन प्रकारच्या परस्पर विरोधी संस्कृती मध्ये तिसरा एक महत्वाचा संस्कृती प्रकार आढळतो. त्याला सारोकिन यांनी ३) आदर्शात्मक संस्कृती असे म्हटले आहे. की ज्या संस्कृतीचा प्रकार दोन संस्कृती प्रकारांचा सुवर्णमध्य साधणारा असतो. परंतू कोणत्याही मानवी समाजात ज्या वेळी असा सुवर्णमध्य साधला जाईल त्या वेळी त्या मानवी समाजात सामाजिक स्थैर्य (Stadility) अस्तित्वात येवू शकते. परंतू प्रत्यक्षात आजपर्यंत कोणत्याही मानवी समाजाला आदर्शात्मक संस्कृती प्राप्त करता आलेली

नाही.

परंतु सोरोकिन यांच्या चक्रीय सिद्धांताचा स्विकार इतर अभ्यासकांनी केला नाही. कारण त्यांच्या मते, कोणत्याही मानवी समाजातील परिवर्तन याच स्वरूपात कशा प्रकारे घडून येवू शकते. शिवाय सोरोकिन यांनी केलेल्या संस्कृतीच्या प्रकारांचे विश्लेषण मुख्यता व्यक्तीवादी (Subjective) स्वरूपाचे आहे.

### १.३.३ सामाजिक परिवर्तनाचे घटक – लोकसंख्यात्मक, आर्थिक, धार्मिक, जैव–तांत्रिक, माहिती तंत्रज्ञान, आणि प्रसार माध्यम :

सामाजिक परिवर्तन हे समाजाची रचना आणि संस्कृती मध्ये कांही अंतर्गत आणि बाह्य घटकांच्या मुळे घडून येत असते. समाजाची रचना म्हणजे समाजातील व्यक्तींच्या साठी असणाऱ्या सर्व पायाभूत सुविधा आणि त्या सुविधांचा व्यक्तींना वापर करण्यासाठीची यंत्रणा होय. संस्कृती म्हणजे मानवी समाजाशी संबंधित असणाऱ्या परंपरा, धर्म संस्कृती हे दोन स्थिर (Static) घटक असतात तर, सामाजिक परिवर्तन ही एक अटळ प्रक्रिया असते.

सामाजिक परिवर्तनाची दिशा आणि स्वरूप कशा प्रकारचे असते. या संबंधीचे विश्लेषण सामाजिक परिवर्तनाच्या सिद्धांता मधून स्पष्ट केले आहे. सामाजिक परिवर्तनामुळे समाजाची प्रगती आणि उधोगती होत असते. त्यामुळे कोणत्याही मानवी समाज रचनेमधील आणि संस्कृती मधील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन असते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात परिवर्तन सातत्याने होत असते. समाजाचे सातत्य आणि परिवर्तन हे कोणत्याही मानवी समाजाच्या दोन वास्तव बाजू असतात. समाजातील ताण–तणाव आणि संघर्ष या घटकामुळे देखील समाजात परिवर्तन घडून येत असते. अशा अर्थाने समाजिक परिवर्तनाचे स्वरूप विचारात घेतल्यानंतर कोण कोणत्या सामाजिक घटकांचा परिणाम म्हणून सामाजिक परिवर्तन घडून येते. या संबंधीचा आढावा घेताना, सामाजिक परिवर्तनाला जबाबदार असणाऱ्या घटकांचा विचार करणार आहोत.

#### १) लोकसंख्यात्मक घटकांमुळे घडून येणारे सा. परिवर्तन :

कोणत्याही मानवी समाजातील लोकसंख्येचा आकार आणि रचना कशा स्वरूपाची आहे. त्यावरून त्या समाजातील परिवर्तनाचे स्वरूप निश्चित होत असते. १९ व्या शतकात वाढत्या लोकसंख्ये मुळे मानवी समाजाला अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ज्या प्रमाणे अतिरिक्त लोकसंख्येमुळे जशा समस्या निर्माण होतात. त्याप्रमाणे ज्या ठिकाणी लोकसंख्या कमी आहे. अशा ठिकाणी सुद्धा समस्या निर्माण होतात. तर लोकसंख्ये मधील मृत्यू दराचे प्रमाण कमी झाले तर, त्या ठिकाणी वृद्धांची समस्या निर्माण होते. लोकसंख्येशी संबंधीत असलेल्या जन्मदर आणि मृत्यूदर कशा प्रकारचा आहे. या वरून त्या समाजातील समाजिक परिवर्तन निश्चित होते. उदा. भारतामध्ये अतिरिक्त लोकसंख्येचे परिणाम म्हणून दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, आरोग्य नागरीकरण इ. समस्या निर्माण होत असलेल्या दिसतात. म्हणून लोकसंख्या हा परिवर्तनाचा एक घटक आहे. लोकसंख्येतील स्त्री–पुरूष प्रमाणाचा देखील परिणाम समाजातील इतर घटकांवर होत असतो. १९६८ मध्ये 'गुनार मर्डायल' या अभ्यासकाने युरोप मधल्या जन्म–मृत्यू दराच्या प्रमाणातील कमी जास्त पणाचा लोकसंख्येच्या स्थित्यंतरावर झालेला परिणाम अभ्यासला होता. या उलट भारतामध्ये जन्मवाढीदर वाढत गेल्याने लोकसंख्या विस्फोटाची समस्या निर्माण होऊन त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या समस्या कशा प्रकारच्या असतात याचा अभ्यास केला.

## २) आर्थिक घटकांच्या मुळे घडून येणारे सा. परिवर्तन :

१९७० मध्ये सर्व प्रथम कार्ल मार्क्स यांनी सामाजिक परिवर्तनाचा अर्थिक सिद्धांत मांडला. त्यांच्यामते कोणत्याही मानवी समजात असणारी आर्थिक उत्पादन पद्धती कोणत्या प्रकारची आहे. त्यावरून तिचा त्या समाजातल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय सामाजिक जीवनावर परिणाम होत असतो. कार्ल मार्क्स यांनी अर्थिक घटकांमुळे सामाजिक परिवर्तन कशा प्रकारे होते हे स्पष्ट करताना, सरंजामशाही, भांडवलशाही आणि समाजवाद अशा वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीमधल्या अर्थिक घटकांचा त्यांनी विचार केला. त्यांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा परिणाम म्हणून त्या ठिकाणी भांडवलदार आणि कामगार असे वर्ग निर्माण होतात. मार्क्सच्या एकूण विचारा मध्ये भौतिक घटकांच्या मधील परिवर्तनाचा परिणाम हा एकूण समाजारचनेवर होत असतो. या अर्थाने, भारतातील परस्थितीचा आढावा घेतला तर, स्वातंत्र्य प्राप्ती नंतर ज्यावेळी जमिनदारी कायद्याने रद्द करण्यात आली त्यावेळी शेती वर काम करण्याऱ्या शेतमजूरांना त्याचा अर्थिक फायदा झाला व त्याची जमिन त्यांना परत मिळाली. भारतीय समाज हा सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या विविधता असणारा देश आहे. तो एक विकसनशील देश आहे. या ठिकाणच्या शेती अर्थव्यवस्थेचा विचार केला तर, शेतीशी संबंधित असणाऱ्या शेतमजूर वर्गाचे स्वरूप भिन्न स्वरूपाचे आहे. अशा स्थिती मध्ये शासन संस्था महत्वाची भूमिका पार पाडते, जमिनदारीचा नाश, कमाल जमिन धारणा कायदा, सहकारी पतपेठ्यांची स्थापना, आणि इतर अर्थिक विकासाच्या कार्यक्रमाद्वारे, तसेच हरित क्रांतीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडून आणले जाते. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या बदलामुळे भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात बदल घडून येत आहेत. भारतीय जाती व्यवस्था, कुटूंब पद्धती, विवाह, शेतीचे बाजारीकरण, अशा भिन्न-भिन्न क्षेत्रावर अर्थिक घटकामुळे परिवर्तन घडून येत आहे.

## ३) धार्मिक घटकामुळे घडून येणारे परिवर्तन :

भारतीय समाज हा अनेक धर्माचा मिळून बनलेला देश आहे. या ठिकाणी हिंदू, मुस्लीम, शीख, पारशी, बौद्ध, ख्रिश्चन, जैन असे विविध धर्म आढळतात. स्वातंत्र्यपूर्व काळात धर्म संस्था एक सामाजिक परिवर्तनातील अडथळा समजला जात होता. परंतू ब्रिटीश राजवटीमध्ये, आलेल्या धर्मनिरपेक्षीकरणाच्या धोरणामुळे, भारतीय समाजामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक परिवर्तन घडून आले. पारंपारिक धर्माची रचना मागे पडल्या मुळे या ठिकाणच्या जाती व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला. जाती-व्यवस्थे मधील ताठरता कमी होऊन शिथिरता आली.

असे असले तरी, धर्मामुळे केवळ सकारात्मक स्वरूपाचे सामाजिक परिवर्तन घडून आलेले नाही. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर धर्म आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधातून भारतामध्ये हिंदू-मुस्लिम सांप्रदायिकतेची समस्या, धर्मांतराची समस्या निर्माण झालेली दिसते. भारतामध्ये कधी एकेकाळी धर्म सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचे कार्य करीत होता. उदा. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने घडवून आणलेले परिवर्तन व्यापक स्वरूपाचे होते. परंतू नंतरच्या काळात धर्माशी संबंधीत मूलतत्ववादी विचार सरणी, धर्माचे राजकारण या मुळे काही काळ भारतीय समाजामध्ये ताण-तणाव आणि संघर्ष निर्माण झाल्याचे आढळते. धर्माशी संबंधित असणाऱ्या सामाजिक चळवळी, धर्माचे तत्वज्ञान, धार्मिक विचारसरणी यातून भारतीय समाजामध्ये अखंड स्वरूपात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू आहे.

विविध धर्माशी संबंधीत असणारे संत, धर्म गुरू, महात्मे यांच्या वाणीतून जे समाज प्रबोधन होत असते त्याचा परिणाम म्हणून सुद्धा सामाजिक परिवर्तन घडून येत असते. परंतू भारतामध्ये विविध धर्माच्या मुळे मूल्यात्मक संघर्ष सुद्धा निर्माण होत असतो. परंतु भारतीय घटनेने धर्म निरपेक्षतेचे तत्व मान्य केले असल्यामुळे अशा प्रकारच्या संघर्षावर मर्यादा येतात.

**४) जैव-तांत्रिक घटकामुळे घडून येणारे परिवर्तन :**

२१ व्या शतकात जैव तंत्रज्ञान हे मानवी समाजाला मिळालेले एक वरदान की शाप या बद्दल एकमत नसेल तरी, आज मितीला जैवतंत्रज्ञान एक वैज्ञानिक अविष्कार असून त्याचे एकूण मानवी समाज जीवनावर परिणाम दिसून येत आहेत. जैव तंत्रज्ञानाच्या आधारे आज शेती उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. पारंपारिक शेती पद्धतीची जागा आज जैवतंत्रज्ञानाने घेतल्याने, शेती अर्थ व्यवस्थेमध्ये मोठा बदल घडून येवू लागला आहे. मात्र त्याच वेळी दुसऱ्या बाजूला पर्यावरण संरक्षण वादी जैवतंज्ञानाला विरोध करी आहेत. जैवतंत्रज्ञानातून पिकांच्या पारंपारिक जातीचे जैविक स्वरूप बदलेले जाते. केवळ शेती व्यवसायामध्येच नाही तर, वैद्यकिय क्षेत्रात मानवी आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रयोगपद्धतीचा अवलंब केला जात असल्याने अनेक महत्त्व पुर्ण बदल घडून येत आहेत. शेती पिकांच्या, फळांच्या पारंपारिक असणाऱ्या जाती पूर्णता बदलन्याचे कार्य जैव तंत्रज्ञानाद्वारे होत असते. त्यातून नविन पिकाच्याजाती तयार करून भरघोस शेती उत्पादन घेतले जाते. परंतू त्यामुळे शेतजमिनीचा कस कामी होऊन जमिन प्रदुषण होते. (Land-Degradation) भारतीय लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा, आणि पारकीय चलन मिळवण्याच्या उद्देशाने जैव तंत्रज्ञान एक उपयुक्त साधन असले तरी, त्याचे काही विपरीत परिणाम सुद्धा एकूण मानवी जीवनावर होत असतात.

जैव तंत्रज्ञानाचा विकास, शेती क्षेत्रा बरोबरच वैद्यकिय क्षेत्रामध्ये वाढत आहे. मानवी आरोग्याशी संबंधीत असणाऱ्या पारंपारीक रोगांवर उपचार करण्याच्या उद्देशाने या तंत्राचा उपयोग केला जात आहे. एकूणच जैवतंत्रज्ञाना मुळे सामाजिक परिवर्तनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळत आहे. जैव तंत्रज्ञाना बद्दलची व्यापक्ता पाश्चात समाजा इतकी, भारतीय समाजामध्ये आढळून येत नाही. जैव तंत्रज्ञान स्वीकारण्याची मानसिकता पाहिजे त्या प्रमाणात भारतीय समाजामध्ये आढळून येत नाही.

**५) माहिती तंत्रज्ञानामुळे घडून येणारे सामाजिक परिवर्तन :**

माहिती तंत्रज्ञानामुळे भारतीय समाजात घडून आलेल्या परिवर्तनास 'IT Revolution' किंवा 'संगणक क्रांती' असे म्हणतात. स्वातंत्र्य पूर्व काळात ब्रिटीश आगमनानंतर आलेले छपाई यंत्र, किंवा पोस्ट ऑफिस, रेल्वे इ. मुळे जसा बदल घडून आला होता. त्याहून अधिक व्यापक बदल संगणकाच्या वापारामुळे घडून आला आहे. शिक्षण, बँक, प्रशासन, दळण-वळण व औद्योगिक क्षेत्रामध्ये संगणकाच्या वापरातून मोठे बदल दिसून येत आहे. भारतातील पारंपारिक शिक्षण पद्धतीवर मोठा परिणाम झाल्याने ती कालबाह्य ठरू लागली आहे. संगणकावर आधारीत शिक्षण पद्धतीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाचा सर्व वयोगटातील व्यक्तींच्यावर परिणाम झाला असला तरी, प्रामुख्याने युवापिढीवर संगणकाचे जसे सकारात्मक परिणाम झाले आहेत. तसे नकारात्मक परिणाम सुद्धा दिसून येत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम म्हणून संगणकीय ज्ञानाची आदान प्रदान मोठ्या प्रमाणात वाढली.

शैक्षणिक क्षेत्रात संगणकाचे वाढते महत्त्व म्हणून नगरांचा विस्तार होऊ लागला. पुणे, बेंगलोर इ.

सारख्या शहरांचा विकास केवळ संगणकांच्या वाढत्या ज्ञानामुळे झाला आहे. संगणकांचे जसे सकारात्मक परिणाम आहेत, त्याप्रमाणे नकारात्मक परिणाम म्हणून भारतातील लघु उद्योग, घरगुती अद्योगांवर त्याचे विपरीत परिणाम झाले आहेत. एकूणच भारतीय जीवन पद्धतीला एक वेगळे वळण देण्याचे कार्य माहिती तंत्रज्ञानातून झाले आहे. भारतामध्ये ग्रामीण भागा पेक्षा शहरामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व अधिक जाणवते.

प्रशासन क्षेत्र, बँका, उद्योग धंदे इ. सारख्या क्षेत्रातील संगणकाच्या वाढत्या प्रमाणमुळे कुशल कामगारांना रोजगार संधी उपलब्ध होऊ लागल्या. दैनंदिन व्यवहारामध्ये सहज-सोपेपणा वाढत गेला. परंतू त्याच बरोबर 'संगणक क्षेत्रातील गुन्हेगारी' (Cyber Crime) सुद्धा हळू-हळू भारतीय समाजात मूळ धरू लागली आहे.

### ६) प्रसारमाध्यमामुळे घडून येणारे परिवर्तन :

प्रसार माध्यम सुद्धा एक सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख कारण आहे. टेलीव्हिजन, वृत्तपत्रे, रोडिओ या सारख्या साधनाबरोबरच मोबाईलच्या वापरातील क्रांतीकारक बदल, महत्त्वाचा मानला जातो. प्रसार माध्यमामुळे संपुर्ण विश्व एका लहान खेड्याच्या आकाराचे होऊ लागले. प्रसार माध्यमांतून भारतीय संस्कृतीशी संबंधीत असणारी भाषा, पोशाख, आहार, चालीरिती, रूढी, परंपरा या सर्व घटकांवर परिणाम होऊ लागला. प्रादेशिक भाषांचे अस्तीत्व धोक्यात येवू लागले. प्रसार माध्यमातून राजकीय साक्षरता वाढू लागली. प्रसार माध्यमाचा परिणाम म्हणून भारतीय ग्रामीण जीवनामध्ये बदल घडून आले. ग्रामीण संस्कृतीवर शहरी संस्कृतीचा प्रभाव दिसून येवू लागला. प्रसार माध्यमामुळे कुटूंबातील समाजीकरणाचे महत्व कमी होऊन अप्रत्यक्ष सामाजीकरणाचे महत्व वाढत गेले. प्रसार माध्यमाचा परिणाम म्हणून बाल गुन्हेगारी, व्यवसनाधिनता इ. सारख्या समस्या निर्माण होऊ लागल्या वृत्तपत्राच्या आणि संवाद साधनाच्या मधून, मानवी आचार-विचार प्रवृत्ती, सामाजिक संबंध इ. सारख्या घटकांवर दूरगामी परिणाम दिसून येत आहेत. प्रसार माध्यमांच्याद्वारे भारतीय समाजात घडून येणाऱ्या परिवर्तनाचा वेग इतक्या मोठ्या प्रमाणात होता की, अल्पावधीमध्ये संपूर्ण भारतीय समाज रचना पूर्णता बदलून गेली.

प्रसारमाध्यम ही एक अत्यंत प्रभावी साधन असल्याने त्याचा उपयोग कशा पद्धतीने होतो यावरून त्याच्या परिणामाचे स्वरूप निश्चित होते. आज शेती व्यवसायासाठी किंवा मानवी संरक्षणासाठी म्हणून हवामानाचे अंदाज, संभाव्य नैसर्गिक आपती बद्दलचे ज्ञान कृत्रीम ग्रहाद्वारे मिळवून आपण आपले संरक्षण करू शकतो. मनोरंजन, पर्यटन, अशा विविध क्षेत्रातील ज्ञान मिळवू शकतो. थोडक्यात प्रसार माध्यामांचा परिणाम म्हणून भारतीय समाजामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले आहे.

## १.४ सारांश (Let us Sum up) :-

आपण अभ्यासले की सर्वच समाजामध्ये परिवर्तन होतच असते. म्हणजेच समाजाची रचना व कार्याशी निगडीत घटक सतत बदलत असतात. सामाजिक परिवर्तन हे वैश्विक, गुंतागुंतीचे व बहुविध कारणांचा अविष्कार असते. बहुतेक वेळा सामाजिक परिवर्तन हा नियोजीत व विशिष्ठ दिशा असलेला असतो. त्यामुळे कालबाह्य परिस्थिती किंवा रचना या बदलल्या जातात. यातून सामाजिक बदलाची/परिवर्तनाची दिशा कळते.

उत्क्रांती व प्रगती या दोन संकल्पनातून आपणास सामाजिक बदल समाजवून घ्यायला मदत होते. उत्क्रांती

म्हणजे नविन घटकांबरोबर मानवी जीवनाचा मोठ्या कालखंडातील होणारा विकास होय. प्रगती म्हणजे मानवी समुहाच्या विकासासाठी विशिष्ट उद्दीष्टय प्रती घडवून आणलेला बदल हा वैयक्तीक व्यक्तीशी संबंधीत नसतो. या दोन्ही संकल्पना निसर्ग व मानवी समाजात घडणाऱ्याा विशिष्ट बदलांवर प्रकाश टाकतात.

सामाजिक परिवर्तनाचे स्रोत हे नविन शोध व त्यांचा प्रसार यांच्याशी संबंधीत असतात, व त्यांचा लोकसंख्यात्मक घटक तांत्रिक घटक, सांस्कृतिक घटक अशा अनेक स्रोतांशी संबंध असतो. समाजशास्त्रज्ञानी याबाबत काही सिद्धांत मांडले आहेत. परंतु सामाजिक परिवर्तनाबाबतच्या कोणत्याही एका सिद्धांताबद्दल एकमत नाही. तरीही नविन शोध व त्यांच्या प्रसार या दोन स्रोतांचा वापर सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत मांडताना होतात. असे आपणास आढळते.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरेः–

### स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे–१

१) टॉल्काट पार्सन, एम.एन.श्रीनिवास, ए. आर. देसाई, डी. पी. मुखर्जी आणि बी. आर. आंबडेकर या समाजशास्त्रज्ञानी ऑगस्त कॉम्प्त प्रणित सामाजिक स्थिरता आणि सामाजिक परिवर्तन या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे.

२) मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल होय – हॉरी जॉन्सन

३) चक्रिय सिद्धांत कारानी समाज गतिशील असतो, चक्रा प्रमाणे समाजात परिवर्तन होते. एका अवस्थेत दिसणारी प्रगती दुसऱ्या अवस्थेत अप्रगत मानली जाते म्हणून विकासाला दिशा नसते असे सामाजिक परिवर्तन संदर्भात विशद केले आहे.

## १.६ सराव/गृहपाठः–

१) सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२) उत्क्रांती प्रगती आणि सामाजिक परिवर्तन या संकल्पना स्पष्ट करा.

३) आर्थिक घटकामुळे घडून येणारे सामाजिक परिवर्तन स्पष्ट करा.

## १.७ चिंतन व कृतीः–

१) आपल्या समाजातील सामाजिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या सामाजिक चळवळीबद्दल तुमचे निरीक्षण नोंदवा.

२) सामाजिक परिवर्तनाबद्दल आवड असणाऱ्या नेत्यांशी, शिक्षकांशी वा मोठ्या व्यक्तींशी सामाजिक परिवर्तनाबद्दल चर्चा करा त्यामुळे सामाजिक परिवर्तनातील विविध घटक व समस्या तुम्हास कळू शकतील.

३) जगातील (आपल्या देशांसह) महत्वाच्या घडामोडींची यादी करा की ज्यामधून सामाजिक बदल घडून आले.

४) सामाजिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या सामाजिक चळवळींचे निरीक्षण करा.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके Suggested Readings:-

Davis Kingsley :- Human Society, Macmillan, New York, 1948

Bottomore T.B :- A Guide to Problems and Literature, Unwin University Book, London, 1969

Tischler HL, Whitten, Philipand Hunter, David EK:- Introduction to Sociology Holt, Renehart and Wihston, Boston, 1983

Moore Wilbort :- Social Change, Eastern Economy Edition, Prientice Hall, India Pvt.Ltd.New Delhi, 1987

Kuppaswamy B :- Social Change in India, Vikas Publication, Delhi, 1972

Vidya Bhushan and Sacheva :- An Introduction to Sociology, Kital Mahal, Allahabad, 2001

Ahuja Ram :- Society in India: Concepts, Theories and Recent Trawls, Rawat Publications, Delhi

Aglawe Pradeep: Samajshastra :- Sankalpana Aani Siddhant, Shri Sainath Prakashan Nagpur, 2011

Joshi B.R. :- Samajik Shastratil Saundya Siddhantachya Kosh, Dimond Publications, Pune, 2008.

Mane Suresh :- Glimes of Sociocultural Revolts in India, Samrudh Bharat Publications, Mumbai, 2006

C.N.Shankar Rao, 'Sociology' S. Chand & Company Ltd. Delhi, First Edi. 1990

K.L. Sharma, Indian social Structure and Change, Rawat Publication 2011

❑❑❑

# घटक २

# समकालीन भारतातील सामाजिक परिवर्तन

## (Social Change in Contemporary India)

**घटक संरचना:**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

- २.३.१ सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिया – पाश्चीमात्यीकरण आणि आधुनिकीकरण
- २.३.२ सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिया – संस्कृतीकरण आणि धर्मनिरपेक्षीकरण
- २.३.३ धर्मांतर (Religious Conversion)

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक संज्ञा

२.६ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठीचे प्रश्न

२.८ अधिक वाचनासाठीची पुस्तके

## २.१ उद्दिष्ट्ये ( Objectives) :–

समकालीन भारतीय समाजामध्ये परिवर्तन प्रक्रिये अंतर्गत ज्या काही महत्वपूर्ण परिर्वनाच्या प्रक्रिया घडून आल्या त्यांचे स्वरूप जाणून घेत असताना.

अ) ब्रिटीश कालखंडात, भारतीय समाजावर राजवट करणाऱ्या साम्राज्यवादी व्यवस्थेचा परिणाम म्हणून ज्या काही सामाजिक, अर्थिक, सांस्कृतिक सुधारणा घडून आल्या, त्यांचे स्वरूप कशा स्वरूपाचे होते तसेच विज्ञान आणि तांत्रिक बदलामुळे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेवर कशा स्वरूपाचा परिणाम घडून आला हे जाणून घेता येईल.

ब) इंग्लंडमध्ये १८ व्या शतकात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीचे परिणाम संपूर्ण जगभर घडून आले. परूंतू आधुनिकीकरणाचे भारतीय समाजावर कोणते परिणाम झाले. या सबंधीचे स्वरूप जाणून घेता येईल.

क) १९९१ नंतरच्या काळात, भारत सरकाने स्वीकारलेल्या अर्थिक उदारीकरणाच्या धोरणाचा परिणाम म्हणून घडून आलेल्या अर्थिक, सामाजिक सांस्कृतिक बदलांचे स्वरूप कशा प्रकारचे होते. या बद्दलचे माहिती स्पष्ट करता येईल.

## २.२ **प्रस्तावना** (Introduction) :–

समकालीन भारतीय समाजातील परिवर्तनाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी म्हणून, पाश्चीमात्यीकरण, आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण या तीन महत्त्वाच्या परिवर्तन प्रक्रियांचे स्वरूप अभ्यासणे महत्त्वाचे ठरते भारतीय समाजातील परिवर्तनाचा अभ्यास करताना अभ्यासकांनी, सांस्कृतीकरण, पाश्चात्यीकरण, आणि स्थानिक पातळीवर घडून येणाऱ्या परिवर्तन सबंधीच्या संकल्पना विचार करता त्यांचे टीकात्मक परिक्षण केले आहे भारतामध्ये नागरीकरण, औद्योगीकरण, इ. प्रक्रियांचा सहभाग परिवर्तनाला महत्त्वाचा समजला जातो.

पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम म्हूणन, भारतामध्ये सुधारणा चळवळीचा उगम झाल्याने, चळवळीच्या माध्यमातून, परिवर्तन सुरूवात झाली. ब्रिटीश कालखंडात, नविन प्रकारचे तंत्रज्ञान, यांत्रिकी करण, औद्योगीकरण सुरू झाल्याने त्याचा दूरगामी परिणामी, भारतीय संस्कृतीवर दिसून येवू लागला. भारतीय परंपरा रूढी, आचार-विचार या ठिकाणची जाती-व्यवस्था, कुटुंब पद्धती, ग्रामीण जीवन इ. च्या वर पाश्चातीकरणांचे दूरगामी परिणाम दिसून येवू लागले पाश्चात्यीकरण या संकल्पनेचा अभ्यास एम.एन श्रीनिवास यांनी त्यांच्या अभ्यासात करताना, भारतीय समाजातील परिवर्तनाचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले.

आधुनिकीकरण ही संकल्पना देखील, भारतीय समाजातील परिवर्तनाच्या अनुषंगाने अभ्यासली गेली आहे. आधुनिकीकरणाच्या अभ्यासामध्ये परंपरागत भारतीय समाज, पाश्चात्यीकरण, धर्मनिरपेक्षीकरण, लोकशाहीकरण, नागरीकरण आणि औद्योगीकरण इ. सारख्या प्रक्रियांच्यामुळे कशा प्रकारे बदलत गेला. भारतीय संस्कृती आणि परंपरा यांच्यावर आधुनिकीकरणाचा परिणाम झाल्याने, कशा प्रकारचे सांस्कृतिक परिवर्तन घडून आले या बदलचा अभ्यास, योगेंद्रसिंग यांनी त्यांच्या, Modernization of Indian या अभ्यासातून घेतला आहे.

त्या नंतरच्या म्हणजे १९९१ नंतरच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून भारतीय समाजामध्ये, परिवर्तन प्रक्रियेला अधिक चालना मिळाली. कारण भारतीय अर्थव्यवस्था, जागतिक अर्थव्यस्थेला एक घटक झाल्याने, दळण-वळण, व्यापार जागतिक बाजार पेठ, परकीय गुंतवणूक, खाजगीकरण, उच्च तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान इ. अवस्था मधून भारतीय समाजाची वाटचाल होत असताना, त्याचे चांगले वाईट परिणाम, या ठिकाणच्या शेती व्यवसायावर, ग्रामीण समाजावर झाले. नागरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. शिक्षण संस्था, परकीय कंपन्या, आणि अद्यावत संगणकीय ज्ञानाचा परिणाम म्हणून भारतीय संस्कृतीशी सबंधीत असणारी मूल्य-व्यवस्था, परंपरा, आणि स्थानिक समूहांच्या समस्या मध्ये वाढ होऊ लागली. थोडक्यात जागतिकीकरणाच्या माध्यमातून परिवर्तन घडून येवू लागले.

## २.३ **विषय विवेचन** (Presentation of Subject Matter):–

समकालीन भारतातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी ज्या प्रमुख तीन प्रक्रियांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. त्यामध्ये पाश्चीमात्यीकरण, आधुनिकीकरण, आणि जागतिकीकरण या परिवर्तन प्रक्रियांचा समावेश होतो. भारतीय समाज, हा सांस्कृतिक दृष्टीने एक वैशिष्ट पूर्ण असा समाज समजला जातो. मुस्लीम, ब्रिटीश, पोतुगीज, सारख्या बाह्य संस्कृतीने या ठिकाणच्या मूळच्या संस्कृतीवर आक्रमण केल्यामुळे स्थानिक संस्कृती मध्ये विविधता आढळते. ज्या बाह्य संस्कृतीच्या प्रभावामुळे, भारतीय समाजामध्ये परिवर्तनाच्या प्रक्रियेला सुरूवातीच्या कालखंडात वेग आला ती म्हणजे ब्रिटीश संस्कृती होय, कारण पाश्चात्यीकरणाची

प्रक्रिया त्यावेळी पासूनच सुरू झाली. शिवाय भारतीय समाजामध्ये आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळत गेली. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर, १९९१ च्या कालखंडात भारतसरकारने, अर्थिक शिथिलीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात केल्यानंतर आपली अर्थ-व्यवस्था जागतिक अर्थ-व्यवस्थेचा एक घटक म्हणून वैश्वीक पातळीवर तिला महत्व आहे. थोडक्यात जागतिकी करणाच्या प्रक्रियेतून देखील भारतीय समाजात परिवर्तन घडून आले.

### २.३.१ अ) **पाश्चीमात्यीकरण** (Westernization)-

भारतीय समाजशास्त्रज्ञ एम.एन.श्रीनिवास यांनी, भारतातील सामाजिक सांस्कृतिक समाज जीवन पद्धतीमध्ये, ज्या परिवर्तनाच्या प्रक्रियांमुळे बदल घडून आला, त्यांचे स्वरूप स्पष्ट करताना सांस्कृतिकरण, धर्मनिरपेक्षीकरण आणि पाश्चात्यीकरण प्रक्रियांचा उल्लेख केला आहे.

त्यांच्या मते, पाश्चात्यीकरण ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया असून, तिला अनेक प्रकारच्या बाजू आहेत. ज्यावेळी भारतीय समाजामध्ये, पाश्चात्य विचार सरणी, कायदा आणि तात्विक विचार आणि पाश्चात्य जीवन पद्धतींचा प्रसार झाला; त्याचा परिणाम म्हूणन भारतीय समाजात परिवर्तन घडून आले. श्रीनिवास यांच्या मते, पाश्चात्य संस्कृतीमुळे घडून येणाऱ्या बदला सबंधीची पहिली चाहूल उच्च जाती समूहातील लोकांना लागल्यामुळे, त्यांनी ताबडतोब त्या संधीचा फायदा घेण्यास सुरूवात केली. शिवाय पाश्चात्य शिक्षण पद्धती आणि त्यांच्या आधुनिक दळण-वळणाच्या सुविधांच्यामुळे तर परिवर्तनाच्या प्रक्रियेला अधिक गती मिळाली उपग्रहाद्वारे प्रेक्षपीत होणाऱ्या दूरदर्शन वरील, विविध वाहिन्याद्वारे, पाश्चात्य संगीत, वेशभूषा, नृत्य, कला, आणि आपल्या प्रवृत्ती यांच्यावर त्यांचा प्रभाव दिसून येवू लागला. एके काळी 'आहार' घेण्याच्या भारतीय संस्कृती मधल्या कृतीला एक धार्मिक विधी समजले, जात असे, शाकाहार हा शुद्ध आहार समजला जात असे, परंतू अशा धार्मिक विचारांमध्ये बदल घडून आला त्याच प्रमाणे पारंपारिक केशभूषा, वेशभूषांची जागा आता पाश्चात्य संस्कृतीने घेतली. त्याच प्रमाणे इलेट्रॉनिक प्रसार माध्यम, सेल फोन सारख्या पाश्चात्य तंत्रज्ञानाच्या वाढत्या चैनीच्या वस्तू मुळे, आपल्या परस्परांच्या मधील संवाद आणि सामाजिक संबंधाचे स्वरूप बदलले त्याच प्रमाणे पाश्चात्य विचारांच्या प्रभावामुळे स्पृश-अस्पृशतेच्या संकल्पना मागे पडल्या, व अनेक धार्मिक अंधश्रद्धा कमी होऊ लागल्या. पारंपारिक भारतीय समजामध्ये जातीवर आधारीत असणाऱ्या नियमांची जागा कायदा व्यवस्थेने घेतली. आधुनिक शिक्षणातून समानता, सामाजिक न्याय, आत्मसन्मान इ. सारख्या मूल्यांचा प्रभाव होऊ लागला. परंतु यासर्व बदलाच्या प्रक्रियेत, भारतीय समाजामध्ये आजही जाती प्रथा आणि जाती भेद मात्र काही प्रमाणात उरलेला दिसतो, व्यक्तीचा सन्मान आणि जाती भेदा सबंधीची आणीव निर्माण करण्याची आज ही आवश्यकता आहे.

**पाश्चीमात्यीकरणाची व्याख्या** (Defination of Westernization)-

१) अपाश्चात्य देशातील, तंत्रज्ञान, सामाजिक संस्था, विचारसरणी आणि त्यांची मूल-व्यवस्था इ. सारख्या क्षेत्रात दीर्घकालखंडा पासून घडून येत असलेल्या परिवर्तनाला 'पाश्चात्यीकरण' म्हणतात. (The chenge in Technology, instituations, ideoloqy and values of non-western society for a Lovg Period.)

२) ब्रिटीश राजवटीच्या १५० वर्षाच्या कालखंडात, भारतीय समाज आणि संस्कृती मधल्या, तंत्रज्ञान, सामाजिक संस्था, विचार प्रणाली आणि सामाजिक मूल्य व्यवस्थेच्या स्तरावर घडून आलेल्या बदलाना

पाश्चात्यीकरण असे म्हटले जाते. ( Westernization ' refers to', The changes brought about in Indian society and culture as a result of over 150 years of British rule and term subsumes changes occurring at different level technoloqy, institutions, ideoloqy values etc.)

**पाश्चीमात्यीकरण प्रक्रियेची प्रमुख वैशिष्टे** (Chavactstics of westernizatioa)-

पाश्चीमात्यीकरण प्रक्रियेची काही प्रमुख वैशिष्टे दिसून येतात ती पुढीलप्रमाणे.

१) सांस्कृतीकरणाच्या संकल्पने पेक्षा 'पाश्चीमात्यीकरण' संकल्पना जाणून घेण्यास सुलभ आणि सोपी आहे.

२) तंत्रज्ञान, सामाजिक संस्था, विचार प्रणाली आणि भारतीय मूल्य व्यवस्था अशा काही प्रमुख घटकावरती पाश्चात्यीकरणाचा प्रभाव दिसून येतो.

३) पाश्चीमात्यीकरण ही सर्वसमावेशक, गुंतागुंतीची आणि बहुअंगी स्वरूपाची प्रक्रिया असल्याने, त्या अंतर्गत, भारतीय संस्कृतीशी संबधीत सर्व बदलांचा विचार समाविष्ट होतो.

४) पाश्चात्यीकरणाची प्रकिया ज्या दोन प्रमुख घटकांशी संबंधीत आहे त्यामध्ये १. ब्रिटीश अधिकारी, ब्रिटीश लष्करातील प्रमुख, ब्रिटीश व्यापारी आणि चहाच्या मळ्याचे मालक, आणि परकीय ख्रिश्चन समाजसेवी संस्था इ. चा संपर्क आल्याने घडून आलेला भारतीय समाजातील बदल आणि २. भारतातील धर्मांतरीत ख्रिश्चन, ब्रिटीशांच्या सेवेसाठी असणारे भारतीय व उच्च शिक्षणामुळे ब्रिटीश नोकरशाहीत असणारे भारतीय इ. मुळे ही प्रक्रिया घडून आली.

५) पाश्चीमात्यीकरणाचे स्वरूप, भारतामध्ये एक सारखे नव्हते, विविध प्रदेश आणि विविध लोकसंख्येच्या समूहांमध्ये पाश्चात्यीकरणाचा प्रभाव भिन्न-भिन्न स्वरूपाचा होतो.

६) भारताच्या राजकीय आणि सांस्कृतिक जीवनावर पाश्चात्यीकरणाचा प्रभाव दिसून येतो.

७) पाश्चीमात्यीकरण ही संकल्पना निपक्षपाती स्वरूपाची असल्याने, त्यांच्या चांगल्या वाईट परिणामा सबंधीचा प्रश्न निर्माण होत नाही.

८) कनिष्ठ समूहांच्या दृष्टीने, पाश्चात्यीकरण प्रक्रिया अधिक फायदेशीर होती.

**पाश्चीमात्यीकरणाचे भारतीय समाजावरील परिणाम-**

एम.एन. श्रीनिवास यांनी अभ्यासलेल्या पाश्चात्यीकरण संकल्पने बाबत प्रो. योगेंद्रसिंग यांनी, आपले मत स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, पाश्चात्यीकरण ही एक मानवतावादी आणि मानवी विचारांना विशेषता प्राप्त करून देणारी अशी प्रक्रिया की ज्यामुळे भारतामध्ये समाज सुधारणा आणि संस्थात्मक बदलाची एक शृखंलाच सुरू झाली त्यांच्या मते, भारतात स्थापन होत असलेल्या बदलाची एक शृंखलाच सुरू झाली. त्यांच्या मते, भारतात स्थापन होत असलेल्या वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञानावर आधारीत शिक्षण संस्था, राष्ट्रवादाचा उदय, नविन सांस्कृतिक मूल्यावर आधारित येणारे राजकीय नेतृत्व इ. सारख्या घटना म्हणजे पाश्चात्यीकरणाचाच एक परिणाम आहे. प्रो. योंगेन्द्रसिंग यांनी पाश्चात्यीकरणाचे परिणाम दोन प्रकारात स्पष्ट केले आहेत. त्यांच्या मते.

## १) प्राथमिक स्वरूपाचे पाश्चीमात्यीकरण–

प्राथमिक स्वरूपाच्या पाश्चात्यीकरणाचा प्रभाव हा सुरूवातीच्या कालखंडात, युरोपमध्ये घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून, सर्व प्रथम भारतातीय पारंपारिक हिंदू संस्कृतीवर त्याचा परिणाम जास्त दिसून येतो. अशा सुरूवातीला घडून आलेल्या परिणामाला त्यांनी 'लघु परंपरा' (Little tradition) म्हटले आहे. या लघुपरंपरे अंतर्गत असणाऱ्या विविध उप–संस्कृतिक समूहांच्यावर पाश्चात्यीकरणाचा परिणाम दिसून येवू लागला.

### अ) मध्यमवर्गीय व्यापारी समूहांवरील परिणाम–

पाश्चात्यीकरणाचा पहिला प्रभाव १८ व्या शतकातील मध्यम वर्गीय व्यापारी समूहांवर दिसून येवू लागला. कारण ते ब्रिटीश व्यापारांशी दलाल म्हणून काम करीत होते अशा मध्यम वर्गीय समूहामध्ये लेखनिक, विश्लेषक तज्ञ, कॅशीयर, कॉन्ट्रयक्टर इ. चा समावेश होता की जे व्यापारा निमित्त देशांत्तर करीत होते. त्यांच्या मध्ये पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव दिसून येत होता. त्यांच्या कडे इंग्रजी भाषा बोलण्याचे कैशल्य प्राप्त झाल्यामुळे ते ब्रिटीशांच्या व्यापाराचे व्यवस्थापन करीत होते.

### ब) व्यावसायिक समूहांवरील परिणाम–

१९ व्या शतकात ब्रिटीयांनी भारतात सुरू केलेल्या वेगवेगळ्या शिक्षण संस्थाच्या स्थापनेमुळे व्यावसायिकांचा मध्यम वर्ग उदयास आला होता. ब्रिटीश शिक्षण व्यवस्थेचा परिणाम म्हणजूनच हा वर्ग उदयास आला. या वर्गाने ब्रिटीशांच्या सामाजिक मूल्यांचा आणि विचारांचा स्वीकार केला होता. अशा सामाजिक मूल्यांमध्ये समानता, व्यक्तीवाद, स्वातंत्र्य, लोकशाही बंधुत्व इत्यादींचा प्रभाव अधिक दिसून येतो. त्यामुळे अशा व्यावसायिक समूहातील व्यक्तींच्या प्रवृत्ती, जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन, नितीमत्ता आणि वैचारिकता इ. वरली पाश्चात्यसंस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

### क) साक्षर समूहा वरील परिणाम–

पाश्चात्यीकरणाचा प्रभाव म्हणून भारतीय समाजामध्ये एक नविन साक्षर व्यक्तींचा समूह उदयास आला. या समूहांने पाश्चात्य शिक्षण घेतले असल्यामुळे, त्यांनी पाश्चात्य भाषेतील साहित्य भारतीय भाषांच्या मध्ये अनुवादीत करण्यास सुरूवात केली. त्यामुळे सुरूवातीच्या कालखंडात ज्या विविध भारतीय भाषांमध्ये साहित्य लिहले गेले. त्यावरती पाश्चात्य परंपरेचा प्रभाव आढळून येतो.

### ड) सामाजिक सुधारणांवरील परिणाम –

पाश्चात्यीकरणाचा परिणाम म्हणून, भारतामध्ये समाजसुधारणा चळवळींचा उदय झाला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांना सुरू केलेली ब्राम्हो समाजाची चळवळ, त्याचे एक उदाहरण होय. राजाराम मोहन रॉय यांनी इंग्रजी साहित्याचा अभ्यास असल्याने त्याचे असे मत झाले की, इंग्रजी मूल्यांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीच्य सामाजिक, अर्थिक, विकासाला चालता देता येईल. त्यानंतरच्या प्रार्थना समाज, सत्येशोधक समाज अशा अनेक चळवळी नंतर उदयास आल्या याच चळवळी केवळ पाश्चात्य संस्कृतीला जवळ करणाऱ्या नव्हत्या तर दुसऱ्या बाजूला भारतीय परंपरांचे संरक्षण करणाऱ्या होत्या. परंतु या चळवळीच्या माध्यमातून, पारंपारिक हिंदू समाज व्यवस्थे मधल्या पारंपारिक पद्धती मध्ये बदल घडून येवू लागला.

### इ) व्यक्तींच्या दैनंदिन जीवनावरील परिणाम –

पाश्चीत्यीकरणाचा परिणाम हा भारतींयाच्या दैनंदिन जीवन पद्धती, रूढी,परंपरा, सवयी यांच्या वरती दिसून येवू लागला त्यामध्ये, नविन तंत्रज्ञानाचा स्वीकार आहार, पोशाख, धार्मिक विधी, बोलीभाषा, भौतिक संस्कृती, प्रवास, आचार-विचार इ. चा समावेश होतो. आहारामधील बदलामुळे खाण्या-पिण्याच्या सवयी वर परिणाम दिसून येवू लागला उदा- मांसाहार, बोलीभाषेत, कोर्ट, कलेक्टर, कॉलेज, स्कूल, पोलीस स्टेशन, रेल्वे, पोस्ट, फोन शब्दांचा वापर सहजपणे दिसून येवू लागला. अशा स्वरूपाच्या भाषेचे अनुकरण करण्या बरोबरच आपल्या संस्कृतीशी हे शब्द एकरूप झाल्याने, त्यांचा प्रभाव ग्रामीण, शहरी, साक्षर, निरक्षर सर्वांच्या मध्ये दिसून येवू लागला.

### २) दुय्यम स्वरूपाचे पाश्चीमात्यीकरण–

पाश्चातीकरणाचे परिणाम ज्यावेळी राष्ट्रीय अथवा व्यापक स्तरावर घडून येतात. कारण 'बृहत परंपरा' (Great Tradition) असे म्हणतात. योगेन्द्र सिंग यांनी संस्थात्मक पातळीवर भारतीय समाजामध्ये पाश्चात्यीकरणा मुळे जो विकास घडून आला त्या बाबतचे विवेचन करताना त्यांनी खालील घटकांचा विचार केला आहे.

### अ) सार्वत्रिक स्वरूपाच्या कायदा व्यवस्थेमध्ये वाढ –

ब्रिटीश राजवटीमध्ये पारंपारिक हिंदू कायदयामध्ये बदल घडून आला. कारण पारंपारिक हिंदू कायदे जाती निहाय स्वरूपाचे होते. त्यामुळे कायदे यंत्रणा एकसूत्री स्वरूपाची नव्हती. परंतु ब्रिटीशांची ज्या कायदयाची मांडणी केली, ते कायदे धर्मनिरपेक्ष, आणि सार्वत्रिक आणि तर्क सुसंगत स्वरूपाचे होते. त्यामुळे कायदा एक आधुनिकीकरणाचे साधन समजले जाऊ लागले. सुरुवातीला अशा कायदयांना परंपरांच्या वर्चस्वामुळे प्रतिसाद कमी मिळाला परंतू नंतरच्या काळात त्याचे स्वरूप निश्चीत झाले. 'वॉरन हेस्टींग' या ब्रिटीश अधिकाऱ्याच्या प्रयत्नामुळे भारतात कायदा व्यवस्था अस्तीत्वात आला. कायदा व्यवस्थेचा परिणाम म्हणून, भारतामध्ये परिवर्तन घडून आले. कायदा सर्वांसाठी सारखा समजला जाऊ लागला. भारतामध्ये असणाऱ्या अनेक रूढी परंपरा की ज्यामध्ये असख्य उणीवा होत्या, त्या नष्ट झाल्या.

### ब) आधुनिक शिक्षणाचा विकास झाला –

आधुनिक शिक्षणाचा पाया भारतामध्ये ब्रिटीशांनी घातला. आज भारतात असणाऱ्या शिक्षण पद्धतीला १५४ वर्षे झाले, कारण १८५७ मध्ये प्रमुख तीन विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये कलकत्ता, मद्रास, आणि मुंबई विद्यापीठाचा समावेश होतो. १८३५ मध्ये सुरूवातीला 'लॉर्ड मॅकोली' यांनी शैक्षणिक धोरण तयार केले. आधुनिक शिक्षणाचे स्वरूप हे अधिक वैज्ञानिक आणि धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे असल्याने पारंपारिक शिक्षणा पेक्षा त्याचे स्वरूप भिन्न होते. आधुनिक शिक्षण सर्व जाती धर्मांच्या लोकासाठी खुले होते. त्यामुळे भारतातील जातीवर आधारित पारंपारिक शिक्षण पद्धतीचे महत्त्व कमी झाले. प्राथमिक, माध्यमिक, आणि उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात असे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जात असे, अशा प्रकारे भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया ब्रिटीशांनी घातला. सद्या भारतामध्ये शिक्षण संस्थाची संख्या वाढत आहे.

### क) नागरीकरण आणि औद्योगीकरणाची सुरूवात–

औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून, भारतीय शहरांची रचना बदलली भारतातील पारंपारिक शहरांचा चेहरा–मोहरा बदलून नविन औद्योगिक शहरांची वाढ होऊ लागली. ग्रामीण भागातून लोकशहरांकडे स्थलांतर करू लागले. औद्योगीकरणामुळे सांस्कृतिक आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली असे असले तरी, काही अभ्यासकांच्या मते, भारतीय आधुनिकीकरणातून शहरांची वाढ झाली असली तरी त्या ठिकाणी सांप्रदायिकता आणि जाती व्यवस्था काही प्रमाणात नव्याने तयार होऊ लागल्याने, शहरांच्यामध्ये आधुनिकीकरणाचे स्वरूप आढळून येत नाही. औद्योगिकरण आणि आधुनिकीकरणाचे स्वरूप आढळून येत नाही. औद्योगिकरण आणि शहरीकरण यांचा परस्पर सबंध असून त्यामुळे शहरामध्ये व्यापार, रोजगार संधी, नोकरशाही आणि उच्च वर्गांची स्थापना झाली.

### ड) दळण–वळण आणि आधुनिकीकरणात वाढ –

पाश्चात्य संस्कृतीमुळे आधुनिक दळण–वळणाच्या साधनात वाढ झाल्याने क्रांतीकारी स्वरूपाचे बदल घडून आले. दळण–वळणामुळे जग जवळ आले. आधुनिक स्वरूपाच्या दळण–वळण पद्धतीमध्ये, पोस्ट आणि तार विभाग, टेलीफोन, रेडिओ, टेलीव्हिजन, इंटरनेट, इ–मेल माहिती तंत्रज्ञान यांचा समावेश होतो. त्याच प्रमाणे सागरी वहातूक, हवाई वहातूक, रस्ते वहातूक इ. मुळे मोठे बदल घडून आले 'Global Village' ही संकल्पना रूढ झाली.

### इ) राष्ट्रवाद, राजकारण आणि आधुनिकीकरण–

भारतामध्ये राष्ट्रवादी आणि लोकशाहीची सुरूवात ही भारतातील असली तरी, त्याचा उगम पाश्चात्य संस्कृती मध्ये आढळतो. अर्थात भारतातील राष्ट्रवाद पूर्णता पाश्चात्य धर्तीचा म्हणता येत नाही. कारण त्या आगोदरच्या काही समाज सुधारकांनी राष्ट्रवादा बद्दलची विचार मांडणी केली होती त्यामध्ये महात्मा गांधी, राजाराम मोहन रॉय इ. समावेश होतो.

**स्वंय अध्ययना साठीचे प्रश्न १** (Check your Progress)-

**जोड्या जुळवा**

| 'अ गट' | 'ब गट' |
|---|---|
| १) पाश्चातीकरण संकल्पना | लघु परंपरा |
| २) प्राथमिक स्तरावरील पाश्चात्यीकरण | वॉरन हेस्टींग |
| ३) ब्राम्हो समाजाची स्थापना | लॉर्ड मॅकोली |
| ४) कायदा व्यवस्थेची स्थापना | राजाराम मोहन रॉय |
| ५) शैक्षणिक धोरणाची आखणी | एम.एन. श्रीनिवास |

## २.३.१ ब) आधुनिकीकरण (Modernization)-

'आधुनिकीकरणफ संज्ञा तात्विक विचारांची किंवा चळवळ म्हणून संबोधली जात नाही, तर ती केवळ परिवर्तन प्रक्रिया म्हणूनच ओळखली जाते. या प्रक्रियेतून व्यक्तीनी स्वीकारलेल्या आधुनिक जीवन पद्धती आणि मूल्य प्रकारांचा अर्थ स्पष्ट होतो. सुरूवातीच्या काळात अर्थ व्यवस्थे मधील बदलाचा परिणाम म्हणून आपल्या जीवनशैली आणि मूल्यांवर झालेला परिणाम म्हणजे आधुनिकीकरण म्हटले जात असे त्याच प्रमाणे शेती पासून औद्योगीकरणाकडे झालेले समाजाचे परिवर्तन म्हणून सुद्धा आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेकडे पाहिले जात असे. परंतू सद्याच्या काळात आधुनिकीकरणाचा व्यापक अर्थ विचारात घेतला जातो.

आधुनिकीकरणाचा आज, अशा व्यक्तीच्या दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो की, ज्या रूढी परंपरे पासून बाजूला जात असताना आजच्या वर्तमान परस्थिती, आणि रहानीमानाची समायोजन साधण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या मध्ये जो नविन स्वरूपाचा बदल आढळतो. त्यामध्ये त्यांच्या आहार पद्धती, पोशाख, बोलण्याची शैली, आवडी-निवडी, विचार मूल्य पद्धती, करमणूक इ. असंख्य वर्तन प्रकारांचा समावेश होतो. आधुनिकीकरणामुळे होणाऱ्या परिवर्तनामध्ये, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदल अपेक्षित धरला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञानतून जे वेगवेगळे शोध लागले. त्यांचा आपल्या समाज व्यवस्थेवर आणि सामाजिक सबंधावर परिणाम झाल्याने, आपल्या पारंपारिक विचारांनी जागा नविन विचारांनी घेतलेली आढळते.

### एम.एन. श्रीनिवास यांचे मते आधुनिकीकरणाची व्याख्या (Definition of Moernization)-

'आधुनिकीकरण' ही संज्ञा मूल्या आधारित असून, सर्व साधारण पणे आधुनिकीकरण म्हणजे एक चांगली प्रक्रिया असे समजले जाते. म्हणून त्यांनी पाश्चात्यीकरण ही संकल्पना निवडली की ज्यामध्ये त्यांनी १५० वर्षाच्या ब्रिटीश कालखंडात भारतीय समाजात घडून आलेल्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास केला.

### योगेंन्द्र सिंग यांचे मते-

पाश्चात्यीकरण आणि सांस्कृतिकरणाच्या संकल्पने पेक्षा आधुनिकीकरणाची प्रक्रिया वेगळी, तिचा केवळ विशिष्ट अशा मानवी संस्कृती मधल्या बदलाशी नसून ती एक सार्वत्रिक स्वरूपाची क्रिया आहे. उदा- विज्ञानातील प्रगतीचा सबंध हा केवळ कोणत्याही जाती अथवा वांशिक गटाशी नसतो. त्याचा सबंध एकूण मानव जातीच्या कल्याणासाठी असतो.

### डॅनियल लर्नर यांचे मते -

मध्य-अशियाई राष्ट्रातील समाजाचा पाश्चात्य देशाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संपर्क आल्याने त्यांच्या मध्ये घडून आलेल्या परिवर्तनाला उद्देशून 'डॅनियल लर्नर' यांनी 'Modernization' ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्यांनी त्यांच्या शब्दात केलेली आधुनिकीकरणाची व्याख्या म्हणजे, सध्या प्रचलित असणारी 'आधुनिकीकरण' संज्ञा ही जुन्या सामाजिक परिवर्तन संज्ञेचे नांव असून, ज्यामध्ये अल्पविकसित समाज हे अधिक विकसित असणाऱ्या समाजातील गुणधर्म अंगीकारण्याचा प्रयत्न करतात.

### आधुनिकीकरणाची प्रक्रिया (Process of Modernization)-

आधुनिकीकरण ही परिवर्तनाची अशी प्रक्रिया की जी, एकूण समाजावर आधुनिकीकरण करणारी

असते. आधुनिकीकरण प्रक्रिये अंतर्गत ज्या प्रमुख घटकांचा समावेश होतो त्यामध्ये

१) आधुनिकीकरण म्हणजे, हातमाग सारख्या साध्या पारंपारिक तंत्रज्ञान कडून 'यंत्रमागा' (Powerloows) सारख्या, वैज्ञानिक ज्ञानावर आणि तंत्रज्ञानावर आधारीत तांत्रिक बदलांना आधुनिकीकरण संबोधले जाते.

२) ज्यावेळी शेतीव्यवसायाचे उत्पन्न उदरनिर्वाहाकडून बाजार पेठांच्या दृष्टीकोनातून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणला जातो.

३) कारखान्यामध्ये ज्यावेळी मानव आणि प्राण्यांच्या साह्याने तंत्र चालविण्याची जागा यंत्राने घेतली जाते. उदा-शेती मशागती साठी नांगर हाकण्यासाठी बैलांची उपयोग केला जात होता. त्या ऐवजी ट्रॅक्टरच्या साह्याने, शेती मशागत केली जाते.

४) ज्यावेळी खेडी आणि शेती व्यवसाया सोबत असणारा समाज 'औद्योगिक' आणि 'शहरी' घटका भोवती केंद्रित होतो.

५) ज्यावेळी पारंपारिक धार्मिक मूल्यांचा प्रभाव कमी होऊन, राष्ट्रवाद, देशभक्ती लोकशाही, धर्मनिरपेक्षते सारख्या मूल्यांचा प्रभाव वाढतो. त्याच प्रमाणे ज्या वेळी कुटुंबाचा आकार आणि कार्ये या मध्ये बदल घडून येतो.

६) शिक्षणाच्या क्षेत्रात ज्यावेळी, साक्षरतेचे प्रमाण वाढते, आणि औपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्थाच्या विस्तार वाढतो. जनसंपर्कासाठी असणाऱ्या प्रसार माध्यमांचा ज्यावेळी शिक्षणासाठी उपयोग होतो. तसेच शासन व्यवस्था, अर्थव्यवस्था आणि शिक्षण व्यवस्थेमध्ये असणाऱ्या नोकरशाहीचा विस्तार वाढतो.

७) व्यक्तीगत पातळीवर ज्यावेळी शिक्षण, विवाह, व्यवसाय इ. बाबत व्यक्ती स्वतः निर्णय घेते. म्हणजेच, मानसिक स्तरावर घडून येणाऱ्या बदलांचा समावेश सुद्धा गृहीत धरला जातो.

**आधुनिकीकरणाची वैशिष्टे** (Charactstics of moderniation)-

आधुनिकीकरण एक विज्ञान म्हणून त्यामध्ये कार्यकारण, तर्क संगतता, धर्मनिरपेक्षता,कमालीच्या अपेक्षा, साध्यकरण्या बाबतच्या वाढत्या आकांक्षा मानवी मूल्ये आणि प्रवृत्तीच्या मध्ये सर्वंकक्ष बदल, नव-नविन कार्यशील संत्याची स्थापना, मानवी संसाधन साधनांच्यामध्ये गुंतवणूक, अर्थिक वाढीवर भरदेणारी अर्थ-व्यवस्था, जात, गोत्र, धर्म, भाषा या सारख्या हितसंबंधा पेक्षा राष्ट्रीय हित सबंधाना महत्त्व, खुली समाज व्यवस्था आणि व्यक्ती गतिशीलतेचे स्वरूप अशा वैशीष्टांचा समावेश त्यामध्ये होतो.

**आधुनिकीकरणाच्या मापनाचे मापदंड –**

ज्यावेळी आपण, अल्प विकसित समाज विकसित समाजांच्या गुणधर्मांचे अंगीकरण करतात, त्यावेळी आधुनिकीकरण समजतो. विकसित समाजांकडे कोणत्या स्वरूपाचे गुणधर्म असतात की ज्यांना आपण आधुनिकीकरणाचे निकष मानतो.

'रूस्टो' आणि 'वार्ड' या अभ्यासकांनी आधुनिकीकरणाच्या मापनाचे काही मानदंड स्पष्ट केले आहेत ते पुढील प्रमाणे.

१) औद्योगीकरणावर आधारित अर्थ-व्यवस्था, व उद्योग धंदे, शेती, दुग्ध व्यवसाय, इ. सारख्या क्षेत्रातील उत्पन्नामध्ये अधिकत्तम वाढ करण्यासाठी केलेले वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या वापर.

२) धर्मनिरपेक्ष विचार, आणि तर्कसंगत नियमावर आधारीत संस्कृती.

३) भौगोलिक आणि सामाजिक गतीशीलते मधल्या वाढी बरोबरच व्यावसायिक आणि सामाजिक गतीशीलते मधल्या वाढी बरोबरच व्यावसायिक गतीशीलते मध्ये झालेली वाढ.

४) वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षणाचा प्रसार आणि वाढ

५) मिळालेल्या दर्जाकडून मिळवलेल्या दर्जाकडे झालेले परिवर्तन.

६) रहानीमानाच्या भौतिक दर्जात वाढ.

७) दुय्यम आणि तृतीय दर्जाच्या उद्योगधंद्यामध्ये कामगार संख्येचे प्रमाण प्राथमिक दर्जाच्या उद्योगा पेक्षा अधिक आढळणे शेती आणि मच्छीमारी व्यवसाया पेक्षा उत्पादन पद्धतीला आलेले महत्व.

८) सामाजिक गतीशीलते मध्ये वाढ, ओळखण्यासाठी नागरीकरण साक्षरता प्रमाण, आणि प्रसार माध्यामांचा सहभाग विचारात घेतला जातो.

९) शासनसंस्थेमधील सहभागाचे प्रमाण अधिक आढळते धोरण निश्चित करण्यासाठी लोकशाही मूल्य पद्धतीचा स्वीकार.

**आधुनिकीकरणाची कारणे** (Causes of Modernization)-

आधुनिकीकरणाची प्रक्रिया कोणत्याही एका कारणामुळे घडून येत नसते. अनेक कारणांचा त्यामध्ये सहभाग असतो. आधुनिकीकरण ज्या प्रमुख घटकांच्या मुळे घडून येत असते. त्यामध्ये शिक्षण, जनसंपर्काची साधने, विशिष्ट विचारसरणीवर आधारीत राष्ट्रवाद, कुशल नेतृत्व इ.

## १) शिक्षण-

ज्यावेळी शिक्षणातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी सबंधीत उच्च शिक्षणामध्ये वाढ होते त्यावेळी आधुनिकीकरणास चालना मिळते. शिक्षणातून राष्ट्रा बद्दलची प्रामाणिकपणाची भावना आणि तांत्रिक सृजन शीलतेसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्य आणि प्रवृत्तीच्या मध्ये वाढ होते. एडवर्ड शील या, अभ्यासकाच्या मते, अध्यापन कौशल्यासाठी केवळ औपचारिक शिक्षण पुरेसे नसते. उदा-विद्यापीठ शिक्षणातून जरी, अनेक विद्यार्थी पदवी शिक्षणाचा अभ्यासक पूर्ण करून बाहेर पडत असले तरी, सर्वांच्या कडेच पुरेसे आधुनिक ज्ञान आणि कौशल्य असेल असे म्हणता येत नाही. याचा अर्थ राष्ट्रीय विकास की जो आधुनिकरणाशी सबंधीत असतो, त्यामध्ये शैक्षणिक कार्याचे महत्त्व डावलून चालणार नाही. राष्ट्राचा विकास म्हणजे ज्ञाना बद्दल जो व्यक्तींना माहित असतो. कौशल्यातील बद्दल म्हणजे. ज्या व्यक्ती जो व्यक्तींना माहित असतो. कौशल्यातील बद्दल म्हणजे. ज्या व्यक्ती करू शकतात आणि प्रवृत्ती मधला बदल म्हणजे ज्या व्यक्ती मिळवण्याचा प्रयत्न करतात. आणि या गोष्टी साध्य करण्यासाठी शिक्षणाची गरज असते.

## २) जनसंपर्काची माध्यमे –

जनसंपर्काच्या माध्यमावर ती आधुनिकीकरणाची प्रक्रिया अवलंबून असते, वृतपत्रे, नियतकालिके, मासिके, दूरदर्शन, रेडिओ, टेलीफोन, चित्रपट, संगणक, इ-मेल, इंटरनेट इ. सारख्या माध्यमाच्या मधून आधुनिक विचार जन मानसा पर्यंत कमी वेळात पोहचवता येतात. समाजातील अधिका-अधिक लोकांच्या साठी जनसंपर्काची माध्यमे कार्य करतात. नविन माहिती, नविन विचार, नविन इच्छा, आकांक्षा इ. मधून नविन स्वरूपाची ध्येय साध्य करता येतात. जनसंपर्क माध्यम एक असे साधन आहे की, ज्याद्वारे, आवश्यक असणारे ज्ञान आणि त्यासाठीच्या प्रवृत्ती अगदी कमी वेळात अधिक-अधिक व्यक्ती पर्यंत पोहचविता येतात परंतू जर अशी प्रसार माध्यम शासकीय नियंत्रणा खाली राहिली तर, त्याद्वारे पक्षपाती स्वरूपात राजकीय विचार प्रणालीचा प्रसार होतो. परंतू लोकशाही मध्ये वृतपत्रांना पुरेश्या प्रमाणात स्वातंत्र्य दिलेले असते.

## ३) राष्ट्रवादावर आधारित विचारसरणी –

लोकशाही आणि राष्ट्रवाद याचा आधुनिकीकरणाशी घनिष्ठ सबंध असतो. राष्ट्रवाद हा राष्ट्रीय जाणीव आणि राजकीय सार्वमत यांच्याशी निगडीत असतो. पाश्चात्य समाज व्यवस्थांचा विचार करता राष्ट्रवादाच्या विकासा सोबतच त्या ठिकाणाच्या लोकशाही व्यवस्थेला बळकटी आलेली दिसते. राष्ट्रवादी विचार सरणीच्या माध्यमातून, ज्या समाज व्यवस्था मध्ये विविधता आढळते. त्या ठिकाणी, सामाजिक ऐक्य निर्माण करता येते. तसेच राजकीय नेत्यांना जनमानसाच्या वर्तनामध्ये बदल घडवून आणता येतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये, आधुनिक दृष्टीकोन, विचार, मूल्ये इ. चा प्रसार करण्यासाठी प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

## ४) कुशल नेतृत्त्व –

जर कुशल नेतृत्त्व असले तर, आधुनिक स्वरूपाची वर्तन मूल्ये, श्रद्धा आचार इ. चा स्वीकार जनमानसा कडून घेता येतो. परंतू आजच्या परिस्थिती मध्ये, ज्या कुशल नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती असतात त्या आपल्या पदाचा गैर फायदा घेवून आधुनिक मूल्ये, विचार यांचा केवळ आत्मस्वार्थासाठी उपयोग करून घेत असताना राष्ट्रीय हिताचा विचार  करीत नाहीत.

## ५) शासकीय अधिकारांचे नियंत्रण –

आधुनिक मूल्ये आणि विचार प्रणालीचा लोकांनी स्वीकार करण्यासाठीची सक्ती आणि उपाय, जर शासन व्यवस्था सशक्त आणि स्थिर स्वरूपाची असेल तरच शक्य होते. काही वेळा सत्ताधारी शासनावर दबाव निर्माण करून सुद्धा अशा स्वरूपाची मूल्ये आचरणात आणली जाऊ शकतात अमेरिकन माजी अध्यक्ष जार्ज बुश यांनी अशा स्वरूपाच्या धोरणाचा अवलंब करत. विकसनशील आणि विकास मार्गांवर असणाऱ्या राष्ट्रांच्यावर दबाब तंत्राचा अवलंब करून आधुनिक जीवन पद्धती आणि त्या बद्दलची कार्यवाही आमलात आणण्याचा प्रयत्न करती होते.

## ६) इतर घटक –

इतर घटकांच्या मध्ये प्रामुख्याने, नागरीकरण, औद्योगीकरण, आणि सार्वत्रिक कायदे व्यवस्थां मुळे आधुनिकीकरण कशा प्रकारे घडून येते. या सबंधीचा विचार स्पष्ट केला आहे.

## अ) नागरीकरण आणि औद्योगीकरण –

नागरीकरण आणि औद्योगीकरण या दोन परस्पर सबंधीत प्रक्रियांचा सबंध आधुनिकीकरणाशी येतो. या दोन प्रक्रियांचा वेग किती आहे या वरून आधुनिकीकरणाचे स्वरूप समजून येते. नागरीकरण म्हणजे शहरांच्या संख्येत आणि विस्तारात होणारी वाढ होय! जगातील बहुतांशी आधुनिक राष्ट्रे नागरीकरणाच्या प्रक्रियेत किंवा वाढत्या शहरांच्या मुळे ओळखली जातात 'औद्योगीकरण' म्हणजे उद्योग धंद्याची होणारी बेसुमार वाढ होय. अर्थिक विकास आणि तंत्रज्ञान शिवाय औद्योगीकरण घडून येवू शकत नाही.

## ब) सार्वत्रिक स्वरूपाची कायदे व्यवस्था –

पारंपारिक समाज-व्यवस्था ज्या पारंपारिक श्रद्धा, मूल्ये, रूढी, परंपरावर आधारीत होती. त्या वेळी त्या ठिकाणचा समाज परिवर्तनाचा वेग तुलनेन कमी होता. परंतु जे समाज सार्वत्रिक स्वरूपाच्या कायदे व्यवस्थांच्या आधारे कार्य करतात. त्याचे स्वरूप अधिक खुल्या स्वरूपाचे आढळते. 'कायदे व्यवस्था' हा आधुनिकीकरणासाठीचा आवश्यक घटक असतो. सध्याची कायदे व्यवस्था व्यक्तीला मिळालेल्या हक्काचे संरक्षण करून तिला स्वातंत्र्याची हमी देते. आजच्या वैज्ञानिक पद्धतीवर आधारीत कायदे व्यवस्थेमुळे उद्योग धंद्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करता येते.

## ७) आधुनिकीकरणाची सांस्कृतिक बाजू –

प्रो.योगेन्द्रं सिंग यांनी आधुनिकीकरणाच्या सांस्कृतिक पातळीवर विचार केला आहे. त्यांनी एका विशिष्ट घटकांवरून आधुनिकीकरणाचा विचार न करता सार्वत्रिक स्तरावर त्याची चर्चा केली आहे भावनात्मक पातळीवरून आधुनिकीकरणाचा विचार करण्यापेक्षा वैज्ञानिक दृष्टीकोनातून त्यानी विचार केला आहे. वैज्ञानिक ज्ञानाचा विस्तार, तांत्रिक कौशल्य, आणि तांत्रिक संसाधाने ज्या एका विशिष्ट समाजाकडे असतात. त्या ठिकाणी आधुनिकीकरणाची प्रक्रिया अधिक दिसून येत असली तरी, आधुनिकीकरणाचा उद्देश हा सर्व व्यापी स्वरूपाचा असल्याने तो कोणत्याही एका राष्ट्राशी मर्यादित रहात नाही.

भारतातील आधुनिकीकरणाची प्रक्रिया प्रामुख्याने ब्रिटीश कालखंडात झाली. या कालखंडात भारतीय समाजामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे परिवर्तन घडून आले. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर संसदीय लोकशाही व्यवस्थे मुळे परिवर्तन प्रक्रियेला चालना मिळाली. जाती व्यवस्थे मध्ये बदल घडून आले भारतामध्ये आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून या ठिकाणाच्या परंपरा पूर्णपणे नष्ट झालेल्या नाहीत. उलट आधुनिकीकरण आणि परंपरा यांचा एकत्रित संगम या ठिकाणी आढळतो.

भारतीय समाज-व्यवस्थे मध्ये, नविन मूल्य व्यवस्थ, अर्थिक उदारिकरण सामाजिक मूल्यांच्या मधील बदल दिसून येत असला तरी, ग्रामीण भारतामध्ये परंपरागत मूल्ये, जाती व्यवस्था अंधश्रद्धा यांचे कांही प्रमाणात वर्चस्व आढळून येते. त्यामुळे आधुनिकीकरणाचा मोठा प्रभाव प्रामुख्याने शहरांच्या ठिकाणीच दिसतो.

**स्वंय अध्ययन साठीचे प्रश्न २** (Check your Progress)-

**जोडया जुळवा**

| **'अ गट'** | **'ब गट'** |
|---|---|
| १) आधुनिकीकरणाची संकल्पना | योगेंन्द्र सिंग |
| २) सांस्कृतिक बदलातून आधुनिकीकरण | धर्म निरपेक्षता |
| ३) आधुनिकीकरणाचा मापदंड | इंटर नेट |
| ४) जनसंपर्काचे माध्यम | पाश्चात्य ब्रिटीशांमुळे |
| ५) भारतातील आधुनिकीकरण | एम.एन. श्रीनिवास |

## घटक – २ (ब)

### २.३.२ सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिया – संस्कृतीकरण आणि धर्मनिरपेक्षीकरण (Processes of Change-Sanskritization and Secularization)

भारतीय समाजरचनेतील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी म्हणून, 'सांस्कृतीकरण' आणि 'धर्म निरपेक्षीकरण' या दोन प्रमुख परिवर्तन प्रक्रिया विचारात घेतल्या जातात. ज्यावेळी सामाजिक परिवर्तन 'ऐक प्रक्रिया' म्हणून विचारात घेतो त्यावेळी, सातत्य (Continuity) या अर्थाने, सामाजिक परिवर्तन अभ्यासले जाते. ज्यावेळी परिवर्तनाची प्रक्रिया घडून येते त्या वेळी, सामाजिक स्थित्यंतराच्या माध्यमातून समाज एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेमध्ये जातो. परंतू परिवर्तनाचे स्वरूप, दिशा मात्र प्रत्येक अवस्थांच्या मध्ये एक सारखी नसते. काही वेळा परिवर्तन प्रक्रिये मध्ये चढ-उतार प्रगतशील, अप्रगतशील स्वरूपाचे असून शकते. त्यामुळे परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे एका अर्थाने, समाज व्यवस्थेचे सातत्य टिकवणारी आणि समाज व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणणारी प्रक्रिया असते.

सामाजिक परवर्तन प्रक्रियेचा अर्थ जाणून घेतलल्यानंतर परिवर्तन प्रक्रियेचे प्रत्यक्ष स्वरूप जाणून घेण्या संबंधीचे दाने दृष्टीकोन म्हणून संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेचा आणि धर्मनिरपेक्षीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून भारतीय समाजामध्ये कशा प्रकारच्या बदलाची प्रक्रिया घडून आली. हे जाणून घेणार आहोत.

**१) सांस्कृतिकरणाची प्रक्रिया** (Process of Sanskritization) :

पारंपारीक भारतीय समाजरचनेमधील सांस्कृतीक गतीशिलतेच्या संदर्भात 'सांस्कृतिकरण' ही संकल्पना सर्व प्रथम एम.एन.श्री निवास यांनी उपयोगात आणली. श्री निवास यांनी त्यांच्या म्हैसूर मधल्या 'कूग्र' समुदायाच्या समाजशास्त्रीय अध्ययना मध्ये, अशा प्रकारच्या परिवर्तनाचा अभ्यास केला की, ज्या मध्ये 'कूग्र' सारख्या कनिष्ठ स्तरावर असणारे जाती समुदाय, त्या ठिकाणच्या श्रेणीरचनेमध्ये आपल्या जातीचा दर्जा किंवा स्थान उंचावण्यासाठी म्हणून उच्च स्तरावर असणाऱ्या 'ब्राह्मण' समुदायाच्या प्रथा परंपराचे अनुकरण करीत असत. 'कूग्र' समुदाय हा मांसभक्षण, मद्यपान आणि आपल्या देव-देवतांना प्राण्यांचे बळी देणारा कनिष्ठ समुदाय आहे. म्हणून त्या ठिकाणच्या उच्च जातींनी 'कूग्र' समुदायास जातीच्या श्रेणी रचनेमध्ये कनिष्ठ स्थान दिले होते. याच 'कूग्र' समुदायाने नंतर ब्राम्हण समुदायांच्या धार्मिक विधी, पोशाख, अन्न इ.चे अनुकरण काही पिढ्या पर्यंत करत

आल्याने नंतर त्या स्वतःला जाती श्रेणी रचनेमध्ये उच्च स्थानावरच्या समजू लागल्या. या प्रकारच्या सांस्कृतिक गतीशीलतेच्या प्रक्रियेला श्रीनिवास यांनी सर्व प्रथम ब्राह्मणीकरण अशी संज्ञा दिली होती. परंतू या संज्ञेची जागा नंतर 'सांस्कृतीकरण' या संज्ञेने घेतली.

आपल्या भारतीय समाजरचने मध्ये 'जात' (Caste) एक 'बंद व्यवस्था' (Closed System) म्हणून समजली जात असताना, त्यामध्ये सामाजिक गतीशीलता किंवा परिवर्तन अशक्य आहे. असा दावा कांही अभ्यासक करत असताना, एम.एन.श्रीनिवास यांनी सामाजिक गतीशीलता ही जाती समुदाया अंतर्गत आणि जाती बाहेर कशा प्रकारे घडून येते. या बद्दलचे स्पष्टीकरण देण्यासाठी म्हणून 'सांस्कृतीकरण' ही संकल्पना त्यांनी त्यांच्या 'Religion and Society among the coorgs' या पुस्तकामध्ये मांडली.

**सांस्कृतीकरणाची व्याख्या :**

एम.एन.श्री निवास यांनी 'सांस्कृतीकरणाच्या' संकल्पनेची व्यापकता स्पष्ट करताना, त्याची व्याख्या प्रत्येक वेळी बदलण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीला त्यांनी 'सांस्कृतीकरण' म्हणजे कनिष्ठ जाती समूदायाच्या मधील सामाजिक गतीशीलतेची अशी प्रक्रिया की ज्या द्वारे त्या जाती श्रेणीरचनेमध्ये उच्च स्थानाकडे जाण्यासाठी शाकाहारी आणि मद्यपानाचा त्याग एक दोन पिढ्या पासून करीत आलेल्या असतात. अशी व्याख्या केली.

त्यानंतर त्यांनी सांस्कृतीकरण ही संकल्पना वेगळ्या स्वरूपात स्पष्ट करताना १९६६ मध्ये त्यांनी 'Social Change In Modern India' या पुस्तकामध्ये सांस्कृतिकरणाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले. त्यांच्या मते, सांस्कृतिकरण म्हणजे अशा स्वरूपाची प्रक्रिया की ज्याद्वारे, कनिष्ठ जाती किंवा अदिवासी अथवा इतर समुदाय की जे आपल्या रूढी प्रथा परंपरा, विचार आणि रहाणीमान, उच्च स्थानावर असणाऱ्या 'द्वीजा-जाती' (Twice-born Caste) प्रमाणे बदलण्याचा प्रयत्न करतात त्याप्रक्रियेला सांस्कृतिकरण असे म्हणतात.

**सांस्कृतिकरण प्रक्रियेचे स्वरूप :**

सांस्कृतिकरण प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करताना प्रामुख्याने खालील प्रमुख घटकांचा विचार केला जातो.

**१) सांस्कृतिकरण ही एक अनुकरणात्मक प्रक्रिया आहे :**

सांस्कृतिकरण प्रक्रिये अंतर्गत, कनिष्ठ जाती आपला सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी उच्च जातीमधल्या व्यक्तींच्या रहानीमानाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. प्रामुख्याने ज्या उच्च जातीचे अनुकरण केले जाते त्या उच्च जाती 'वर्चस्व असणाऱ्या जाती' (Dominant Caste) म्हणजे 'ब्राह्मण' असतात. त्यानंतर त्या ठिकाणच्या इतर ब्राम्हणेत्तर उच्च जातीचे सुद्धा अनुकरण कनिष्ठ जाती करीत असतात. हिंदूच्या मधल्या काही कनिष्ठ जाती ब्राम्हणांच्या मधील धार्मिक विधींचे, विवाह पद्धती, महिलांना द्यावयाचे स्थान, खाण-पाण आणि पोशाखांच्या सवयी, जन्माला येणाऱ्या अपत्याचे नामकरण, विचार आणि मूल्ये इ. सारख्या घटकांचे अनुकरण करतात. अनुकरण करण्याचा कालावधी दिर्घकालीन स्वरूपाचा असून साधारणपणे या प्रक्रियेला एक किंवा दोन पिढीचा अवधी लागतो.

### २) सांस्कृतिकरण प्रक्रियेच्या अटी :

सांस्कृतिकरणाच्या, अनुकरण प्रक्रियेत, ज्या जाती समुदायांचे अनुकरण केले जाते त्या एक तर जाती श्रेणी रचने मध्ये उच्च स्थानावर असाव्या लागतात शिवाय त्यांचा अर्थिक, सामाजिक दर्जा उच्च असण्याबरोबरच त्यांना समाजात मान-सन्मान असणे गरजेचे असते. तसेच कनिष्ठ जातींच्या मध्ये दर्जा उंचावून घेण्यासंबंधीची इच्छा शक्ती असणे गरजेचे असते. त्याच प्रमाणे उच्च आणि कनिष्ठ जाती समुदायांचा नेहमीच्या जीवनात सततचा संपर्क असणे आवश्यक असते. आणि कनिष्ठ जातींचा उच्च जाती हा 'संदर्भ समूह' (Reference Group) म्हणून ओळखला जातो.

### ३) सांस्कृतिकरण प्रक्रियेची व्यापकत्ता :

सांस्कृतिकरण प्रक्रिया केवळ हिंदूच्या मधील जाती व्यवस्थे पुरती मर्यादित असणारी प्रक्रिया नसून, त्यामध्ये आदिवासी, मध्य भारतातील गौंड आणि ओरान तसेच हिमालयातील काही जमाती सुद्धा सांस्कृतिकरण प्रकियेच्या प्रभावाखाली येतात. कारण या अदिम जमाती आपण हिंदू असल्याचा दावा करतात. तसेच बऱ्याच अंशी कनिष्ठ जाती क्षत्रिय आणि ब्राम्हण जातीचे अनुकरण करत असल्या तरी, काही ठिकाणी उच्च जाती सुद्धा कनिष्ठ जातींच्या व अदिवासींच्या कृतीचे अनुकरण करतात. उदा. काही ब्राम्हण स्थानिक देव-देवतांना प्राण्यांचे बळी देत असत किंवा भारतामध्ये मुस्लीम समुदायाचा प्रभाव उच्च आणि कनिष्ठ समुदायावर झालेला आढळतो. त्यामुळे सांस्कृतिकरण म्हणजे केवळ एकमार्गी प्रक्रिया नसून ती 'द्वी मार्गी' प्रक्रिया आहे.

### ४) सांस्कृतिकरण म्हणजे रचनात्मक परिवर्तन नसते :

सांस्कृतिकरणामुळे रचनात्मक परिवर्तन घडून येत नसते, केवळ समाजातील काही विशिष्ट अशा जाती समुदायाच्या मधील स्थानामध्ये (Positive) बदल घडून येत असतो. त्याचा एकूण समाजरचनेवर व्यापक परिणाम घडून येत नसतो. तसेच सांस्कृतिकरणाच्या माध्यमातून कनिष्ठ जातींना तात्काळ आणि आपोआप वरच्या क्रमांकाचे स्थान मिळत नसते, तर त्यासाठी एक-दोन पिढीचा अवधी जावा लागतो. तसेच कांही प्रदेशात कनिष्ठ जातींना वरिष्ठ स्थान प्राप्त करण्यासाठी जेवढा वेळ लागला तेवढाच वेळ इतर प्रदेशातील ठिकाणी लागतो असे निश्चित विधान या ठिकाणी करता येत नाही.

### ५) सांस्कृतिकरण प्रक्रियेला गती देणाऱ्या पूरक बाबी :

समाजात घडून येणारी औद्योगिकरणाची प्रक्रिया, व्यावसायीक गतीशीलता, दळण-वळण आणि प्रसार माध्यम, साक्षरतेचा प्रसार, पाश्चात्य तंत्रज्ञानाचा वाढता उपयोग, वहातूकीच्या साधनांमधील प्रगती इ. सारख्या घटकांचा परिणाम म्हणून सांस्कृतिकरण प्रक्रियेला अधिक चालना मिळते. शिवाय संसदीय लोकशाहीच्या स्वीकार आणि वैश्वीक स्वातंत्र्य सुद्धा सांस्कृतिकरण प्रक्रियेचा परिणाम असू शकतो. एम.एन.श्री निवास यांच्या मते, ज्या वेळी सांस्कृतिकरणच्या प्रक्रियेतून उच्च जातीचे विधी आणि त्यांचे स्थान यांच्या मधील अंतर कमी होते. त्यावेळी कनिष्ठ जातींना धर्मनिरपेक्षतेचा दर्जा मिळतो. त्या मुळे त्या उच्च जातींच्या रूढी परंपरा, सण, उत्सव, रहानीमान इ. सर्व घटकांचे अनुकरण करतात.

त्यामुळे एम.एन. श्री निवास यांच्या मते सांस्कृतिकरण ही संपूर्ण भारतभर घडून येणारी प्रक्रिया आहे.

फक्त तिचे स्वरूप काही प्रांतात अधिक तर काही ठिकाणी कमी आढळते. अन्यथा भारतीय इतिहासामध्ये सर्वत्र आढळून येणारी प्रक्रिया आहे.

**६) परंपरागत जाती-व्यवस्थे विरोध करणारी प्रक्रिया :**

एम.एन. श्री निवास यांच्यामते भारतातील परंपरागत जाती व्यवस्था मिळालेल्या दर्जावर (Ascribed Status) आधारीत असल्याने साहाजिकच, कनिष्ठ जाती समुदायांना समाज जीवनातल्या संधी पासून दूर रहावे लागत असे. तसेच ज्या संधी उच्च जातींना मिळत होत्या त्या प्राप्त करण्याच्या उद्देशाने, सांस्कृतिकरण सारख्या प्रक्रियेचा संदर्भ उपयुक्त वाटत असलयाने ही प्रक्रिया भारतीय समाज व्यवस्थेमध्ये एक सामाजिक गतीशीलतेची प्रक्रिया म्हणून संबोधली जाते.

**२) धर्मनिरपेक्षीकरणाची प्रक्रिया** (Process of Secularization) **:**

एम.एन.श्री निवास यांच्या मते, ब्रिटीश राजवटीचा परिणाम म्हणून भारतीय समाज जीवन आणि संस्कृतीमध्ये धर्मनिरपेक्षीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेच्या माध्यमातून दळण-वळणाचा विकास, शहरांची वाढ, क्षेत्रीय गतीशीलता आणि शिक्षण प्रसाराला गती मिळाली. दोन महायुद्धे आणि महात्मा गांधीची कायदेभंगाची चळवळ यांच्या माध्यमातून एकूणच भारतीय जनसमुदायामध्ये सामाजिक आणि राजकीय वैचारीक बदल घडून येत होते. त्यामुळे देखील धर्म निरपेक्षीकरणाच्या प्रक्रियेला अधिक गती मिळत गेली.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर, भारतीय समाजात धर्मनिरपेक्षीकरणाची प्रक्रिया इतकी खोलवर रूजली की, त्याचे प्रत्यंतर म्हणून आपण त्या वेळी भारताला धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून घोषीत केले. भारतीय राज्य घटनेमध्ये सुद्धा, कायद्या समोर सर्व नागरीकांना समान दर्जा देण्यात आला व प्रौढ मतदान आणि नियोजन बद्ध विकास कार्यक्रमाची सुरूवात आली. या अगोदरच्या सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेचा देखील असाच परिणाम भारतीय समाज रचनेवर झाला असे आपण म्हणत असलो तरी, सांस्कृतिकरण ही प्रक्रिया एका विशिष्ट अदिवासी आणि हिंदू समुदायापुरती मर्यादित होती. मात्र धर्मनिरपेक्षीकरण ही संपुर्ण भारतीय समाजामध्ये बदल घडवून आणणारी प्रक्रिया होती. तसेच उच्च शिक्षित आणि नागरी समुहाचा मध्ये धर्म निरपेक्षीतेचा मोठा प्रभाव होता.

अशा प्रकारे धर्म निरपेक्षीकरणाच्या माध्यमातून भारतीय समाजातील धर्माचे महत्व कमी होत चालेले होते. धर्मनिरपेक्षीकरणाच्या प्रक्रियेमध्ये धर्म आणि समाजातील इतर सामाजिक संस्था उदा. शासन संस्था, अर्थ संस्था, कायदा आणि न्याय व्यवस्था या स्वतंत्रपणे कार्य करू लागल्या. म्हणजेच कोणत्याही एका धर्माच्या प्रभावाखाली या संस्था कार्य करणार नाहीत. ब्रिटीशांची चर्च किंवा धर्म आणि शासन ज्याप्रमाणे स्वतंत्र कार्य करीत होती. तीच धर्मनिरपेक्षतेची कल्पना म्हणून भारतात रूढ झाली.

धर्मनिरपेक्षीकरणाच्या संबंधामध्ये दुसरा महत्वाचा एक घटक विचारात घेतला जातो तो म्हणजे 'विवेक वाद' (Rationalism) विवेक वादाच्या विचार प्रणालीनुसार आपण आपल्या सभोवतालच्या विश्वातील सामाजिक घटनांच्या मागील कार्य करण संबंधाच्या अभ्यास करूनच घटनेची सत्यता जाणून घेत असतो. त्या मुळे अशा सैंधातिक विचार प्रणाली नुसार ज्या कांही अतार्तिक (Irrational) स्वरूपाच्या घटना असतात. त्यांचा त्याग करण्याची सवय विवेकवादी विचार प्रणालीतून विकसित होत असते. विवेकवादी विचारप्रणालीतून पारंपारिक श्रद्धा मूल्ये यांची जागा आधुनिक विज्ञानवादी विचार घेत असतात. याचाच परिणाम म्हणून, भारतातला हिंदू

समुदाय हा धर्म निरपेक्षीकरणामुळे अधिक प्रभावित झाला होता. हिंदू समुदायाशी संबंधीत असणारी जाती व्यवस्था आणि त्या मधील शुद्ध-अशुद्धता पूर्णता मोडकळीस आली. हिंदू समुदायातील विविध घटकांवर धर्म निरपेक्षीकरणाचा झालेला प्रभाव हा वेगवेगळ्या स्वरूपाचा होता. त्यामुळे दैनंदिन जीवन, विधी परंपरा, सण, उत्सव, व्यवसाय इ. सारख्या घटकांवर धर्मनिरपेक्षीकरणाचा प्रभाव दिसून येवू लागला.

- **धर्मनिरपेक्षीकरणाची व्याख्या :**

एम.एन. श्री निवास यांनी धर्म निरपेक्षीकरणाची व्याख्या करताना म्हटले आहे की, सुरूवातीला धार्मिक स्वरूपाची म्हणून समजली जाणारी धर्मनिरपेक्षीकरणाची प्रक्रिया आता धार्मिकते पासून स्वतंत्र असणारी प्रक्रिया, समाज जीवनातील आर्थिक राजकीय कायदेव्यवस्था इ. पासून देखील स्वतंत्र समजली जाते, त्यामुळे धर्मनिरपेक्षीकरण ही एक 'धर्मविरोधी' (Anti-religious) प्रक्रिया समजली जाते. सोप्या शब्दात धर्मनिरपेक्षीकरणामध्ये धर्माचा प्रभाव अथवा वर्चस्व क्षीण केलेले असते. भारतामध्ये प्रामुख्याने धर्मनिरपेक्षीकरणाची प्रक्रिया अत्यंत जलदगतीने घडून येत असताना मुख्यता ती हिंदू समुदाय आणि उच्चशिक्षीत, नागरी वर्गामध्ये ती अधिक प्रमाणात आढळते.

- **धर्म निरपेक्षीकरणातून घडून आलेले परिवर्तन :**

ब्रिटीश राजवटीचा परिणाम म्हणून जी धर्म-निरपेक्षीकरणाची प्रक्रिया भारतामध्ये सुरू झाली असली तरी, प्रामुख्याने औद्योगीकरण आणि नागरीकरणामुळे या प्रक्रियेला अधिक गती मिळाली. अशा या धर्म निरपेक्षीकरणाचा प्रभाव भारतीय समाजातील कोण-कोणत्या घटकांवर कशा प्रकारे पडला त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

**१) जाती व्यवस्थेमधल्या शुद्ध अशुद्धतेच्या विचारांवर झालेला धर्म निरपेक्षीकरणाचा परिणाम :**

हिंदू धर्मामध्ये जाती व्यवस्था शुद्ध-अशुद्धतेच्या तत्वावर आधारीत होती. तसेच हिंदू धर्माआचरणाप्रमाणे उच्च आणि कनिष्ठ जाती समुदायातील व्यक्तींच्या कृती शुद्ध-अशुद्ध समजल्या जात होत्या. उदा. शूद्रांनी करावयाच्या कृती जर उच्च जातीतल्या व्यक्तींनी केल्या तर त्या अशुद्ध समजल्या जात असत. अस्पृशतेची संकल्पना याच तत्वावर आधारीत होती. उच्च जाती समुदायातील व्यक्तीचा कनिष्ठ जाती समुदायातील व्यक्तीशी असणारा सामाजिक संबंध अगदीच कमी प्रमाणात होता. किंबहूना 'कनिष्ठ व्यक्तीच्या सावली मुळे विटाळ होतो' अशी समजूत त्या काळी रूढ होती. त्याचप्रमाणे खाण्या-पिण्यावर देखील नर्बंध होते. काही ठिकाणी तर माहिलांना त्यांच्या होणाऱ्या मासिक पाळी मुळे अपवित्र अथवा अशुद्ध समजले जात असे.

औद्योगिकरणाच्या प्रभावा खाली, हिंदू धर्मातल्या शुद्ध-अशुद्धतेच्या विचारांवर मोठा परिणाम घडून आला. एकेकाळी उच्च जाती मधील व्यक्ती कनिष्ठ जातीचा व्यवसाय करण्यापेक्षा उपाशी पोटी रहाणे पसंत करत होती. तीच व्यक्ती आता सर्वक्षेत्रात आढळते. ब्राम्हण जातीच्या व्यक्तींची चप्पल दुकाने सुरू झाली. व्यावसायिक गतीशीलतेचा परिणाम म्हणून व्यवसाय निवडीवर निर्बंध राहिले नाहीत. केवळ व्यवसायावर नव्हे तर, उच्च आणि कनिष्ठ जाती एकत्रित सर्व व्यवहार करू लागले. असे असले तरी, काही उच्च शिक्षीत व्यक्ती काही प्रथा परंपरांचे पालन आरोग्य आणि स्वच्छतेसाठी म्हणून धर्माचे पालन करतात. मात्र शुद्ध-अशुद्धतेच्या मागे असणारे धार्मिक कारण आता मागे पडले असून त्याची जागा 'धर्मनिरपेक्षकरणाच्या' विचाराने घेतली आहे.

**२) हिंदू संस्कारपद्धतीवर झालेला धर्मनिरपेक्षीकरणाचा परिणाम :**

संस्कार हे हिंदू समुदायाचे प्रमुख लक्षण समजले जाते. त्यामुळे हिंदूच्या मधील विविध जातींचे विविध

संस्कार आवश्यक समजून ते वेगवेगळ्या प्रसंगामध्ये आयोजित केले जातात. उदा. ब्राम्हण जातीमध्ये उपनयन किंवा मूंज केल्या खेरीज तो ब्राम्हण समजला जात नसे. हिंदूच्या मध्ये अनेक संस्कार आढळून येतात पैकी गर्भधान, जात कर्म, नामकरण, उपनयन, विवाह आणि अत्यंविधी अशा संस्काराचा समावेश त्यामध्ये होतो.

धर्मनिरपेक्षीकरणाचा परिणाम म्हणून संस्कार पद्धतीवर मोठा परिणाम झालेला दिसतो. जात कर्म, गर्भधान सारखे संस्कार पूर्णता काळबाह्य झालेले दिसतात. 'नामकरण'विधी हा आज देखील नविन मूल जन्माला आल्यानंतर केला जात असला तरी, त्या पाठीमागील धार्मिक भावना फारशी नसते. केवळ सर्व मित्र, नातेवाईकांना एकत्रित आमंत्रण देऊन भोजनाचा आनंद घेतला जातो. विवाह सारख्या संस्कारमध्ये सुद्धा केवळ अग्नीला फेरे घेणे आणि कन्यादान या दोन घटका वितरिक्त विवाह सोहळा म्हणून साजरा केला जातो. थोडक्यात धर्मनिरपेक्षीकरणाचा परिणाम म्हणून संस्कार पद्धतीवर धर्माचा प्रभाव पूर्णता नष्ट झाला आहे.

**३) कुटूंब संस्थेवरील धर्मनिरपेक्षीरणाचा परिणाम :**

विवाह आणि कुटूंब या दोन प्रमुख सामाजिक संस्था असून, विवाहाशी संबंधीत असणारी घटसस्फोटाची प्रक्रिया पूर्णता धर्मनिरपेक्षीकरणामुळे कायदेशीर झाली आहे. हिंदूच्या मधील विविध जाती मधल्या कुटूंबाचे दैनंदिन जीवन धर्मनिरपेक्षीकरणामुळे बदलून गेले आहे. कुटूंबातील स्वयंपाकघराचे पावित्र्य विचारात घेतले जात नाही. आहार आणि धर्म यांचा क्वचित संबंध आढळतो. सण समारंभाचे स्वरूपदेखील धार्मिकते पेक्षा सामाजिक होत गेले उदा. होळी, गणेश उत्सव, दिपावली साजरे करण्यापाठीमागे धार्मिकते पेक्षा करमणूकीचा हेतू अधिक जाणवतो. तसेच तीर्थक्षेत्राला भेटी देण्या पाठीमागचा धार्मिक हेतू कमी झाला असून पर्यटन आणि हवा पालट या हेतूने लोक आज पर्यटन करत असतात.

- **ग्रामीण भारतीय समाज जीवनावरील धर्मनिरपेक्षीकरणाचा परिणाम :**

शहरी समाज जीवनावर धर्मनिरपेक्षतेचा प्रभावा हा नैसर्गिक होता. परंतू ग्रामीण समाज जीवन देखील धर्म निरपेक्षीकरणाच्या प्रभावातून सुटलेले नाही. पुर्वीच्या ग्रामपंचायती धार्मिक घटकांवर अधिक आधारीत होत्या आज त्या राजकीय घटकामुळे प्रभावीत झाल्या आहेत. आज खेडूत व्यक्ती अर्थिक स्वार्था पोटी धर्माला दुय्यम स्थान देऊ लागला आहे. त्यामुळेच ब्राम्हणापेक्षा सावकाराला ग्रामीण भागात महत्व प्राप्त झाले. तसेच जर एखाद्या कनिष्ठ जाती मधल्या व्यक्तीकडे अधिक संपत्ती असेल तर तिला उच्च जातीतल्या व्यक्ती पेक्षा अधिक मान सन्मान आणि प्रतिष्ठा मिळते. ग्रामीण कुटूंब संस्थेवर धर्मनिरपेक्षीकरणाचा परिणाम म्हणून शहरी कुटूंबाप्रमाणे ग्रामीण कुटूंब दिसून येत आहे. असे असले तरी शहरांच्या तुलनेत ग्रामीण समाजावर झालेला प्रभाव कमी आढळतो आंतरजातीय विवाहाचे प्रमाण अगदीच कमी प्रमाणात ग्रामीण भागात आढळते. ग्रामीण पंचायतीचे निर्णय धार्मिकतेच्या अधारापेक्षा, सामाजिक आणि राजकीय आधारावरती सोडवले जातात. शेती आणि पुशपालन व्यवसायामध्ये सर्व जातीच्या व्यक्ती एकत्रित काम करत असलेल्या आढळतात.

- **धर्मनिरपेक्षीकरणाची कारणे :**

धर्मनिरपेक्षीकरणाची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**१) आधुनिक शिक्षण :**

ब्रिटीश राजवटीमध्ये भारतामध्ये आलेल्या आधुनिक शिक्षणाचा परिणाम म्हणून धर्मनिरपेक्षकरणे

प्रक्रियेला अधिक गती मिळाली. कारण आधुनिक शिक्षणातून मिळालेल्या इंग्रजी, विज्ञान आणि आधुनिक सामाजिक राजकीय विचार प्रक्रियेमुळे व्यक्ती धर्मनिरपेक्षीकरणाकडे वळू लागल्या. शिक्षणामुळे तयार होऊ लागलेल्या या बुद्धीवंत वर्गाने अंधश्रद्धा आणि परंपरांना नाकारून, समाजजीवनाचे टिकात्मक विश्लेषण करताना, विज्ञान आणि अनुभवाच्या पातळीवर चौकशी सुरू केली. सह.शिक्षण (Co-education) पद्धतीचा परिणाम म्हणून आंतरजातीय विवाहाला अधिक समाज मान्यता मिळू लागली. आधुनिक शिक्षणातून तयार झालेल्या साक्षर व्यक्तींच्या व्यवहारवादी विचार सरणीचा परिणाम म्हणून त्या अधिका अधिक धर्मनिरपेक्ष विचारांचा स्वीकार करू लागल्या.

**२) वहातूक आणि दळण-वळणाच्या साधनामध्ये झालेला विकास :**

वहातूक आणि दळण-वळणाच्या साधनामध्ये झालेल्या सुधारणांचा परिणाम म्हणून धर्मनिरपेक्षीकरणाच्या प्रक्रियेला अधिक चालना मिळाली. रेल्वे, बस, टॅक्सी सारख्या वहातूकीच्या साधनामुळे व्यक्ती सहजपणे आणि वारंवार परस्परांच्या संपर्कात येवू लागल्या. त्यांचा परस्परांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलून गेला. त्यामुळे एकूणच भारतीय समाज रचनेमध्ये असणाऱ्या जाती व्यवस्थेला तडा जाऊन अस्पृशतेची भावना कमी झाली. ज्यावेळी, वहातूक आणि दळण-वळणाच्या साहाय्याने ग्रामीण व्यक्ती शहरांकडे धाव घेवू लागल्या. त्यावेळी, शहरातून परत आपल्या गांवी जात असताना त्यांना व्यक्ती स्वातंत्र्याचा संदेश मिळत गेला.

**३) सामाजिक आणि धार्मिक सुधारणावादी चळवळी :**

ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात राजाराम मोहन रॉय, केशव चंद्र सेन, महादेव गोविंद रानडे, महात्मा गांधी, स्वामी दयानंद सरस्वती सारख्या समाजसुधारकांनी त्यांच्या सामाजिक आणि धार्मिक चळवळींच्या माध्यमातून लोकांना चिकित्सक आणि विवेकशील विचार करण्याची प्रेरणा दिली त्याचाच परिणाम म्हणून धर्मनिरपेक्षी करणाला गती मिळाली.

**४) कायद्यातील सुधारणा :**

हिंदू कोड बिलामुळे, हिंदू समुदायाला अधिक धर्मनिरपेक्ष करण्याचा प्रयत्न केला त्याच प्रमाणे माहिलासंबंधीच्या अनेक कायद्यामुळे त्यांना घटस्फोट, पोटगी, वारसा हक्काची तरतूद, दत्तक योजना इ. संबंधीची माहिती मिळू लागल्याने त्या अधिक सक्षम झाल्या. तसेच १९५५ च्या अस्पृशता निवारण कायद्यामुळे जाती व्यवस्थेमधील शुद्ध-अशुद्धतेची कल्पना मोडकळीस आली. आधुनिक युगात कायद्यासमोर सर्व व्यक्तींना समान स्थान देण्यात आले. शिवाय भारतीय राज्य घटनेनुसार भारत हे एक धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक म्हणून घोषित करण्यात आले. आणि म्हणूनच भारतात धर्मनिरपेक्ष विचारांना महत्त्व प्राप्त झाले.

**५) भारतीय संस्कृती आणि व्यवसायांचे धर्मनिरपेक्षीकरण :**

सामान्यता भारतीय संस्कृतीवर धर्माचा प्रभाव अधिक दिसून येत असला तरी, त्या मध्ये नंतरच्या काळात सुधारणा होत गेलेली दिसते धर्मनिरपेक्षीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम म्हणून आधुनिक शिक्षण, सिनेमा, रेडिओ, वृत्तपत्र इ. च्या माध्यमातून बदल घडून येत आहे. त्यामुळे आधुनिक भारतातल्या संस्कृतीचा पार्याधर्म नसून धर्मनिरपेक्ष विचार आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीशी संबंधीत असणाऱ्या वाङःमय, कला, संगीत इत्यादी सारख्या घटकांवर असणारा धर्माचा प्रभाव कमी होत जाऊन, वैज्ञानीक, लोकशाही वादी आणि

तार्कीक विचारमुळे तो प्रभावीत होत आहे. भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. असा संदेश सर्वत्र जात आहे. तसेच प्राचीन काळी भारतामध्ये व्यवसाय निवड धार्मिक घटकांशी निगडीत होती. काही धार्मिक शिल्पकला मधून जातीनिहाय व्यवसाय निश्चित असल्याचे सांगीतले जात असे परंतू आधुनिक काळात, व्यावसायिक स्वातंत्र्यामुळे व्यवसाय निवड धर्मांवर आधारीत राहिलेली नाही.

### ६) राजकीय पाठबळाचा अभाव :

भारतीय समाजात प्राचीन काळी धर्माला राजाश्रय दिला जात होता. त्यामुळे हिंदू धर्माला महत्त्व आणि स्थान मिळत गेले. त्यानंतर सुद्धा ब्रिटीश काळखंडात लावण कारे, कोचीन, म्हैसूर, बडोदा, जम्मू काश्मीर सारख्या संस्थानिकांनी हिंदू धर्माला राजाश्रय दिला होता. परंतू स्वांतत्र्य प्राप्तीनंतर ज्यावेळी हिंदू धर्माचे महत्त्व कमी झाले. भारतामध्ये बहुसंख्य हिंदूची संख्या आढळते. परंतू ज्यावेळी हिंदू धर्माचा राजकीय पाठिंबा नष्ट झाला. त्यावेळी पासून त्याचे महत्व कमी होऊ लागले. त्यांना राज्याकडून अर्थिक मदत मिळणे बंद झाले. धार्मिक मठ सुद्धा शासनाच्या अधिकाराखाली आले. धर्मगुरूंना मिळणारे अधिकार सन्मान आणि त्यांचा प्रभाव कमी होत गेल्याने त्यांनी राजकाराणाचा आश्रय घेतला. या सर्वांचा परिणाम म्हणून धर्मनिरपेक्ष करण प्रक्रियेला चालना मिळत गेली.

### क) धर्मांतर (Religious Conversions) :

१९३१ च्या अहवालानुसार, भारतामध्ये एकूण १० धार्मिक समूह आढळतात त्यामुध्ये हिंदू, जैन, बौद्ध, पारशी, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, ज्यू आणि इतर अदिवासी आणि बिगरअदिवासी धार्मिक समूहांचा त्यामध्ये समावेश होतो. त्यानंतर १९६१ च्या अहवालानुसार केवळ सात धार्मिक समुदायांचा उल्लेख केला जातो. त्यामध्ये हिंदू, जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख आणि इतर धर्म आणि धर्म संप्रदायाच समावेश होतो.

भारतामध्ये धर्म ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. उदा. अदिवासी धर्म आणि संस्कृतिक घटक हे परस्परांमध्ये एकत्रित स्वरूपात अनेक ठिकाणी आढळून येतात. भारतामध्ये गेल्या दोन दशकापासून ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांतराची ही प्रक्रिया १९२० मध्ये आणि त्यानंतर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुद्धा ती सुरू असलेली दिसते. बिहार, बंगाल, आसाम आणि देशाच्या इतर काही प्रांतामध्ये बहुतांशी अदिवासींनी हिंदू धर्मीयांच्या धार्मिक प्रथांचा स्वीकार केलेला आढळतो. हजारो हरिजनांनी उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये धर्मांतर करून बौद्ध धर्मांचा स्विकार केलेला दिसतो. परंतू सक्तीने किंवा दबाव आणून धर्मांतर करणे भारतीय राज्य घटने विरोधात आहे. धर्मांतर घडून येण्याची काही विविध कारणे आहेत. धर्मांतरांच्या प्रश्नावरती अलिकडच्या काळात अभ्यासकामध्ये व्यापक चर्चा सुरू आहे.

### १) हिंदू धर्माचे जुलमी स्वरूप :

काही अभ्यासकांच्या मते हिंदू धर्मातील कर्मठवादी व धर्मांतराला कारणीभूत आहे. कारण हिंदू धर्मामध्ये असलेली ताठर जाती व्यवस्था एक बंद वर्ग आहे. त्यामध्ये विशिष्ट जाती समुदायांना जातीच्या श्रेणीरचनेमध्ये उच्च दर्जा दिली जातो आणि उर्वरित कनिष्ठ जाती समूहांना समाजिक जीवनातल्या संधी पासून दूर रहावे लागते. शिवाय त्यांच्यावर होणारा अन्याय आणि त्यांना दिली जाणारी वागणुक याचा परिणाम म्हणून आंबेडकरानी धर्मांतराचा निर्णय घेवून बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला दिसतो. कांहीनी धर्मातील वर्ण

व्यवस्था अथवा त्यांची विचार सरणी एका विशिष्ट वर्गाला पोषक ठरेल अशाच स्वरूपाची असल्याने इतरांवर अन्याय झालेला दिसतो, मंदिर प्रवेश नाकारला जातो. त्यांना पशूसमान वागणूक दिली जाते. यासर्व कारणांचा परिणाम म्हणून धर्मांतर घडून येत असते.

**२) ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मीयांच्याकडून झालेली सक्ती :**

काही अभ्यासकांचे वरील मताच्या अगदी विरूद्ध असलेले आढळते. त्यांच्या मते, ख्रिश्चन धर्माशी संबंधित असणारे मिशनरी आणि त्यांच्या संस्था भारतामध्ये असणाऱ्या वंचित वर्गाच्या दारिद्र्याचा फायदा घेवून तसेच अदिवासींच्या मध्ये असणाऱ्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांना आर्थिक अमिष दाखवून धर्मांतर केले जाते. असा दावा करतात. अदिवासी आणि समाजामध्ये वंचित असणाऱ्या वर्गातील दारिद्र्याचे प्रमाण आसाम, ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश इ. सारख्या राज्यात मोठ्या प्रमाणात आहे. अशा वेळी त्यांना शासनाकडून योग्य त्या सुविधा आणि आर्थिक मदत मिळाली गेली नाही तर, त्या धर्मांतराला बळी पडू शकतात.

**३) धर्मांतर आणि राजकारण :**

धर्मांतराचे काही राजकीय पक्ष भांडवल करतात. धर्मांतराला विरोध म्हणून काही धार्मिक अल्पसंख्याक समुदायांना ते आपले लक्ष्य करतात. त्यामुळे समाजात सांप्रदायिकतेची समस्या निर्माण होते. भारतामध्ये धार्मिक विविधता असल्यामुळे धर्मांतराचे राजकारण होऊ शकते. त्यामुळे भारतातील अल्पसंख्याक समुदाय स्वतःला असुरक्षित समजतो. धर्मांतरा सारख्या घटनेचे परिणम ज्या राज्यांमध्ये अल्पसंख्याकांची संख्या जास्त आहे. त्या ठिकाणी अधिक तीव्रतीने आढळते. त्याच प्रमाणे अदिवासी समुदायाला योग्य त्या प्रमाणात राजकीय संधी आणि नेतृत्व नसल्याने त्यांचा देखील धर्मांतराच्या राजकारणासाठी उपयोग केला जाऊ शकतो.

**४) ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांचे भारतातील आगमन :**

जगातील दोन मोठ्या धर्माचे आगमन भारतात झाल्यानंतर या धर्मांतील अनुयायांनी धर्म प्रसाराच्या चळवळीला सुरूवात केली. त्यामुळे धर्मांतर म्हणजे, इतर धर्मातील व्यक्तींना ख्रिश्चन अथवा इस्लाम धर्म स्वीकारण्या संबंधी प्रवृत्त केले जाते. धर्मांतर म्हणजे एका धर्मांवर असणाऱ्या श्रद्धे पासून दुसऱ्या धर्मातल्या श्रद्धेकडे परिवर्तन करण्याचा प्रयत्न होत असतो. धार्मिक दृष्टीकोनातून धर्मांतर म्हणजे व्यक्तींच्या श्रद्धांचे परिवर्तन होत असते. भारतामध्ये इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांकडे हिंदू धर्मातील अनेक व्यक्तींनी जे धर्मांतर केले याचे कारण त्याची वैयक्तिक इच्छा किंवा स्वताः चे मत नसून, त्यांना अर्थिक अमिष किंवा रोजगार संधी किंवा अन्य इतर घटकांचे अमिष दाखवून परिवर्तन केलेले आढळते. इतिहासामध्ये मुस्लीम राज्यकर्त्यांनी प्रत्येक ठिकाणी धर्मांतर घडवून आणल्याच्या घटना आहेत. त्याचप्रमाणे ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्मांतर करण्यासाठी पाश्चात्य देशातल्या मोठ मोठ्या संस्था अर्थिक मदत देत असतात. असे असले तरी हिंदू धर्मामध्ये असणारी ताठर जाती व्यवस्था ही देखील तितकीच धर्मांतराला कारणीभूत ठरते. धर्मांतराची प्रक्रिया सर्व स्तरावर म्हणजे व्यक्तीगत, कुटूंब आणि समूहाच्या माध्यमातून घडून येत असते. काही वेळा तर अखंड गाव अर्थिक अमिषापोटी धर्मांतरीत केले जाते. असे असले तरी, व्यक्तीगत स्तरावर होणाऱ्या धर्मांतराचे प्रमाणे सर्वात जास्त आढळते.

भारतामध्ये सर्वांत प्रथम हिंदू धर्माकडून मुस्लीम धर्माकडे धर्मांतर होण्याची प्रक्रिया सूरू झाली. भारतामध्ये धर्मांतराचा फायदा मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्माला अधिक झाला आणि अपयश मात्र हिंदू धर्माला अधिक मिळाले. त्यानंतर भारतामध्ये ब्रिटीशांचे आगमन झाल्यानंतर मुस्लीम धर्माला अपयश येवून ख्रिश्चन धर्माला

धर्मांतराचा फायदा झाला. अर्थात प्रत्येक वेळी हिंदू धर्माला धर्मांतराचा विपरित परिणाम सहन करावा लागलेला दिसतो. हिंदू धर्मांतून मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्माकडे धर्मांतर करण्यामध्ये प्रामुख्याने हिंदूच्या मधील कनिष्ठ समूह प्रामुख्याने, अनुसुचित जाती आणि जमातींचा समावेश होतो. धर्मांतराची दिशा किंवा प्रमाण मुस्लीम धर्मापेक्षा ख्रिश्चन धर्माकडे अधिक आढळून येते.

**५) धर्मांतरामुळे हिंदू धर्माने घेतलेला पवित्रा :**

ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्माकडे हिंदूचे होणारे धर्मांतर कमी करण्यासाठी म्हणून, ज्या काही उपाय योजना सुरू झाल्या त्यामध्ये सर्वप्रथम आर्य समाजाचे आव्हान स्वीकारून त्यांनी 'शुद्धीचळवळ' सुरू केली. १९२३ मध्ये स्वामी श्रद्धानंद यांनी भारतीय हिंदू शुद्धी सभेची स्थापना केली. या संस्थेने पंजाब, दिल्ली, राजस्थान आणि उत्तर प्रदेश भागात व्यापक स्वरूपाचे कार्य केले त्यामुळे ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मांतर केलेल्यांनी तो धर्म सोडून परत हिंदू धर्मांत प्रवेश केला.

## २.४ **सारांश** (Let us sum up) :-

भारतातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप अभ्यासताना पाश्चीमात्यीकरण आधुनिककीकरण आणि जागतिकीकरणा सारख्या प्रक्रियांचा भारताच्या सामाजिक, अर्थिक आणि संस्कृतिक घटकांवर झालेला परिणाम आणि त्यातून घडून आलेले परिवर्तन महत्वाचे समजले जाते. कारण परिवर्तनाच्या या प्रक्रियांचे स्वरूप अशा प्रकारचे आहे की, त्यांचा प्रभाव आजही आपल्या व्यवस्थे वर असलेला दिसतो. कारण परिवर्तनाची प्रक्रियाही अखंडपणे चालू असते.

पाश्चातीकरण प्रक्रिया ही मुल्यता भारतामध्ये ब्रिटीश राजवटीचा परिणाम म्हणून सुरू झालेली होती. या प्रक्रिये अंतर्गत झालेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे स्वरूप व्यापक स्वरूपाचे होते. पारंपारिक भारतीय समाज व्यवस्था, इतर कोणत्याही परकीय राजवटी पेक्षा ब्रिटीश राजवटी मध्ये मोठ्या प्रमाणात बदलत होती. ही प्रक्रिया भारतीय समाज व्यवस्थेला एक वरदान समजले जाते. कारण ब्रिटीश राजवटीचा परिणाम म्हणून केवळ भौतिक बदलांना महत्त्व प्राप्त झालेले नव्हते तर या ठिकाणच्या पारंपारिक रूढी, परंपरा, जाती पद्धती, अंधश्रद्धा यांचे महत्त्व कमी होऊ लागले.

आधुनिकीकरण ही प्रक्रिया मुल्यता औद्योगिक क्रांती मधल्या तांत्रिका बदलाचा परिणाम म्हणून ओळखली जाते. भारतातील शेती, तंत्रज्ञान, औद्योगिक प्रगती, नागरीकरण, शिक्षण पद्धती इ. क्षेत्रात जे आमूलाग्र बदल घडून येत होते. त्याचा परिणाम आपल्या समाज जीवन पद्धतीवर झाल्याने, आपले रहानीमान, पोशाख, आहार, संगीत, नृत्य, कला अशा विविध क्षेत्रात बदलाचे स्वरूप वाढत होते. त्या मुळे आधुनिकीकरण ही संकल्पना वेगवेगळ्या भूमिकातून डॉ. एम.एन. श्रीनिवास आणि डॉ. योगेन्द्र सिंग यांनी अभ्यासली होती.

जागतिकीकरण प्रक्रिया, भारतामध्ये, १९८० पासून, जोर धरू लागली. यामध्ये मुल्यता, अर्थिक उदाहरीकरण, खाजगीकरण, इ. सारख्या अर्थिक क्षेत्रातील बदलांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. जागतिक पातळीवरच्या बाजार पेठा, आयात-निर्यात, बँका परकीय गुंतवणूक, बहुराष्ट्रीय कंपन्या इ. बाबत नियम ठरवणारी एक आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात आली. तिला 'WTO' असे म्हटले जाते. भारता सारख्या

देशात या प्रक्रियेतून घडून आलेल्या बदलांचे स्वरूप संमिश्र स्वरूपाचे आहे. कारण जागतिकीकरणाशी समायोजन साधण्यासाठीची मानसिकता आणि क्षमता नसणाऱ्या समूहांना ही एक आपत्ती वाटू लागली परंतू काही समूहांनी या संधीचा फायदा घेत असताना आपल्या रहानीमानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला.

## २.५ **पारिभाषिक संज्ञा** (Glossary) :–

- पाश्चीमात्यीकरण :– पश्चीम संस्कृतीच्या प्रभावामुळे भारतीय संस्कृती मध्ये घडून आलेला बदल.
- आधुनिकीकरण :– आधुनिक तांत्रिक सुधारणा मुळे घडून आलेला बदल.
- MNC :– जा Multi-National Companies (MNC) बहुराष्ट्रीय कंपन्या.

## २.६ **स्वंय–अध्ययन प्रश्नांची उत्तरे** ( Answers to Check your Progress) :–

**जोडया जुळवा १–**

| 'अ गट' | 'ब गट' |
|---|---|
| १) पाश्चीमात्यीकरण संकल्पना | एम.एन. श्रीनिवास |
| २) प्राथमिक स्तरावरील पाश्चात्यीकरण | लघु परंपरा |
| ३) ब्राम्हो समाजाची स्थापना | राजाराम मोहन रॉय |
| ४) कायदा व्यवस्थेची स्थापना | वॉरन हेस्टींग |
| ५) शैक्षणिक धोरणाची आखणी | लॉर्ड मॅकोली |

**जोडया जुळवा २ –**

| 'अ गट' | 'ब गट' |
|---|---|
| १) आधुनिकीकरणाची संकल्पना | एम.एन. श्रीनिवास |
| २) सांस्कृतिक बदलातून आधुनिकीकरण | योगेंन्द्र सिंग |
| ३) आधुनिकीकरणाचा मापदंड | पाश्चात्य ब्रिटीशांमुळे |
| ४) जन संपर्काचे माध्यम | इंटर नेट |
| ५) भारतातील आधुनिकीकरण | धर्म निरपेक्षता |

**जोडया जुळवा ३–**

| 'अ गट' | 'ब गट' |
|---|---|
| १) भांडवलशाही नविन आवृत्ती | ॲन्थोनी गिडन |
| २) 'Global Village' | जागतिकीकरणाची संज्ञा |
| ३) माहिती तंत्रज्ञान | जागतिकीकरणाचे माध्यम |
| ४) WTO | डंकेल प्रस्ताव |

## २.७ सरावासाठीचे प्रश्न (Exercise/ Home Assingament):-

१) भारतीय समाज व्यवस्थेमधील पाश्चात्यीकरणामुळे घडून आलेले बदल स्पष्ट करा.

२) आधुनिकीकरणामुळे भारतीय समाज व्यवस्थेत घडून आलेल्या परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करा

## २.८ अधिक वाचनासाठीची पुस्तके (Suggested Readings):-


1) Abraham M. Francis, :- ‘Contemporary Sociology’ An Introdnction to Concepts and Theories oxford University Press New York 2006.

2) Dhanagare D.N. :- ‘Globalization Towards an Aternative view, SocioIgical Bulletin vol.52, No. 1 March, 2003 P.4.

3) C.N.Shankar Rao, 'Sociology of Indian Society' S. Chand & Company Ltd. Delhi, First Edi. 2004

4) R.N. Sharma, 'Society in India', Surjeet Publication, Delhi 1989.

5) Ram Ahuja : Indian Social System, Rawat Publications.

6) Yogendra Singh : Modernisation of India Traditions, Rawat Publication.


❑❑❑

# घटक ३

# सद्य:स्थीतीतील विकासाच्या संकल्पना आणि सिद्धांत

## (Concept and Theories of Development and Underdevlopment)

**घटक संरचना:**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ विषय-विवेचन

- ३.३.१ मानवी विकासाची संकल्पना, सामाजिक विकासाची आणि पेलवणारा किंवा चिरंतर (शाश्वत) विकास
- ३.३.२ असमान आर्थिक विकासाचा सिद्धांत
- ३.३.३ वैश्विक व्यवस्थेचा सिद्धांत

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक संज्ञा

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठीचे प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठीची पुस्तके

## ३.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :-

विकास ही अर्थशास्त्राशी निगडीत संकल्पना असली तरी, विकास ही संकल्पना समाजशास्त्रा मध्ये अभ्यासताना, विकासाची सामाजिक बाजू विचारात घेतली जाते त्या 'विकास'या संकल्पनेचे बदलते स्वरूप जाणून घेत असताना या घटका मध्ये.

★ **मानवी विकासाची संकल्पना** (Concepts of Human Development)-

मानवी विकास ही गुंतागुंतीची प्रक्रीया आहे. मानवी विकासाची संकल्पना सर्वप्रथम १९९० मध्ये UNDP यांनी सादर केली. ही संकल्पना मांडण्यासाठी पाकिस्तानचे मेहबूब-उल-हक व भारताचे अमर्त्य सेन यांनी मांडली. लोकांच्या निवडीच्या विस्ताराची प्रक्रिया म्हणजे मानवी विकास होय.

★ **सामाजिक विकासाची संकल्पना** (Concepts Social Development)-

जाणून घेत असताना सामाजिक विकासा अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या विविध विकास कार्यक्रमांच्या यश-अपयशांवर सामाजिक घटनांचा परिणाम झाल्याने, विकास कार्यक्रमांचे स्वरूप कशा प्रकारे प्रभावित

होते. त्याच प्रमाणे सामाजिक विकासाची आवश्यकता इ. बद्दलचे स्वरूप जाणून घेता येईल.

★ **पेलपणारा अथवा चिरंतर विकास** (Concepts Sustainable Development)-

या संकल्पने अंतर्गत, विकास प्रक्रियेला चालना देत असताता, समाजाच्या दृष्टीने विकासाचे होणारे चांगले-वाईट परिणाम विचारात घेवून विकासामुळे मानवी समाजावर जर प्रतिकूल परिणाम होत असतील तर, विकास प्रकियेचे स्वरूप अशा प्रकारे निश्चित करून घ्यावयाचे की ज्यामुळे विकास आणि मानवी जीवन यांच्यातील समतोल टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. या संबंधीत स्पष्टीकरण पहाता येईल.

## ३.२ **प्रास्तविक** (Introduction) :-

'विकास'ही मूलता मूल्याधारित संकल्पना आहे (Development is a value loaded concept) त्यामुळे विकासा सबंधी असणारा चांगला वाईट दृष्टीकोन हा प्रत्येक व्यक्ती, समूह, समाज, समुदाय यांच्या दृष्टीने बदलणारा असतो. 'विकास' म्हटले की, त्याला समकक्ष असणाऱ्या इतर काही संकल्पना येतात उदा-'प्रगती'(Progress) आर्थिक वृद्धी (Economic qrowth) इ. परंतू प्रत्येक संकल्पनाचा अर्थ भिन्न असतो. प्रत्येक मानवी समाज, आपल्या समाजा अंतर्गत असणाऱ्या लोकसंख्येच्या गरजा, मानवी कल्याण आणि आर्थिक आणि सामाजिक प्रगती घडवून आणाऱ्याच्या उद्देशाने शासन व्यवस्थेच्या माध्यमातून विकास कार्यक्रमांचा आराखडा तयार करून त्याची उद्दिष्टे आणि परिणाम यांचा अभ्यास करून समाजहितासाठी प्रत्यक्ष विकासाची कामे हाती घेतले जातात. अशी विकास कामे विशिष्ट समूहा पुरती मर्यादित असतात. उदा-ग्रामीण विकास कार्यक्रम, शहरी विकास योजना, किंवा आदिवासी विकास कार्यक्रम इ. काही वेळा विकासाचेक्षेत्र निश्चित करताना शेती क्षेत्राचा विकास, औद्योगिक विकास, वन विकास, जल विकास अशा अर्थाने विकासाचे निश्चितीकरण केले जाते. जगातील मानवी समूहाचे 'विकास' या घटकावर वर्गीकरण करताना. १) विकसित देश (Development Countries) २)अविकसित देश (Undeveloped Countries) आणि ३) विकसनशील देश (Developing Countries) अशा तीन प्रकारा मध्ये वर्गीकरण केले जाते.

'अर्थशास्त्र' प्रामुख्याने 'विकास' संकल्पनेच्या अभ्यासाला प्राधान्य देते. परंतु कोणताही आर्थिक विकास त्याचे यश-अपयश आणि विकास कार्यक्रमांचे स्वरूप 'मानव' (Humanbeing) या घटकाशी निगडीत असल्याने अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना सामाजिक घटकांचा अभ्यास केल्या खेरीज विकास कार्यक्रमांची दिशा ठरवता येत नसते. विकास कार्यक्रमांचे फायदे समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचण्यासाठी म्हणून अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना 'समाज रचनेचा' अभ्यास असावा लागतो. 'विकासाचा मानवी चेहरा' (Human face of Development) म्हणून, ज्या वेळी आपण विकासाकडे पहातो त्या वेळी विकासातून मिळणाऱ्या केवळ अर्थिक फायदयाचा विचार न करता, तो विकास मानवी हिताच्या दृष्टीने कसा आहे याची शह-निशा करून, विकासाच्या सकारात्मक आणि नकारात्मक स्वरूपाचे विश्लेषण करण्याचे काम समाजशास्त्राच्या (Social Change and Development) या अभ्यासा अंतर्गत केले जातो.

'विकास' ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया असली तरी, प्रत्येक मानवी समाजाला त्याच्या जवळ उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा (Natural Resources) आणि मनुष्यबळाचा (Human Resources) विचार करून विकासाची मर्यादा निश्चीत करावी लागते. प्रत्येक मानवी समाज आपल्या

स्थानिक, घटकांचा विचार करताना, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक गरजांची निकड विचारात घेवून विकास कार्यक्रमांना प्राध्यान देत असतो. समाजातील शासनसंस्था प्रामुख्याने, समाजातील दुर्बल, वंचित, मागसलेल्या घटकांच्या उन्नतीसाठी म्हणून विकास कार्यक्रमात अशा घटकांना प्रमुख स्थान देण्याचा प्रयत्न करीत असते. 'विकास' प्रक्रिया विविध घटकांच्या मुळे प्रभावित होत असते. शासन व्यवस्थे मधल्या सत्ताधारी पक्षाची विचारसरणी, क्षेत्रीय दबाव गट, लोकसंख्येची रचना, प्रादेशिक अथवा स्थानिक पातळीवर निर्माण होणाऱ्या समस्या, उपलब्ध असणारा विकास निधी, भ्रष्टाचार आणि सर्वात शेवटी लाभार्थी घटकाकडून विकास कार्याला मिळणारा प्रतिसाद इ. सारख्या घटकांमुळे विकास प्रक्रियेचे स्वरूप निश्चित होत असते.

भारता सारख्या, सामाजिक सांस्कृतिक विविधता असणाऱ्या राष्ट्रामध्ये, स्वातंत्र्य-पूर्व कालखंडा पासून ङ्गविकासालाफ महत्व देण्यात आले असले तरी, स्वातंत्र्य पूर्व काळात ब्रिटीश शासना अंतर्गत दळण-वळण, तांत्रिक आणि प्रशासन कार्याचा विकास केला गेला कारण, ब्रिटीश शासन व्यवस्थेच्या दृष्टीने तो आवश्यक होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र, आपण शेतीविकासाला प्राधान्य देत असताना १९६८ मध्ये हरितक्रांती घडवून आणली. त्या नंतरच्या कालखंडात औद्योगिक विकासामध्ये १९९१ च्या आर्थिक धोरणानंतर, खुली अर्थव्यवस्था, जागतिकीकरण, खाजगीकरण इ. माध्यमातून आर्थिक विकासाला गती देण्यात आले. परंतू विकास प्रक्रियेचा वेग गेल्या दोन दशका मध्ये इतक्या प्रचंड गतीने घडून आला की, जगामध्ये भारत तिसऱ्या क्रमांकाची ङ्गआर्थिक महासत्ताफ म्हणून ओळखली जाऊ लागली. आणि त्याच वेळी भारतातील द्रारिद्र्याचे प्रमाण, पर्यावरणाचा ऱ्हास, साधन संपत्तीचा- ऱ्हास, मानवी आरोग्य, हिंसाचार, दहशतवाद, अर्थिक विषमता इ. सारख्या सामाजिक प्रश्नांचा विचार विकासा सोबत केला जाऊ लागला.

आज सामाजिक शास्त्राचे अभ्यासक विकास प्रकियेचा एकांगी (one-sided) अभ्यास न करता. विकासा बद्दलची संकल्पना कशा प्रकारे बदलत गेली हे जाणून घेण्यासाठी म्हणून, 'विकासाच्या बदलत्या संकल्पना' या अभ्यासा अंतर्गत पुढील संकल्पनांचा सखोल अभ्यास पुढील प्रमाणे करता येईल.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter):-

सामाजिक शास्त्रामध्ये 'विकास' संकल्पनेचा अभ्यास 'आंतर विद्याशाखीय' दृष्टीकोनातून केला जातो. (Inter disciplinary Approach) त्याच प्रमाणे 'विकास' (Development) एक मानवी परिवर्तनाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्यातील अभ्यास विषयातील दृष्टीकोनांच्या भिन्नते मुळे 'विकास' संकल्पने चा स्वतंत्र अभ्यास केला जात असला तरी त्यांना परस्परांच्या सहकार्या खेरीज 'विकास' संकल्पनेचा निश्चित अर्थ जाणून घेता येत नाही म्हणूनच या घटकांमध्ये आपण विकासाच्या बदलत्या संकल्पना जाणून घेत असताना, मानवी विकास, सामाजिक विकास (Social Development) आणि पेलवणारा किंवा चिरंतर विकास (Sustainable Development) सारख्या संकल्पनांचे स्वरूप जाणून घेणार आहोत. या संकल्पनांच्या मांडणीमधला फरक जाणून घेत असताना 'विकास' प्रक्रियेचा अर्थ कशा प्रकारे बदलतो आणि आर्थिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून 'विकासाचा' अर्थ कसा बदलत जातो या बद्दलचे स्पष्टीकरण यामधून समजून येते.

## ३.३.१ संकल्पना : मानवी विकास, सामाजिक विकास आणि पेलवणारा (शाश्वत) विकास

■ **मानवी विकास** (Human Development)

मानवी विकास ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तसेच ती एक बहुआयामी (Multi Dimensional) संकल्पना आहे. मानवी विकासाची ही संकल्पना सर्वप्रथम १९९० मध्ये UNDP (United National Development Programme) यांनी सादर केली. ही संकल्पना मांडण्यामध्ये पाकिस्तानचे मेहबूब-उल-हक व भारतीय अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांचे महत्त्वाचे योगदान आहे. मेहबूब-उल-हक यांना मानवी विकास निर्देशांकांचे जनक (Father of Human Development Index) मानले जाते.

मानवी विकासाची व्याख्या-लोकांच्या निवडीच्या विस्ताराची प्रक्रिया म्हणजे मानवी विकास. (Process of enlarging people's choice).

मानवी विकासाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकांमध्ये दीर्घ व आयोग्यपूर्ण जीवन, शिक्षण व उत्तम रहाणीमानाचा दर्जा यांचा समावेश होतो. इतर निवडीमध्ये राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्काची हमी व स्वावलंबन व आत्मप्रतिष्ठेचे विविध घटक यांचा समावेश होतो. या अत्यावश्यक निवडी (essential choice) आहेत. सारांश, मानवी विकास ही लोकांच्या निवडीच्या विस्ताराच्या प्रक्रियेबरोबरच सुस्थिती उंचावण्याची प्रक्रिया आहे म्हणून विकास ही लोकाभिमुख (people orientated) असला पाहिजे. लोक विकासाभोवती (Development Oriented) नाही. तसेच विकास हा सहभागयुक्त (participatory) असावा आणि त्यासाठी लोकांना आपल्या क्षमतांमध्ये (आरोग्य, शिक्षण, व प्रशिक्षण विषयक) सुधारणा करण्यासाठी गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध असाव्यात. त्यासाठी सामुदायिक निर्णयामध्ये पूर्ण सहभाग घेता यावा आणि तसेच मानवी, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा लाभ प्राप्त व्हावा.

आर्थिक विकास (Economic Development) व मानवी विकास (Human Development) यामध्ये मूलभूत फरक असा आहे की, आर्थिक वृद्धीमध्ये केवळ राष्ट्रीय उत्पन्नावर भर दिला जातो. मात्र मानवी विकासात मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय घटकांचा समावेश होतो.

अर्थात मानवी विकास घडून येण्यासाठी आर्थिक वृद्धी गरजेची असतेच. मात्र वेगळ्या दृष्टीकोणातून त्यामागील तत्त्व असे आहे की, मानवी निवडीच्या विस्तारासाठी राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा उत्पन्नाचा वापर (Proper use of income and not income itself) अधिक निर्णायक ठरत असतो. राष्ट्राची खरी संपत्ती ही राष्ट्रातील 'लोक' (people) असल्याने मानवी जीवनाची समृद्धी हेच विकासाचे ध्येय असले पाहिजे.

**मानवी विकास निर्देशांक** (Human Development Index)

मानवी विकास निर्देशांक हा आरोग्य, शिक्षण व जीवनमानाचा दर्जा या तीन निकषावरून काढला जातो. ते पुढीलप्रमाणे

१) **आरोग्य :** देशाच्या आरोग्याचा स्तर मोजण्यासाठी जन्माच्या वेळचे आयुर्मान हा निर्देशांकात वापरला जातो. या निर्देशांकाचे किमान मूल्य २५ तर कमाल मूल्य ८५ असते.

२) **शिक्षण :** देशाचा शैक्षणिक स्तर मोजण्यासाठी पुढील दोन निर्देशक वापरतात.

१. २५ वर्षावरील अधिक वयाच्या प्रौढांची सरासरी शालेय वर्षे

२. १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांची अपेक्षीत शालेय वर्षे

या निर्देशांकाचे किमान मूल्य शुन्य तर कमाल मूल्य त्यावर्षी आढळलेले एखाद्या देशाच्या सर्वाधिक मूल्याइतके असते.

**३) जीवनमानाचा दर्जा :** देशाच्या जीवनमानाचा स्तर मोजण्यासाठी दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हा निर्देशांक वापरला जातो. या निर्देशांकाचे किमान मूल्य १०० डॉलर तर कमाल मूल्य ४०००० डॉलर इतके असते. या प्रत्येक निकषाचे मूल्य पुढील सूत्रानुसार ०-०१ या पद्धतीने व्यक्त केले जाते.

$$\text{निकषाचे मूल्य} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

जनतेची सुस्थिती (Well-being) हे विकासाचे ध्येय असते नव्हे असले पाहिजे. केवळ पैसा लोकांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अंगानी सुस्थिती निर्माण करू शकत नाही. त्यामुळे UNO ने मानवी विकास या संकल्पनेचा पुरस्कार केला.

**विकासाचे सामाजिक निर्देश** (Social Indicators of Human Development)

शिक्षण व आरोग्य हे मानवी विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. यावरून विकासाचे महत्त्वाचे सामाजिक सूचक पुढीलप्रमाणे-

**१. शिक्षणविषयक निर्देशक**

देशातील शैक्षणिक स्तर दर्शविण्यासाठी साक्षरता दर विशेषतः महिलांची साक्षरता, विभिन्न वयोगटातील शाळकरी मुलांचे स्थूल व निव्वळ पटसंख्या प्रमाण, शाळेतील विद्यार्थ्यांची गळती (dropont), स्थगिती (Stagnation), विद्यार्थी-शिक्षक प्रमाण, यासारखे सूचक वापरले जातात.

**२. आरोग्य विषयक निर्देशक**

शिक्षणातून प्राप्त केलेली कौशल्ये वापरण्याची क्षमता आरोग्याच्या स्तरावर अवलंबून असते, दीर्घ जीवनकाल (Life expectancy) दर्शविणाऱ्या निर्देशकामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

जन्माच्या वेळचे आयुर्मान, अर्भक मृत्यू दर, बालमृत्यूदर, मातामृत्यूदर, पोषण दर्जा, स्वच्छतेची स्थिती, सार्वजनिक आरोग्य विषयक सुविधा, जन्मदर, मृत्यूदर इ.

**३. लोकसंख्या वाढीचा दर**

आर्थिक विकास व लोकसंख्या वाढीचा दर याचा जवळचा संबंध असतो. पारंपारिक व न्यून (कमी) विकसित समाजात लोकसंख्या वाढीचा दर जास्त असतो. लोकसंख्या वाढीचा दर जन्मदर व मृत्यूदर यावरून ठरतो. विकसित देशामध्ये जवळजवळ हा दर स्थिर आहे. पण अविकसित देशामध्ये यामध्ये कमालीचे अंतर आहे. भारतासारख्या देशात लोकसंख्या अफाट वेगाने वाढते. त्यामुळे वाढीव लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचेच

गंभीर प्रश्न निर्माण होतात. परिणामी मानवी विकासाच्या इतर निकषाकडे सहाजिकच दुर्लक्ष होते. मानवी विकासाच्या निर्देशांकात भारताचा १३४ वा क्रमांक आहे.

४. **लिंग विषयक विकास निर्देशक** (Gender Inequality Index)

महिलांच्या विकासाचा स्तर मोजण्यासाठी लिंगविषयक सूचक वापरले जातात. उदा. लिंगपदभाव. समाजातील स्त्रियांचे स्थान, स्त्रियांच्या विकासाची संधी, स्त्रियांना सोयीसुविधा, राजकारणातील सहभाग, विकासातील सहभाग इ.

**मानवी विकास का आवश्यक आहे?**

एका मेंढपाळाला नदी किनारी एक घड्याळ सापडले. त्याने आपल्या कोकराच्या गळ्यात पट्ट्यासारखे बांधले. थोड्याच वेळात कोकरू ओरडू लागले. म्हणून त्याने गळ्यातील घड्याळ काढले आणि नदीत फेकून दिले. थोड्याच वेळात घड्याळाचा मालक धावत पळत आला. तेव्हा मेंढपाळाने ते खोल नदीत फेकून दिल्याचे सांगितले. तेव्हा तो मालक म्हणाला, 'अरे ते सोन्याचे घड्याळ होते.' आपल्या मानवी विकासाची अवस्था या मेंढपाळासारखी झाली आहे.... इतके अनर्थ एका अविद्येने केले असे म. फुले म्हणतात ते योग्यच आहे. आज जपानसारख्या चिमुकल्या देशात कोणत्या प्रकारचे खनिज साठे नसताना परदेशातून कच्चा माल आयात करून पक्का माल तयार करतात, आणि जगाच्या बाजारपेठेत वरचे स्थान प्राप्त करतात ते केवळ उच्च कोटीच्या मानवी विकासामुळेच. मानवी विकास का आवश्यक आहे ते पुढील मुद्द्याच्या आधारे लक्षात घेऊ.

१. आर्थिक विकास हे साधन आहे. मानवी विकास हे साध्य (the end aim) आहे. त्यामुळे संपूर्ण विकासाचे उद्दिष्ट हे स्त्री-पुरूष, मुले, वर्तमान व भविष्यकालीन विकास गृहीत धरून करावे लागते व तसे नियोजन आवश्यक आहे.

२. उच्च दर्जाची उत्पादनक्षमता निर्माण करणे, यासाठी उत्तम आरोग्य, उत्तम शिक्षण व उत्तम कौशल्यपूर्ण कामगार निर्माण करणे यासाठी सकस आहार, आरोग्य व उत्तम शिक्षण यामधील गुंतवणूक ही अनिवार्य आहे.

३. मानवी विकासामध्ये लहान कुटुंबाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. सर्व विकसित देशांमध्ये असे आढळून आले आहे की, शैक्षणिक सुधारणा, उत्तम आरोग्य, विषयक सुविधा, माता व बालमृत्यूमधील घट हे मुलांची संख्या कमी करण्यास मदत करते.

४. उत्तम भौतिक पर्यावरणासाठी मानवी विकास आवश्यक आहे. लोकसंख्या कमी झाली की दारिद्र्याचे प्रमाण कमी होईल-दारिद्र्याचे प्रमाण कमी झाल्यास वने सुरक्षित रहातील, वाळवंटीकरण थांबेल, माती प्रदूषण कमी होईल. लोकशाही मजबूत होईल व सामाजिक स्थिरता प्राप्त होईल.

**मानवी विकासाचे आवश्यक घटक**

**१) समन्याय** (Equity) : समाजातील सर्व घटकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणारे सर्वसमावेशक असे धोरण सरकारचे असले पाहिजे. भू-वाटप, सत्ता वाटप स्त्रियांना विकासामध्ये समान संधी मिळाल्यास विकास वेगाने होऊ शकतो.

**२) चिरंतनता** (Sustainability) विकास हा चिरंतन असला पाहिजे. निसर्गाचे संरक्षण करीत करीत येणाऱ्या पिढीला विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**३) उत्पादकता** (productivity) लोकांमध्ये गुंतवणूक वाढवून त्यांच्यामध्ये जास्तीतजास्त उत्पादकता वाढविली पाहिजे.

**४) सबलीकरण** (Empowerment) मानवी समाजाचे सक्षमीकरण आवश्यक आहे. सक्षमीकरण याचा अर्थ लोकांनी आपल्या इच्छेनुसार आपल्या आवडीची करणे असा होतो.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न १ (अ)** (Check your Progress)

**जोड्या जुळवा**

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) राष्ट्राची खरी संपत्ती | अ) विकास चिरंतर पाहिजे |
| २) अपेक्षित शालेय वर्षे | ब) जन्म-मृत्यू यावर ठरतो |
| ३) लोकसंख्या वाढीचा दर | क) १८ वर्षापेक्षा कमी |
| ४) लिंगविषयक सूचक | ड) राष्ट्राचे लोक |
| ५) निसर्गाचे संरक्षण | इ) महिलांच्या विकासाचा स्तर |

## ■ सामाजिक विकासाची संकल्पना (Concept of Social Development) –

एखाद्या समाजातील अथवा राष्ट्रातील अर्थिक वृद्धीचे प्रमाण जास्त असून देखील जर त्या ठिकाणी द्रारिद्रयाचे प्रमाण वाढत असेल किंवा कुपोषणाचे प्रमाण अथवा मानवी आरोग्याची समस्या अधिक असतील तर अशा वेळी त्या समाजाची अथवा राष्ट्राची समाजरचना चूकीची अथवा दोषपर्ण आहे असे म्हणता येईल का? या प्रश्नाचे निश्चीत उत्तर सांगता येत नाही. कारण ज्या द्रारिद्रय आणि इतर अन्य समस्यांचा उल्लेख केला, त्या समस्यावरील उपाय म्हणून प्रत्येक राष्ट्र विविध प्रकारचे विकास कार्यक्रम राबवून समस्या सोडवण्याचा प्रयत्नात असते. म्हणून 'सामाजिक विकास' (Social Development) ही संकल्पना अर्थिक विकासा पेक्षा भिन्न स्वरूपाची असते.

### सामाजिक विकासाची व्याख्या–

१) ''ज्या प्रकारच्या विकास प्रक्रियेत, एखाद्या समाजातील व्यक्ती समुदायांच्या, समूहाच्या अथवा राष्ट्रीय स्तरावर एकूण मानवी समुदायांना भेडसावणाऱ्या सार्वजनिक स्वरूपाच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी शासकीय पातळीवर विशिष्ट विकास कार्यक्रमांचे नियोजन करून जनहिताच्या अथवा मानवी कल्याणाच्या दृष्टीने राबविलेला कृती कार्यक्रम म्हणजे 'समाज विकास' होय''.

२) ''सामाजिक विकास म्हणजे, समाजातील व्यक्तीचा सामाजिक, अर्थिक अशा सर्वांगीण बाजूने विकास घडवून आणीत असताना. त्यांच्या रहाणीमानाचा दर्जा उंचावणे आणि समाजातील दुर्बल, वंचित द्रारिद्रय रेषे खाली असणाऱ्या व्यक्तीना एकूण सामाजिक प्रवाहामध्ये सामिल करून करून घेणे होय''.

३) ''सामाजिक विकास म्हणजे, समाज अंतर्गत असणाऱ्या लोकसंख्येच्या सर्वांगीण विकासासाठी विशिष्ट उद्दिष्टांच्या आणि शासकीय कार्यक्रमांच्या द्वारे केलेला जाणीव पूर्वक अथवा हेतूपूर्वक प्रयत्न होय''.

**'सामाजिक विकास' संकल्पनेची व्यापकता–**

'सामाजिक विकास'ही संकल्पना व्यापक आणि गुंतागुंतीची आहे. कारण सामाजिक विकास अंतर्गत केवळ 'व्यक्ती'या घटकाचा विकास अपेक्षित नसून भौतिक स्वरूपात घडवून आणलेल्या विकासाचा देखील त्यामध्ये समाविष्ट होतो. सामाजिक विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून प्रत्येक समाजामध्ये स्थानिक पातळीवर असणाऱ्या लोकसंख्येच्या आर्थिक, सामाजिक व अन्य इतर समस्यांच्यया आधारावरती तिचे स्वरूप, निश्चित केले जाते. तसेच सामाजिक समस्या अणि त्यांची तीव्रता स्थल, काल, परिस्थिती नुरूप एक सारखी नसून तिचे स्वरूप भिन्न-भिन्न स्वरूपाचे असते. त्यामुळे साहजिक 'सामाजिक विकास' ही संकल्पना देखील स्थल, काल, परस्थिती नुरूप बदलणारी असते.

सामाजिक विकास म्हणजे, ङ्गशाश्वत समाजालाफ चालना देत असताना समाजातील सीमांत समूह महिला आणि व्यक्ती यांचे सशक्तीकरण मानवाने स्थान अथवा महत्व टिकवण्यासाठी स्वविकासाद्वारे त्याचे सामाजिक, अर्थिक उन्नती करून त्याला समाजात विशिष्ट स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न होतो.

अर्मत्य सेन यांच्या मते, (Social development is equality of social opportunities) म्हणजे समाजिक संधीच्या मधील समानता म्हणजे सामाजिक विकास होय. सामाजिक विकास म्हणजे समाजातील व्यक्तींच्या गरजा आणि निवड यांच्या मध्ये वृद्धी करण्याची प्रक्रिया होय. त्यामध्ये दीर्घायुष्य आणि चांगले आरोग्य, या बरोबरच ज्ञान आणि संपत्तीचा उपयोग, उच्च दर्जाचे रहानीमान जगण्यासाठी मालमत्ता आणि रोजगार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवी कौशल्य आणि क्षमता यामध्ये वाढ करणे होय.

**सामाजिक विकासाचे निकष–**

१९९५ मध्ये 'कोपन हेगेन' या ठिकाणी जी सामाजिक परिषद आयोजित केली होती त्यामध्ये एखाद्या समाजातील 'सामाजिक विकास' जाणून घेण्यासाठीचे निकष पुढील घटकांवर अवलंबून असतात.

### १) द्रारिद्र्य निर्मलून–

एखाद्या समाजव्यवस्थे मध्ये जर द्रारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त असेल आणि अशा द्रारिद्र्य समस्येचे निर्मलून करण्यासाठी म्हणून, जर समाजाने काही सामाजिक विकास कार्यक्रमाची आखणी करून द्रारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न केले असतील तर अशा कार्यक्रमांचा समावेश सामाजिक विकासाअंतर्गत येतो. भारतामध्ये ग्रामीण द्रारिद्र्याचे निर्मलून करण्यासाठी गरिबी हटाओ योजना इंदिरा गांधीच्या काळात केली होती. त्याच प्रमाणे समुदाय विकास योजने अंतर्गत सुद्धा द्रारिद्र्य निर्मलून कार्यक्रमाला विशेष स्थान दिले होते.

### २) रोजगार वृद्धी किंवा संधी –

सामाजिक विकासा अंतर्गत, 'रोजगार हमी योजना'अथवा औद्योगिक क्षेत्राचा विकास करून रोजगार संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत असतो. त्या प्रमाणे स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून

देत असताना पुरेशे  भांडवल देण्याचा प्रयत्न होत असतो. लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार उपब्ध करून देण्याचे कार्य सामाजिक विकास अंतर्गत केले जाते.

**३) सामाजिक ऐक्य आणि सामंज्यस–**

समाजातील वेगवेगळ्या जाती, धर्म आणि वंश यांच्या मध्ये ऐक्य आणि सौहार्दपूर्ण वातावरण ठेवण्यासाठी, सर्वांना समान संधी मिळेल अशा स्वरूपाचा विकास महत्वाचा समजला जातो. त्याच प्रमाणे सांस्कृतिक विविधता असेल तर, सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवण्याच्या हेतूने विविध सामाजिक विकास कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

**संयुक्तराष्ट्र विकास कार्यक्रमाचा मानवी विकासाचा अहवाल–**

मानवी विकासाचे निर्देशांक कोणत्या स्वरूपाचे  असावेत या  बद्दलचा 'मानवी विकास अहवाल' पुढील निर्देशांकाना महत्व देतो. ते निर्देशांक पुढील प्रमाणे आहेत.

**१) मानवी क्षमतेच्या आधारावर निश्चीत केलेले निर्देशांक–**

- ★ मानवाचे दीर्घायुष्य
- ★ ज्ञान वृद्धी प्रौढशिक्षण आणि प्राथमिक माध्यमिक आणि विविध भौगोलिक प्रदेशातील विद्यार्थी प्रवेशात वाढ करणे.
- ★ चांगल्या प्रतीचे जीवन व दरडोई उत्पन्न मध्ये वाढ करणे.

**२) समाजातील वंचित घटकासाठीचे निर्देशांक–**

- ★ ४० वर्षाच्या आतील मृत्यचे प्रमाण कमी करणे. बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे.
- ★ शैक्षणिक प्रगती करताना प्रौढ निरक्षराचे प्रमाण कमी करणे.
- ★ सर्वांगीन अर्थिक विकास करणे.
- ★ ५ वर्षांखालील बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे.

**३) स्त्री–पुरूष विकासा सबंधीचे निर्देशांक –**

- ★ स्त्री–पुरूष यांच्यातील असमानता कमी करणे.

वरील घटकांच्या शिवाय सामाजिक विकास अंतर्गत ज्या प्रमुख तीन घटकांचा समावेश केला जातो. ती खालीलप्रमाणे आहेत.

**१) द्रारिद्र्य कमी करण्यासाठीचा लढा :**

समाजातील द्रारिद्र्याचे प्रमाण कमी करणे हा सामाजिक विकासाअंतर्गत महत्वाचा घटक मानला जातो.

**२) व्यक्तीचा विकास त्याच्या स्वप्रयत्नातून करणे :**

समाजातील व्यक्तीचा विकास करण्यासाठी त्यांना स्वतःतालाच प्रेरित करत त्याच्या प्रयत्नातूनच सामाजिक विकास घडवून आणला जातो.

**३) मानवी हक्काचे संरक्षण आणि लोकशाहीः**

सामाजिक विकासा अंतर्गत लोकशाही मध्ये मानवीहक्कांचे संरक्षण करण्याचे काम सामाजिक विकासामध्ये महत्वाचे समजले जाते.

सामाजिक विकासाचे स्वरूप जाणून घेत असताना एखादया समाजातील सामाजिक विकासाचे प्रमाण किती आहे हे जाणून घेण्याचे प्रमुख तीन निकष महत्त्वाचे समजले जातात.

**१) स्त्री–पुरूष विकासाचे प्रमाणः**

समाजातील स्त्री–पुरूषाचे प्रमाण विचारात घेवून महिला आणि पुरूष यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न करणे.

**२) शाश्वत विकास**

समाजातील अर्थिक विकास करण्यापूर्वी शाश्वत विकासाला प्राधान्य देऊन विकास प्रक्रियेला योग्य दिशा प्राप्त करून देणे.

**३) समाजातील ऐक्य टिकवणेः**

सामाजिक विकासा अंतर्गत सामाजिक ऐक्य महत्वाचे समजले जाते.

**स्वयं अध्ययन साठीचे प्रश्न–१ (ब)** (Check your progress)

**जोडया जुळवा**

| **‘अ गट’** | **‘ब गट’** |
|---|---|
| १) सामाजिक परिषदेचे आयोजन | अ) निरक्षरतेचे प्रमाण कमी |
| २) प्रौढ शिक्षण | ब) सामाजिक विकासाचे उद्दिष्ट |
| ३) शाश्वत विकास | क) लोकशाही व्यवस्था |
| ४) द्रारिद्रय निर्मलून | ड) अर्थिक विकासाला पर्याय |
| ५) मानवी हक्क संरक्षण | इ) कोपन हेगेन |

■ **‘पेलवणारा विकास’ किंवा चिरंतर ‘(शाश्वत) विकास’** (Sustainable Development) :–

साधारणपणे १९८० च्या दरम्यान ‘शाश्वत विकास’ (Sustainable Development) किंवा पेलवणारा विकास ही संकल्पना नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासामध्ये अभ्यासली जाऊ

लागली. १९८७ मध्ये 'World commission on Environment and Development' यांनी त्यांच्या 'our common future' या मध्ये शाश्वत विकासाची व्याख्या केली आहे. 'Sustainable development is a development that meets the needs of the present without compromising the ability of fature qeneration to meet their own needs.'

शाश्वत विकास म्हणजे जो विकास, भविष्यातील पिढीच्या तिच्या स्वःताच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमते सबंधीचा विचार न डावलता अथवा त्या बाबत कसलीही तडजोड न करता, वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करतो. शाश्वत विकासा अंतर्गत विकास आणि पर्यावरण, या दोन संकल्पनांच्या एकत्रित सबंधा बाबत मांडणी करण्यात आली आहे. शाश्वत विकसा अंतर्गत, एखाद्या समाजातील अर्थिक वाढीची दिशा आणि वेग या सबंधीचा निर्णय घेत असताना अर्थिक विकासाचे स्वरूप अशा प्रकारे निश्चित केले जाते की, त्यामध्ये आपल्या सभोवताली असणाऱ्या नैसर्गिक पर्यावरणाला त्या पासून कमीत-कमी स्वरूपात धोका निर्माण होईल.

ज्या वेळी १९९२ मध्ये 'रिओ-दि-जिनिरो (ब्राझील)' या ठिकाणी United Nations Conference on Environment and Development. नावाच्या परिषदेचे आयोजन केले होते. त्यानुसार मानवी पर्यावरणाचा वाढत चाललेला ऱ्हास कमी करण्यासाठी पर्यावरणाच्या संरक्षणाबाबतचे विविध कार्यक्रम जगातील संपूर्ण देशामध्ये आमलात आणण्या सबंधी धोरण निश्चीत करण्यात आले. संपूर्ण मानवी समाजाचा भविष्याची जबाबदारी सामूहिक असून त्याची जाणीव आपल्या सर्वांना असणे गरजेचे आहे.

प्रा. धनागरे यांनी, म्हटल्याप्रमाणे, पेलवाणारा विकास व त्याची पातळी ही प्रत्येक मानवी समाजाने निश्चीत करावयाची असते. समाजाला आपली उद्दिष्टे, आणि हेतू साध्य करून घेताना, विकास प्रक्रिये द्वारे काय साध्य करून घ्यावयाचे याबद्दलचे मार्गदर्शन शाश्वत विकासामधून मिळते. स्थूलमानाने शाश्वत विकासाच्या प्रक्रिये अंतर्गत जनसामान्यांना विशेष स्थान दिले आहे. ज्या वेळी विकास प्रक्रियेबाबतचे धोरण ठरविले जाते. त्या वेळी जनसामान्यांचा सहभाग त्यामध्ये करून विकासाची दिशा आणि उद्दिष्ट त्यांच्याच विचाराने निश्चीत केली जातात. परंतू ज्या विकासांच्या उद्दिष्टामुळे भविष्यातल्या मानवी पिढीच्या वाटा बंद होणार नाहीत. किंवा त्यांचे भवितव्य धोक्यात येणार नाही या बद्दलचा रीतसर विचार करून, विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात शाश्वत विकास म्हणजे असा विकास आहे की, ज्यामध्ये तांत्रिक विकास, नैसर्गिक साधन संपत्ती आणि मानवी पर्यावरण यांच्या मध्ये समतोल ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

शाश्वत विकास मुख्यता, विकासातून मानवी गरजा पूर्ण करताना मानवी पर्यावरण संरक्षणाचा विचार करून विकास प्रक्रिये मध्ये प्रभावीरित्या संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करते. एखादे राष्ट्र ज्यावेळी त्या ठिकाणच्या लोकसंख्येच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नती साठी प्रयत्न करते त्या वेळी लोकसंख्ये मधल्या सर्वात खालच्या स्तरामध्ये असणाऱ्या लोकसंख्येच्या अर्थिक, सांस्कृतिक, आणि पर्यावरणात्मक हित सबंधाना अग्रक्रम देण्यासाठी प्रत्यक्ष त्या लोकांचा सहभाग विकास प्रक्रियेत करून 'पर्यावरण-पोषक' (Eco-Friendly) असे धोरण आणि कार्यक्रमांचे स्वरूप निश्चीत केलेले असते. ज्या वेळी एखाद्या समाजाची क्षमता अशा प्रकारची असते, की तो समाज कायम स्वरूपी समाजातील व्यक्तींना दर्जात्मक रहाणीमान देण्याचा प्रयत्न करातो त्या वेळीच शाश्वत विकास घडून येऊ शकतो. शाश्वत विकास करण्यासाठी म्हणून शिक्षण, आरोग्य, अन्न-धान्याची सुरक्षितता आणि लोकसंख्येचा सर्वांगीन विकास इ. सारख्या क्षेत्रात मनुष्य

बळाची आवश्यकता असते. संयुक्त राष्ट्रानी जागतिक स्तरावर दोन परिषदांचे आयोजन करताना 'रिओ' या ठिकाणी१९९२ साली जोहान्सबर्ग या ठिकाणी २००२ साली, 'शाश्वत विकास' संदर्भात काही ठोस असे निर्णय घेतले त्या मध्ये खाजगी उद्योग आणि स्वयंसेवी संस्था यांना सोबत घेवून जगातल्या शासन संस्थानी, ज्या-ज्या ठिकाणी मानवी क्रियांचा पर्यावरणावर परिणाम होणार आहे अशा ठिकाणी शाश्वत विकासाची मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग केला पाहिजे.

आज पृथ्वी ग्रहावर ६०० कोटी हून अधिक लोकसंख्या, या ठिकाणच्या नैसगिक साधन संपत्तीचा वापर करत असल्याने, ती साधन संपत्ती क्षय होत चालली आहे. ज्या प्रमाणात आज आपण, शेती जमिनी मधील पिके, पशुधन आणि इतर साधन संपत्ती आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरत आहोत त्याची पुर्ननिर्मिती करण्यासाठीचा अवधी दीर्घकाळ स्वरूपाचा असतो. शाश्वत विकासा मध्ये, पृथ्वीवरील साधन संपत्ती मध्ये वाढ करत असताना आपल्या गरजांची पूर्तता करताना त्या मध्ये समायोजन साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज जगामध्ये २०० कोटी लोकसंख्या सुरक्षित नाही. त्यांना सकस आहार मिळत नाही. त्या पैकी ३ कोटी बालक कुपोषित आहेत. तसेच आपले बहुतांशी शेती शाश्वत विकासाच्या तत्त्वांना धरून होत नाही. आपल्या शेती व्यवसाया मध्ये अर्थिक फायद्यासाठी म्हणून काही मोजक्या नगदी पिकांची वारंवार शेती केली जात असल्यामुळे शेत जमिनी मधील नैसर्गिक घटक कमी होत आहेत. आपण अशा स्वरूपाच्या पिकांच्या जाती विकसित करीत आहोत की, ज्यासाठी मुबलक पाणी आणि रासायनिक खतांची गरज असते. अशा पिकांना 'GM Food' किंवा 'Genetically Modified Crops' असे म्हटले जाते. शेतीचा योग्य रितीने वापर होण्यासाठी म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या पिके आलटून-पालटून घेणे अथवा जलसिंचना द्वारे शेतीला पाणी देणे योग्य समजले जात असले तरी, सेंद्रिय पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेतीला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

गुजरात राज्यातील 'अहमदाबाद' या ठिकाणच्या 'Institute for Studies and transformatin' या संस्थेने जैविक खते निर्माण करण्यासाठी म्हणून शेती मधला कचरा आणि जनावरांची विष्टा उपयोगात आणण्याचा प्रयोग सुरू केला आहे. अशा खतांचा शेती साठी उपयोग केल्याने शेत जमिन आणि पिके चांगल्या प्रकारे टिकून रहातात. तसेच अशा शेत पिकांवर कीड अथवा रोगांचे प्रमाण कमी आढळते.

आज पृथ्वीच्या एकूण भूपृष्ठापैकी ७० टक्के भाग हा पाण्याने व्यापला असला तरी, त्या पैकी केवळ अडीच टक्के पाणी शुद्ध असून त्या पैकी काही टक्केच पाणी पिण्यास योग्य म्हणून उरले आहे. त्यामुळे नजिकच्या २०२५ साला पर्यत, वाढत्या लोकसंख्येचा आणि नागरीकरणाचा परिणाम म्हणून, जगाच्या एकूण लोकसंख्ये पैकी २/३ इतक्या लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावणार आहे. शेती साठी सुद्धा पाण्याची टंचाई निर्माण होणार असल्याने ठिंबक सिंचनासारख्या योजनांना प्राधन्य देणे गरजेचे आहे. तसेच जलसंधारण प्रकल्प हाती घेत असताना पाऊसा पासून मिळणारे पाणी साठा करून ठेवले पाहिजे. तसेच जल-व्यवस्थापन इ. सारख्या तत्त्वांना शाश्वत विकासामध्ये महत्त्व दिले गेले आहे.

आज कधी नव्हे इतक्या प्रमाणात 'उर्जेची' (energy) गरज वाढत चालल्यामुळे, ती गरज पूर्ण करण्यासाठी तेल, कोळसा आणि गॅस याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पंरतू अशा इंधनांच्या ज्वलनामुळे हवेतील कार्बनडाय ऑक्साईड ($Co_2$) प्रमाण वाढल्यामुळे त्याचा 'हरितगृहावर' (Greenhouse)

परिणाम दिसून येवू लागला आहे. म्हणून अल्पदरात उपलब्ध असणारे, पुनर्निमित आणि स्वच्छ स्वरूपाच्या इंधनाद्वारे विकास घडून आला पाहिजे अशी शाश्वत विकासामध्ये अपेक्षा आहे. त्यासाठी 'पवन उर्जा' (Wind energy) आणि 'सौर उर्जा' (Solar energy) सारख्या माध्यमातून प्रभावी रित्या उर्जेची गरज करता येते. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात रहाणाऱ्या समुदायांना लहान ओढे (Strems) आणि नदयांच्या वरती लहान आकाराचे बंधारे उभारून त्यांची विजेची गरज पूर्ण करता येते.

असा एक अंदाज केला आहे की दरवर्षी जगातील एकूण जंगल क्षेत्राच्या 'साठेतीन' कोटी एकर जंगल तोड होत असते. त्यामुळे जंगलामध्ये असणाऱ्या विविध प्राणी आणि त्यांच्या प्रजाती (Species) साधारणपणे ११,००० वर नष्ट होतात. अशा नष्ट होणाऱ्या वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती केवळ आपल्या वैधकीय उपचार किंवा अन्न म्हणून नष्ट होत नाहीत. त्यांचा इतर कारणासाठी देखील उपयोग केला जातो. परंतु अशा जंगल तोडीमुळे 'पर्यावरणाचा समतोल' (Balance of ecosystem) बिघडत चालल्या मुळे नैसर्गिक आपत्ती चा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता आपणास सध स्थितीला ज्या स्वंरूपाचा विकास आपण करतो आहोत त्या पासून असणाऱ्या धोक्याची कल्पना येवू लागले आहे. कारण आपण ज्या पद्धतीने विकास प्रक्रिया राबवित आहोत त्यामुळे वातावरणात विषारी वायूचे प्रमाण वाढले आहे, समुद्रातील पाणी प्रदुषणामुळे सागरी जीवनावर दुष्परीणाम झाला आहे, जंगल तोडीचे प्रमाण वाढले आहे. जलप्रदुषणा बरोबर पाण्याचा दुरूपयोग केल जात आहे, शेत जमिनाचा अतिरेक वापर झाल्याने त्या पडीक झाल्या आहेत, आणि मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी जैव विविधता कमी होत चालली आहे. त्यासाठी म्हणून शाश्वत विकासाचे नविन स्वरूप आमलात आणण्याची गरज निर्माण झाली आहे, की ज्या मध्ये अर्थिक विकासाचा समतोल साधत असताना, पर्यावरण संरक्षणाला देखील महत्त्व दिले जाते.

**शाश्वत विकास अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचे स्वरूप–**

शाश्वत विकास अंतर्गत ज्या कार्यक्रमांची अमंलबजावणी केली जाते त्यामध्ये

१) स्वविकसित तंत्रज्ञान २) समाजातील निम्न स्तरातील लोकसंख्येचा विकास प्रक्रियेतील सहभाग वाढविणे. ३) पर्यावरण पोषक (Eco-Friendly) सेंद्रिय शेती (Orqanic Farming) करताना पिक घेण्याच्या पद्धती मध्ये विविधता आणणे. ४) पाऊसाच्या पाण्याचा साठा करण्यासाठी जलसंधारण प्रकल्प हाती घेणे. (Water Conservation Programme). ५) सौर उर्जा, पवन उर्जा, जंगलाचे संरक्षण, वनीकरण, इ. सारख्या पुनर्निमित उर्जा साधनांच्या द्वारे उर्जेची निर्मिती करणे. ६) सर्व प्रकारचे प्रदुषण कमी करण्याचा प्रयत्न करणे. ७) आपल्या जैवविविध तेचे संरक्षण करणे.

ज्यावेळी एखादी व्यक्ती, एका बाजूला पर्यावरण संरक्षणा बाबत बोलत असताना दुसऱ्या बाजूला मात्र विकासाची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील रहाते. ती व्यक्ती दोन्ही घटनांचे गांभीर्य विचारात घेत नसते. उदा–जर 'विकास' या संकल्पने बाबत एखाद्या द्रारिद्रंय कुटुंबातील व्यक्तीचे मत काय असू शकते तर, ती व्यक्ती आपल्या व मुलांच्या अन्न, शिक्षण व अन्य गरजा पूर्ण करण्यात विकास समजत असते. त्यामुळे 'शाश्वत विकास'चा विचार विकास करताना फारच कमी प्रमाणात होतो. ज्या वेळी नैसर्गिक पर्यावरणाच्या नाश करून जो विकास केला जातो त्याला प्रगती म्हणता येत नाही. मानव भविष्यात काही आपत्ती निर्माण होऊ नयेत म्हणून काही काळासाठी शाश्वत विकासाचा मार्ग निवडत असतो. त्यामुळे या

ठिकाणचा शाश्वत विकासाच्या मांडणी मध्ये विकास आणि पर्यावरण किंवा अर्थ व्यवस्था आणि पर्यावरण यांच्या मध्ये असणारे द्वंद किंवा परस्परविरोधी स्वरूप अभ्यासण्याचा नसून दोन्हीच्या मधील समन्वयाचा अभ्यास त्यामध्ये महत्वाचा समजला जातो. तसेच समाजातील श्रीमंत आणि गरीब यांच्या मधील संघर्षाचा अभ्यास शाश्वत विकासाशी नसून संपूर्ण मानव जातीचे हितसंबंध शाश्वत विकासाशी निगडीत आहेत.

**स्वयं अध्ययन साठीचे प्रश्न–१ (क)** (Check your Progress)

**जोडया जुळवा**

| 'अ गट' | 'ब गट' |
|---|---|
| १) पर्यावरण परिषदेचे आयोजन | अ) निम्न स्तरातील लोकसंख्येचा सहभाग |
| २) उर्जा समस्येवरील पर्याय | ब) जंगल तोड |
| ३) प्रजातीचे अस्तीत्व धोक्यात | क) एकच-एक पिक घेण्याची पद्धती |
| ४) शेत जमिनीच्या प्रदूषणाचे कारण | ड) रिओ-दि-जेनिरो |
| ५) शाश्वत विकासाचे उद्दिष्टे | इ) सौर उर्जा प्रकल्प |

**३.३.२ असमान अर्थिक विकासाचा सिद्धांत** (Centre Periphery Theory) **:**

सामान्यता संपूर्ण जगातील देशांच्या अर्थिक विकासाचे प्रमाण किती आहे. या संबंधीचे मापदंड निश्चित करताना, त्याचे १) विकसित देश, २) अविकसित देश, ३) विकसनशील देश अशा प्रमुख तीन प्रकारांमध्ये विभाजन केले जाते. विकास प्रक्रिया अखंडपणे चालू असली तरी तिचे प्रमाणे सर्वच मानवी समाजात एक सारखे आढळत नाही. सदरच्या असमान अर्थिक विकासाच्या सिद्धांतान्वये, ज्या ठिकाणच्या मानवी समाजातील अर्थिक विकास प्रगतशील किंवा अधिक आहे, असे मानवी समाज आणि ज्या मानवी समाजांचा अर्थिक विकास बेताचा किंवा अल्प स्वरूपात झालेला आहे. अशा दोन्ही देशांच्या मधील परस्पर संबंधाचे विश्लेषण करताना, जी एक विचारसरणी विचारात घेतली जाते त्याला 'असमान अर्थिक विकासाचा सिद्धांत' असे म्हणतात.

साधारणपणे विश्वातील भांडवलशाही राष्ट्रे आणि विकसनशील समाज यांच्यातील परस्परसंबंधाचे स्वरूप स्पष्ट करताना, भांडवलशाही राष्ट्रे, अविकसनशील समाजातील मनुष्यळ, उद्योगासाठी लागणारी जागा, जमिन, पाणी इ. सारख्या घटकांचा स्वतःच्या विकासासाठी कशा प्रकारे उपयोग करून घेत असतात. या संबंधीचा विचार या सिद्धांतामध्ये प्रमुख समजला गेला आहे. युरोपियन राष्ट्रांच्या मधील भांडवलशाही राष्ट्रे आणि अशिया खंडातील विकसनशील राष्ट्रे अशा दोन राष्ट्रामधील अर्थिक विकास एक सारखा नसला तरी, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर खुल्या बाजारपेठा, लायसन्स राज, उदारीकरण, खाजगीकरण इ. च्या अर्थिक शिथिली करणाच्या प्रक्रियेतून जगातील मानवी समाज परस्परावलंबी विकासाला महत्त्व देऊ लागले.

**१) मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव :**

असमान अर्थिक विकासाच्या सिद्धांतावरती मार्क्सवादी विचाराचा प्रभाव आढळून येतो. कारण कार्ल

मार्क्स यांनी त्यांच्या एकूण वैचारिक मांडणी मध्ये युरोप खंडात उदयास आलेल्या भांडवलशाहीचा परिणाम म्हणून, समाजात निर्माण होणारी अर्थिक विषमता आणि नफाखोर वृत्तीचे विश्लेषण केले होते. त्यांच्यामते भांडवलशाही एक अशी उत्पादन पद्धती आहे की, ज्या मध्े केवळ नफा किंवा अर्थिक फायदा हा प्रमुख उद्देश असतो आणि त्यासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जात नाही. त्याचप्रमाणे भांडवलशाहीच्या विस्ताराला अंत नसतो. जगभरातील बाजारपेठांच्यावर अर्थिक नफा मिळवण्यासाठी वर्चस्व प्रस्थापित करणे, कारखानदाराच्या हिताचा विचार करणे अशी उद्दिष्ट साध्य करण्यापलीकडे दुसरा कोणताही हेतू नसल्यामूळे भांडवलशाही ही एक केंद्रस्थान (Center) असणारी संस्था आहे.

**२) जागतिकीकरणातून झालेला असमान अर्थिक विकास :**

अर्थिक उदारीकरण (Libralisation), खाजगीकरण (Privatization), आणि (Globalisation) 'LPG' नांवाने संबोधल्या जाणाऱ्या प्रक्रियेचा संबंध संपूर्ण विश्वभर वाढत असलेल्या भांडवलदारीच्या प्रसाराचा एक परिणाम आहे. गेल्या दोन दशकापासून, युरोपखंडा पुरती सिमीत असणारी भांडवलशाहीची प्रक्रिया हळू-हळू जगातील इतर देशामध्ये मूळ धरू लागली. परंतू भांडवलशाहीचा 'युरोप' केंद्र बिंदू मात्र पूर्वी पेक्षा अधिक सक्षम होत गेला. जगातील बाजारपेठांच्यावर काही विशिष्ट युरोपियन देशांची मक्तेदारी आज देखील आढळते. या उलट विकसनशील देश आपल्या राष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाणे कमी करण्याच्या उद्देशाने जागतिकीकरणाच्या प्रवाहात सामिल झाले. परकिय गंगाजली वाढविण्याच्या उद्देशाने बहुराष्ट्रीय कंपन्याना आमंत्रण दिले यातून त्याचा अर्थिक विकास होत गेला असला तरी, भांडवलशाही राष्ट्रा इतकी त्याची प्रगती होऊ शकली नाही. याचे कारण, विकसनशील देशांना नियंत्रित करण्याचे कार्य भांडवलवादी राष्ट्रे करीत असतात. याच विचारा सरणीचा आढावा (Center-Periphery) सिद्धांतामध्ये घेतलेला आहे.

**३) ए.आर.देसाई यांचा मार्क्सवादी दृष्टीकोन :**

'Social Background of Indian Nationalism' या ग्रंथामध्ये ए.आर.देसाई यांनी मार्क्सवादी दृष्टीकोनातून ब्रिटीश साम्राजवादाच्या काळात भारतीय ग्रामीण समाजाच्या अर्थिक आणि सामाजिक जीवनावर झालेले विपरीत परिणाम अभ्यासले आहेत. त्यांच्या मते, ब्रिटीशांच्या भांडवलवादी अर्थिक धोरणाचा परिणाम म्हणूनच ग्रामीण भारतातील पारंपारिक घरगुती उत्पादन पद्धती, हस्तव्यवसाय, शेती व्यवसाय यांच्यावर परिणाम झाल्याने भारतातील दारिद्र्याचे प्रमाणे वाढले. ब्रिटीश साम्राज्यवाद म्हणजे भांडवलशाहीचेच एक रूप होते. त्यांनी आपला राज्य कारभार आणि आपली वसाहतवादाचे राजकारण करताना, भारतातील साधन संपत्तीचा आणि अज्ञानाचा फायदा घेवून स्वतःचा अर्थिक फायदा करवून घेतला.

**४) विकसित आणि विकसनशील देशातील विकासवाढीच्या दरातील तफावत :**

असमान विकास सिद्धांतान्वये, विकसनशील देशांची उत्पत्ती, म्हणजे सामाजिक परंपरेचा भाग नसून भांडवलशाही देशांच्या विकासासाठी आणि त्यांच्या देशात निर्माण होणाऱ्या उत्पादित मालाची बाजारपेठ मिळण्यासाठी विकसनशील देशांची उत्पत्ती एक प्रक्रिया आहे. केंद्रस्थानी असणाऱ्या भांडवलशाही राष्ट्रातील अर्थ व्यवस्था जागतिक बाजारपेठांच्यावरून निर्धारीत होत असते. शिवाय त्या ठिकाणच्या भांडवलदारांच्या मधील संबंधाचे स्वरूप घनिष्ट असतात. त्या ठिकाणी श्रमिकांना मिळणाऱ्या वेतनाचे प्रमाणे जास्त असते. या उलट विकसनशील देशातील भांडवलदारांच्या मधील संबंध फारसे घनिष्ट नसतात. श्रमिकांना मिळणाऱ्या वेतनाचे

प्रमाणे देखील कमी असते त्यामुळे विकसनशील देशातील श्रमिक बिगरभांडवलवादी म्हणजे ग्रामीण रोजगारी मध्ये कार्यरत असतो. अर्थातच त्यामुळेच विकसनशील देशातील अर्थव्यवस्थे मधील उत्पादित माल आणि त्या मालाचे वितरण अधिकतर बाजारपेठांच्या व्यतिरिक्त स्थानिक दलाल व्यापारी यांच्यातील परस्पर, संबंधातून निर्धारित होत असते.

**५) भांडवलशाही राष्ट्रांची अर्थिक रणनिती :**

या सिद्धांतान्वये, भांडवलशाही राष्ट्रे एकूण जागतिक अर्थ व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असतात. (Center) त्यामुळे अशा राष्ट्रांच्या कडून लष्कर, राजकीय सत्ता आणि व्यापारा वरील मक्तेदारी हाताशी धरून विकसनशील अर्थिक पिळवणूक करीत असतात. त्याचे एक उदाहरण म्हणजे, विकसनशील राष्ट्रातील श्रमिकाचे वेतन भांडवलशाही राष्ट्रांच्या तुलनेत अल्प असल्याने विकसनशील राष्ट्रांच्यामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या आपले उद्योग स्थान करतात. त्यामुळे सकृत दर्शनी आपला समज असा होतो की, भांडवलशाही राष्ट्रे विकसनशील देशाच्या उद्धारासाठी या ठिकाणी आपले उद्योग स्थापन करीत आहेत. परंतू वस्तुस्थिती मात्र वेगळीच असते. भांडवलशाहीच्या बुरख्याखाली, विकसितराष्ट्रे विकसनशील देशांना पायाखाली तूडवून आपला विकास साधत असतात.

अशाप्रकारे असमान विकास किंवा असंतुलित अर्थिक विकासाचा सिद्धांत जगातील भांडवलवादी राष्ट्रे (Center) आणि विकसनशील देश (Periphery) यांच्या मधील परस्परसंबंधावर आधारित असून, भांडवलवादी विचार सरणीचा परिणाम म्हणून, त्या ठिकाणचा विकास हा विकसनशील राष्ट्रांच्या मधील अर्थिक शोषणाचा परिणाम असतो. हे मुख्य तत्त्व या सिद्धांतामधून स्पष्ट होते. याच आधारावरती असणारा दुसरा एक महत्त्वपूर्ण सिद्धांत म्हणजे, 'जागतिक-व्यवस्थेचा सिद्धांत' (World system theory) म्हणून विचारात घेतला जातो.

### **३.३.३ वैश्विक व्यवस्थेचा सिद्धांत** (World-system theory) :

इम्युनल वॉल स्ट्रीन या अभ्यासकाने त्याच्या 'The modern world system Capitalist Agriculture and the origins of European world economy in 16th century' या पुस्ताकामध्ये वैश्विक व्यवस्थेचा सिद्धांत स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, १४५० ते १६७० या कालखंडात पश्चीम युरोपमध्ये सरंजामशाहीचा अंत होऊन, आधुनिक भांडवलशाही मुळे युरोपियन राष्ट्रांची वर्चस्व प्रस्थापित होण्यास सुरूवात झाली होती. आधुनिकीकरणाच्या या कालखंडातील सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करताना वॉलस्ट्रीन यांनी प्रत्यक्ष पश्चिम युरोपीय राष्ट्रांमधील अंतर्गत समाज व्यवस्था आणि विश्वातील अन्य इतर राष्ट्रांच्यामधील समाजरचना यांच्यातील तुलनात्मक अभ्यास पद्धती मधून वैश्विक व्यवस्थेचा सिद्धांत स्पष्ट केला आहे.

- **युरोप मधील संरजामशाहीचा अंत :**

पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्यामध्ये भांडवलशाहीचा उगम होण्यापूर्वी १७ व्या शतका आगोदर संरजामशाहीचे (Feudalism) वर्चस्व होते. परंतू १३ व्या आणि १४ व्या शतकापासून शेती अर्थव्यस्थेमध्ये आलेल्या मंदीचा परिणाम म्हणून सरंजामशाही अस्थिर होऊ लागली. वॉलस्ट्रीन यांच्यामते १) शेती उत्पादनात झालेली घट, २) शेती अर्थ व्यवस्थे ऱ्हास, ३) वातावरणातील बदलाचा शती उत्पादन आरोग्यावरील परिणाम या

सारख्या कारणांचा परिणाम संरजामशाही संपुष्टात आली.

- **नविन स्वरूपाच्या युरोपियन अर्थ व्यवस्थेचा उदय :**

वॉलस्ट्रीन यांच्यामध्ये पश्चिम युरोपीय देशातील अर्थिक विकासाचे सातत्य टिकून रहाण्याच्या उद्देशाने या राष्ट्रांची भांडवलशाही स्थापन करण्याच्या उद्देशाने सुरूवात झाली. त्या दृष्टीने त्यांनी विविध प्रकारच्या अवजड यंत्राची निर्मिती आणि त्या यंत्रासाठी लागणारा कुशल कामगार वर्ग स्थापन करून त्या केवळ आपल्या राष्ट्रांपर्यंत सिमित न ठेवता, त्याचा जगातील इतर राष्ट्रांच्यामध्ये विस्तार करण्यास सुरूवात केली. त्यामुळे नविन स्वरूपाची जागतिक अर्थ व्यवस्था हळू-हळू आकाराला येवू लागली होती. अशा स्वरूपाच्या नविन अर्थ व्यवस्थेचा उगम होण्यापूर्वी पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्यामध्ये राजेशाहीच्या वर्चस्वाखाली अर्थ व्यवस्था नियंत्रित केली जात असल्याने व्यापार आणि उत्पादित मालाचे वितरण किती मर्यादे पर्यंत, बाहेर राष्ट्रापर्यंत करावयाचे या सबंधीचा निर्णय घेतला जात असे. परंतू भांडवलशाही ही एक अशी व्यवस्था होती ज्याद्वारे, सर्व प्रथम राजकीय सीमाचे उल्लंघन करून, अर्थिक बाजारपेठाचा विस्तार मर्यादित क्षेत्रापुरता न ठेवता त्यांच्या राजकीय सीमा वाढविण्याचा प्रयत्न केला.

नविन स्वरूपात आलेली, वैश्विक भांडवलवादी अर्थ व्यवस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करताना, तिचे स्वरूप आणि एकूण कार्यपद्धती जगातील इतर प्रांतामध्ये भिन्न-भिन्न स्वरूपाचे होते. तसेच या भिन्न-भिन्न प्रांतातील अर्थ व्यवस्थेचा संबंध हा त्या ठिकाणच्या शासन व्यवस्थेशी होता. वॉलस्ट्रीन यांनी जागतीक भांडवलशाही अर्थ व्यवस्थेचे विश्लेषण करण्याच्या उद्देशांनी त्यांनी त्यांचे एकूण चार प्रकारामध्ये विभाजन केले आहे हे चार विभाग म्हणजे -

१) केंद्रस्थानी असणाऱ्या भांडवलवादी राष्ट्रीय अर्थ व्यवस्था (Core)

२) परीघ-क्षेत्रात येणारी भांडवलवादी राष्ट्रे (Periphery)

३) निमपरिघ क्षेत्रात येणारी भांडवलवादी राष्ट्रे (Semi-Periphery)

४) बाह्य क्षेत्रात असणारी भांडवलवादी राष्ट्रे (External)

चा चार प्रकारांच्या राष्ट्रामधील अर्थ व्यवस्था आणि राजकारण या घटकांचे स्वरूप एकूण जागतिक अर्थ व्यवस्थेच्या अनुषंगाने अभ्यासण्याचा प्रयत्न वॉल स्ट्रीन यांनी केला आहे.

**१) केंद्र स्थानी असणारी भांडवलवादी राष्ट्रे** (The core) **:**

जागतिक भांडवलशाहीचा सर्वात जास्त फायदा मध्यभागी किंवा केंद्रस्थानी असणाऱ्या राष्ट्रांना मिळतो. यामध्ये इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड सारख्या प्रदेशांचा समावेश होतो. या राष्ट्रांच्यामधील शासन व्यवस्था अधिक मजबूत आढळते. व्यापक स्वरूपाची नोकरशाही आणि पैसा घटकाला महत्त्व देणारी व्यवस्था असल्यामुळे त्या ठिकार्णच्या स्थानिक श्रीमंत वर्गाला स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून अतिरिक्त संपत्ती कमविण्याचा प्रयत्न करीत असत. तसेच ज्यावेळी ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झाली तस-तसे खेड्यातून शेती आणि कारखानदारी साठी श्रमिक वर्ग उपलब्ध होऊ लागला. अशा प्रकारे सरंमजामशाही मधल्या अर्थिक शोषणातून ग्रामीण श्रमिकांची सुटका झाली तरी भांडवलशाहीमुळे अनेकांना भूमीहिन व्हावे लागले. असे भूमीहिन शेतमजूर शहरांकडे उद्योग धंद्यामध्ये अल्पवेतनावर काम करू

लागले. बाजारपेठांवर आधारीत शेती व्यवसायाला महत्त्व येवू लागल्याने शेती उत्पादनात वाढू होऊ लागली शेती तंत्रज्ञानात बदल होऊन नविन अर्थ व्यवस्था उदयास आली.

**२) परीघक्षेत्रात येणारी भांडवलवादी राष्ट्रे** (The Periphery) :

परीघ क्षेत्रातील राष्ट्रांच्या मधील केंद्र शासन मजबूत नसल्याने इतर राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली याचे शासन चालत असते ही राष्ट्रे केंद्रस्थानी असणाऱ्या राष्ट्रांना कच्चा माल पुरवित असत. तसेच केंद्र स्थानी असणाऱ्या भांडवलदारांच्या वर्चस्वाखाली परीघ क्षेत्रातील अर्थ व्यवस्था असल्याने, व्यापार संबंधातून अतिरिक्त पैसा केंद्र स्थानी असणारे भांडवलदार मिळवू लागले. जमिनदार शेतमजूरांची पळिवणूक करू लागले. परिघ क्षेत्रातील श्रमिक केवळ आपल्या उदरनिर्वाहा पुरते उत्पादन करीत नव्हते तर केंद्रस्थानी असणाऱ्या भांडवलदारांच्यासाठी त्यांना उत्पादन करावे लागत असे.

**३) निम-परिघ क्षेत्रातील भांडवलवादी राष्ट्रे** (Semi-Periphery) :

केंद्र आणि परीघ क्षेत्रामध्ये निम परिघ राष्ट्रे येतात. ही राष्ट्रे केंद्र स्थान असणारी राष्ट्रे आणि परीघ क्षेत्रात असणारी राष्ट्रे यांच्यमध्ये सुवर्णमध्य ठेवण्याचे कार्य करतात. त्यामुळे याराष्ट्रात केंद्रशासन आणि स्थानिक शेतमजूर यांच्यामध्ये सतत तणाव आणि संघर्ष आढळतो. काही वेळा निम-परिघ क्षेत्रातील अर्थिक पिळवणूकीला केंद्रस्थानी असणारी राष्ट्रे जबाबदार असतात. त्याप्रमाणे स्वतः ती राष्ट्रे पिळवणूकीला कारणीभूत ठरू शकतात.

**४) बाह्य क्षेत्रात असणारी भांडवलशाही राष्ट्रे** (External) :

या क्षेत्रात येणाऱ्या राष्ट्रांनी त्यांची स्वतःची अर्थ व्यवस्था निर्माण करून, जागतीक अर्थव्यवस्थेपासून स्वतंत्र रहाण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये रशियन अर्थ व्यवस्थेचा समावेश होतो. उदा. रशियाने गव्हाची निर्यात करण्यापेक्षा अंतर्गत बाजारपेठात त्याची विक्री केली. इतर राष्ट्रांना काही प्रमाणात निर्यात केली तरी, आपल्या अंतर्गत व्यापाराला अधिक महत्व दिले जाते. तसेच रशियाने बाह्य अर्थ व्यवस्थेच्या प्रभावावर नियंत्रण ठेवताना आपल्या स्थानिक अर्थ व्यवस्थेवर योग्य नियंत्रण ठेवले.

वॉल स्ट्रीन यांनी मांडलेल्या जागतिक अर्थ व्यवस्थेचे स्वरूप गतीशील असून, तीचे स्वरूप कालानुरूप बदलणारे आहे. या प्रकारच्या जागतिक अर्थ व्यवस्थेचा सर्वात जास्त फायदा केंद्रस्थानी असणाऱ्या राष्ट्रांनाच अधिक होणार असतो हे स्पष्ट दिसते आणि युरोपमधल्या पश्चिम राष्ट्रांनी या व्यवस्थेचा अधिक फायदा मिळवलेला दिसतो. आंतरराष्ट्रीय व्यापारातून कमालीचा नफा या राष्ट्रांना मिळत असताना त्यांनी परिघ क्षेत्रात येणाऱ्या राष्ट्रातील बाजारपेठांचा अवलंब करून, त्या ठिकाणच्या कच्चा मालाची आयात करून त्यांच्या जोरावर ही राष्ट्रे भांडवलवादी झाली आहेत. अर्थात, याचा अर्थ, केंद्रस्थानी असणारे सर्वच भांडवलदार श्रीमंत आणि परीघ क्षेत्रात असणारे सर्वच दारिद्र्य झाले असे म्हणता येत नाही. कारण परिघ क्षेत्रात असणाऱ्या जमिनदारांनी स्थानिक शेतमजूरांचा अल्प वेतन देऊन फायदा करून घेतलेला दिसतो. आणि केंद्र स्थानी भांडवलशाहीचा परिणाम, म्हणून खेड्यातील शेतमजूरांची पिळवणूक झालेली दिसते. थोडक्यात वॉल स्ट्रीन यांच्या मते, जागतीक भांडवलशाही अर्थ व्यवस्थेचे स्वरूप आणि दिशा ही मुख्यता जागतिक लोकसंख्येच्या घटकावरून निश्चित होत असते.

### ३.४ सारांश (Let us sum up) :-

विकासाच्या बदलत्या संकल्पना या विषया अंतर्गत मुख्यता, मानवी विकास संकल्पना, सामाजिक विकास आणि शाश्वत विकास याचा परिचय करून घेत असताना. मानवी समाजव्यवस्था, विकास संकल्पनेला प्रभावित करते. कारण अर्थशास्त्रीय अभ्यासाशी निगडीत असणाऱ्या विकासा सबंधीच्या अभ्यासात अर्थिक दृष्टीकोनातून विवेचन करताना 'व्यक्ती' आणि 'समाजरचना' असे दोन प्रमुख समाजशास्त्रीय घटकांचा संदर्भ घेतल्या खेरीज, अर्थिक विकासाचे स्पष्टीकरण पूर्ण होत नाही. 'विकास' ही मानवी समाजात अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. विकास संकल्पनेला अभ्यासकांनी विचारात घेत असताना. या संकल्पनेचा विविध अंगानी अभ्यास केलेला आहे.

सर्व प्रथम मानवी विकास (Human Development) ही संकल्पना विचारात घेत असताना मानवी विकासाचा सामाजिक घटकांशी येणारा सबंध स्पष्ट करताना, समाजातील व्यक्तींच्या बचत आणि गुंतवणूक करण्याच्या प्रवृत्तीचा, आर्थिक वृद्धीशी असणारा सबंध, त्याच प्रमाणे एखाद्या समाजात 'उद्योजकता' हा गुण निर्माण होण्यासाठी मागची सामाजिक परिस्थिती, औद्योगिक विकास घडून येण्यासाठी उपलब्ध असणारी साधन संपत्ती, औद्योगिक धोरण इ. सारख्या सामाजिक घटकांचा प्रभाव म्हणून अर्थिक वृद्धी होत असते. त्याचप्रमाणे लोकसंख्ये मधल्या व्यक्तींना मिळणारी रोजगारसंधी, वेतन आणि बचत यांचे प्रमाण, मालाची मागणी आणि पुरवठा इ. अर्थिक घटकांच्या मागे सामाजिक घटकांचा प्रभाव असल्यामुळेच अर्थिक वृद्धीचे स्वरूप निश्चीत होत असते.

त्यानंतरच्या 'सामाजिक विकास' (Social Development) या संकल्पने अंतर्गत प्रत्येक समाजातील स्थानिक समस्या, लोकसंख्येच्या गरजा आणि समाजरचने नुसार विविध समुदायांची रचना आणि त्याचे प्रश्न यांचा सामाजिक विकासाशी सबंध येतो. सामाजिक विकास करत असताना मुख्यता 'व्यक्ती' हा घटक केंद्रित मानून त्याचा अर्थिक सामाजिक आणि सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न, लोकांच्याच प्रयत्नातून केला जातो. समाजातील दारिद्रयाचे निर्मूलन, प्रौढ शिक्षण सामाजिक ऐक्य, स्त्री-पुरूष समानता, मानवी अधिकार इ. सारख्या निकषावर एखाद्या समाजातील सामाजिक विकासाचे स्वरूप समजून येते. सामाजिक विकास ही व्यापक अशी संकल्पना आहे. परंतु त्याबाबत प्रत्येक राष्ट्राच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. परंतु सर्व साधारणपणे समाजातील उपेक्षित, वंचित, पिडीत, समुदायासाठी ङ्गसमाज विकासफ एक महत्वाचे साधन म्हणून आमलात आणले जाते.

शेवटच्या 'शाश्वत विकास' (Sustainable Development) या संकल्पनेचा अर्थ आर्थिक विकास आणि मानवी जीवनाची उद्दिष्टे या दोन घटकांच्या अनुषंगाने करत असताना. नजिकच्या काळात आर्थिक विकासाची दिशा आणि वेग, भविष्यातील पिढीच्या संरक्षणासाठी कसा असावा या बद्दल विवेचन केले आहे. कारण आर्थिक विकासाचे परिणाम मानवी पर्यावरणावरती होऊ लागल्याने प्रदूषण, नैसर्गिक आपत्ती वाढत आहे. साधन संपत्तीचा ऱ्हास होत आहे. अशा वेळी वेळीच सावध होऊन विकास प्रक्रियेला अशा प्रकारे निर्धारीत केले पाहिजे की, ज्या मधून शाश्वत विकास घडवून आणत असताना मानवी पर्यावरणाचा कमीत-कमी ऱ्हास होऊन, येणाऱ्या पिढीचे संरक्षण करणे त्यामुळे शक्य होईल. थोडक्यात 'शाश्वत विकास' ही काळाची गरज असून, जगातील सर्व अभ्यासकांनी त्याचा गंभीरपणे विचार केला आहे.

## ३.५ पारिभाषिक संज्ञाः–

- **मानवी विकास** : लोकांच्या निवडीच्या विस्ताराची प्रक्रिया म्हणजे मानवी विकास होय.
- **सामाजिक विकास** : मानवी विकासाशी सबंधीत घडून येणारी क्रिया ज्यामध्ये मानवी जीवनाचा सर्वांगीन विकास महत्वाचा समजला जातो.
- **शाश्वत विकास** : अर्थिक विकासाचे असे धोरण की ज्या विकासातून मानव आणि निर्सगाचे संरक्षण करण्याच्या प्रयत्नाला विशेष प्राधान्य दिले जाते.
- **प्रौढ शिक्षण** : विशिष्ट वयोगटातील व्यक्तींच्या मध्ये साक्षरता निर्माण करण्यासाठी उपयोगात आणलेली योजना.
- **सेंद्रिय शेती** : ज्या शेती करण्याच्या पद्धतीमध्ये, रासायनिक खताचा वापर केला जात नाही अशी शेतीची पद्धत.

## ३.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to Check Your Pragress) :-

**जोड्या जुळवा १ (अ)**

| ‘अ गट’ | ‘ब गट’ |
|---|---|
| १) राष्ट्राची खरी संपत्ती | ड) राष्ट्राचे लोक |
| २) अपेक्षित शालेय वर्षे | क) १८ वर्षापेक्षा कमी |
| ३) लोकसंख्या वाढीचा दर | ब) जन्म–मृत्यू यावर ठरतो |
| ४) लिंगविषयक सूचक | इ) महिलांचा विकासाचा स्तर |
| ५) निसर्गाचे संरक्षण | अ) विकास चिरंतर पाहिजे |

**जोड्या जुळवा १ (ब)**

| ‘अ गट’ | ‘ब गट’ |
|---|---|
| १) सामाजिक परिषदेचे आयोजन | इ) कोपन हेगेन |
| २) प्रौढ शिक्षण | अ) निरक्षरतेचे प्रमाण कमी |
| ३) शाश्वत विकास | ड) आर्थिक विकासाला पर्याय |
| ४) द्रारिद्रय निर्मलून | ब) सामाजिक विकासाचे उद्दिष्ट |
| ५) मानवी हक्क संरक्षण | क) लोकशाही व्यवस्था |

**जोड्या जुळवा १ (क)**

| **‘अ गट’** | **‘ब गट’** |
|---|---|
| १) पर्यावरण परिषदेचे आयोजन | ड) रिओ-दि-जेनिरो |
| २) उर्जा समस्येवरील पर्याय | इ) सौर उर्जा प्रकल्प |
| ३) प्रजातीचे अस्तीत्व धोक्यात | ब) जंगल तोड |
| ४) शेत जमिनीच्या प्रदूषणाचे कारण | क) एकच-एक पिक घेण्याची पद्धती |
| ५) शाश्वत विकासाचे उद्दिष्टे | अ) निम्न स्तरातील लोकसंख्येचा सहभाग |

## ३.७ सरावासाठीचे प्रश्न (Exercise / Home Assingment) :-

१) मानवी विकासाची संकल्पना विशद करा.

२) सामाजिक विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

३) शाश्वत विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

४) सामाजिक विकासाचे कार्यक्रम स्पष्ट करा.

५) शाश्वत विकासाचे महत्त्व स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठीची पुस्तके (Suggested Readings) :–


1. Abraham Francis M "Contamporary Sociology An Introduction. To Concepts and Theories". oxford University press. 2006.
2. Tamil Nadu Social Development Report 2000.
3. R.B.Patil. - S.A.Salunkhe, R.B.Jadhav. I.S.Subhedar. "Development in india Anxieties and Alternative Paradiqms" 2004.
4. R. B. Patil- "Natural Resource and Sustainability & Indian Society" Shruti publication Jaipur 2009.
5. Dreze, Jean and Amartyasen "India Economie Development and social opportunity", New Delh 1996.
6. World Commission on Environment and Development - our Common Future Brundland Report-1987.
7. Gordon Marshall, 'Dictionary of Sociology 1988.'
8. Immnuel Wallerstein, The modern system : Capitalist Agriculture and origins of the European world economy in 16th centry, New york Academic Press 1974.

9. Datt Gaurav & Mahajar Indian Economys, Chand & Company, 2012.

10. www.un.org

11. Dr. Arun Paudmal & Dr. Balaji Kendre : Sociology of Change and Development, Centre for Distance Education, Shivaji University, Kolhapur (2014)

❑❑❑

# घटक ४
# विकासाचे मार्ग
## (Paths of Development)

**घटक संरचनाः**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

    ४.३.१ विकासाचा भांडवलवादी मार्ग

    ४.३.२ विकासाचा समाजवादी मार्ग

    ४.३.३ मिश्र अर्थव्यवस्था - विकासाचा एक मार्ग

    ४.३.४ महात्मा गांधींचा विकाससंबंधीचा दृष्टीकोन

४.४ सारांश

४.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.१ उद्दिष्टये (Objectives) :–

या प्रकरणाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला

★ विकासाचे भांडवलवादी प्रारूप काय आहे हे समजून घेता येईल.

★ त्याच बरोबर विकासचे समाजवादी प्रारूप काय आहे हे ही समजून घेता येईल.

★ भारताने स्वीकारलेले विकासाचे संमिश्र प्रारूप काय आहे हेही समजून घेता येईल.

★ महात्मा गांधींचा विकाससंबंधीचा दृष्टीकोन समजून घेण्यास मदत होईल.

या संकल्पना समजून घेता येतील व त्याचबरोबर यांच्यातील परस्पर संबंध समजून घेण्यास मदत होईल.

## ४.२ प्रास्ताविक (Introduction) :–

माणसाची मुलभूत गरज भागल्यानंतर सर्वात महत्वाचा समस्येचे मुळ म्हणजे सत्तेचा दुरउपोग होय. या बाबतीत असेही म्हटले जाते की सत्ता माणसाला भ्रष्ट बनवते आणि अनियंत्रित (absolute) सता अनियंत्रीत भ्रष्टांचार करते. असेच काही औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात घडल्याचे दिसून येते. याच विषयावर जगाच्या इतिहासात जास्त चर्चा असल्याचेही दिसून येते. २० व्या शतकाच्या इतिहासामध्ये दुसऱ्या

महायुद्धाला फारच महत्व मिळाले कारण, त्यानंतर बऱ्याच राष्ट्रांना वसाहतवादापासून स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर अविकसित राष्ट्राचे विविध प्रश्न पुढे आले. अविकसित राष्ट्रांना पाश्चीमात्य राष्ट्रांचा सबंध आल्यामुळे त्यांचे काही प्रश्न अनुत्तरीतय राहीले. वसाहतीच्या काळात गुलामी वंशाच्या लोकामध्ये प्रभावी राजकीय भावना ही राष्ट्रवादा विषयी होती. इतिहासातील सर्व महत्वाच्या घडामोडी जसे, एकाधिकारशाही, भांडवलशाही, आणि समाजवादी व्यवस्था आणि लोकशाही व्यवस्था या राष्ट्रवादी द्रष्टीकोनातून पाहिल्या होत्या. नंतरच्या काळात जे काही स्वीकारायचे होते ते वसाहतवादी विचारांना पटणारे व बिगर टिकात्मक असे स्वीकराण्यात आले. प्रमुख बाबीमध्ये प्रामुख्याने पाश्चात्य शिक्षण आणि संस्कृती याचा स्वीकार अविकसित राष्ट्रानी केला. ज्यामध्ये फक्त पाश्चात्याची गुलामगीरी करणारे डोकेच विकसित होत आहेत असे दिसते. त्यामुळे आजही अविकसित राष्ट्रांचे विकासाचे प्रश्न सुटलेले नाहीत. कारण भांडवलशाही व समाजवादी विकासचे प्रारूप मुळातच यूरोपमध्ये विकसित झाले असल्याने त्याचा स्वीकार अविकसित राष्ट्रांना किती फायदेशीर होतो हा प्रश्न होता आणि आहे. या सदरच्या प्रकरणामध्ये आपण जागतिक स्तरावर चर्चीलेले वेगवेगळे विकासाचे मार्ग कोणते आहेत त्याचा सविस्तर आढावा या प्रकरणामध्ये घेणार आहोत. त्याच बरोबर भारतीय समाजाला अवश्क असणाऱ्या व सध्या स्वीकारलेल्या विकासाच्या प्रारूपाचे अध्ययन आपण या प्रकरणामध्ये करणार आहेत.

## ४.३ विषय विवेचन (Subject Matter):-

अविकसित आणि विकसनशील अर्थव्यवस्थेच्या विकासातील मार्गात असणारे विविध अडथळे दूर करण्यासाठी अर्थिक नियोजनाचा अवलंब केला जातो. नियोजित नियोजनाचा उपयोग अनेक देशात केला जात असला तरी प्रत्येक देश आपल्या स्वताच्या परिस्थितीला अनुसरून नियोजनाच्या तंत्राचा अवलंब करत असतो. या तंत्रानुसार अर्थिक विकासाच्या नियोजनाचे प्रकार पाडण्यात येतात. असे असले तरी विशिष्ट अर्थव्यवस्थेते एका ठराविक प्रकाराचा अवलंब केला आहे असे दाखवणे कठीण असते. कारण एकाच अर्थव्यवस्थेत परस्पर पूरक अशा विविध तंत्राचा एकाचवेळी वापर होतांना दिसतो जसे, भारतीय अर्थव्यस्थेतील नियोजनाचा उल्लेख आपण लोकशाही नियोजन, मिश्र अर्थव्यवस्थेतील नियोजन, रचनात्मक नियोजन आणि समाजवादी नियोजन अशा आनेक प्रकारे केले जावू शकते. म्हणून नियोजनाच्या प्रकारांचे तंतोतंत किंवा काटेकोर पणे विभाजन करणे वास्तवतेला धरून होणार नाही. असे असले तरी सदरच्या प्रकरणात विकासाच्या प्रमुख चार प्रकारांची सविस्तर चर्चा केली आहे.

### ४.३.१ विकासाचा भांडवलवादी मार्ग (Capitalist Path of Development) -

जगात सर्वात प्रथम कार्ल मार्क्स या समाज शास्त्रज्ञाने असे स्पष्टपणे मांडले की, मानव समाज हा नेहमीच दोन वर्गाचा बनलेला असतो. हे विसंगत हितसंबंधाचे वर्ग एकमेकांशी जास्त काळ सहकार्याचे सबंध ठेऊ शकत नाहीत म्हणजेच या दोन वर्गातील एका वर्गाकडे उत्पादनाच्या साधनाची मालकी असल्याने अर्थिक दृष्टया सधन असतो तर दूसरा वर्ग आपले श्रम विकून आपली उपजिवीका भागवतो. यामध्ये पहिला वर्ग दुसऱ्या वर्गाची सतत पिवळणूक करत असल्याने त्यांच्यामध्ये वर्ग संघर्ष हा नेहमीच अस्तित्वात असतो. परिणामी समाज व्यवस्था बदलणे हाच पर्याय आहे असे मार्क्सने म्हणले आहे. असे असले तरी भांडवलशाही ही आजच्या जगात विकासाचा एक प्रभावी मार्ग म्हणून अस्तित्वात आहे हे विसरून चालणार

नाही म्हणून आपण भांडवलवादी विकासाचा मार्ग म्हणजे काय हे थोडक्यात समजून घेणार आहोत.

**भांडवलशाही** (Capitalism)-

भांडवलशाहीचा उदय युरोप मध्ये झाला यामागे इतिहास आहे. कारण, युरोपीयन समाजाची मुल्य आणि प्रमाणके इतर जगापेक्षा वेगळी आहेत. युरोपीयन समाजात व्यक्ती स्वातंत्र्य ही बाब सर्वात महत्वाची मानली असल्याने व्यक्तीला विचाराचे आचाराचे आणि स्वता समाधानी राहण्याचे वास्तविक स्वातंत्र्य अपेक्षित असल्याने, समाजव्यवस्था हा घटक दुय्यम मानला आहे. असे आपणास इतर कोणत्याही अविकसित देशात अढळणार नाही. त्यामुळे युरोपीयन समाजात व्यक्तीस उदारमतवादी विचाराची साथ मिळाल्यामुळे व्यक्ती खाजगी जिवनाला जास्त महत्व देतो. हे अढळते त्या विचारातूनच भांडवलशाही या विचाराचा जन्म झाला म्हणले तर वावगे होणार नाही. कारण व्यक्ती स्वातंत्र्या बरोबरच समाज व्यवस्थेचे उदारमतवादी धोरण व्यक्तीच्या विकासात महत्वाची मदत करत असते. या व्यक्ती समाजहितापेक्षा स्वःहिताला जास्त महत्व देत असल्याने स्वताच्या आपेक्षांची पूर्ती करण्यासाठी युरोपियन व्यक्ती अशा प्रवृत्तीचा स्वीकार करतो. फक्त समाज घातक कार्यवाहीसाठी समाजमान्यता दिली जात नाही एवढेच. व्यवसायात प्रचंड मेहनत करणे, इतराकडून करून घेते, पिळवणूक करणे, प्रचंड पैसा उभारणे त्याचा उपयोग घेणे व समाधान मानने ही वैशिष्टे युरोपीयन उदारमतवादी समाज व्यवस्थेची असल्याने भांडवलशाहीचा उदय यूरोपात झाला आहे. हे स्पष्ट होते. यासाठी आनेक घटक महत्वाचे आहेत हे विसरून चालणार नाही.

युरोपातील ओद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिक भांडवलवाद अस्तित्वाद आला, आणि परिणामी पैसा हे साधन व्यक्तीच्या नवीन शहानपणाचे प्रतिक झाले. त्याच बरोबर व्यक्तीस त्याचे हक्क व विशेषाधिकार जास्त मिळवण्यासाठी पैशाचा वापर हा महत्वाचा ठरू लागला. परिणामी व्यक्तीने जून्या युरोपीयन उदारमतवादी धोरणाचा या काळात स्वीकार केला आणि भांडवलवादी प्रवृत्ती मजबूत होण्याला आणखी मदत मिळाली. थोडक्यात भांडवलशाही मध्ये व्यक्ती स्वातंत्र्य, खाजगी मालमतेचा हक्क, निर्हस्तक्षेपाचे धोरण, उदारमतवाद या घटकांचा समावेश होतो. म्हणजेच व्यक्तीच्या अशा आकांक्षा वाढवण्यासाठी व विकसीत करण्यासाठी भांडवलशाही मध्ये मूळ स्वातंत्र्य मिळते. परंतु या मध्ये समाज विकास ही संकल्पना मृगजळ होते हे विसरून चालणार नाही.

कार्ल मार्क्स या समाजशास्त्रज्ञाने भांडवलशाहीचा अभ्यास वैज्ञानिकपणे केला.त्यांनी आजपर्यंतच्या समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे हे स्पष्ट पणे मांडले. यामध्ये दोन वर्ग महत्वाचे मानले आहेत एक उत्पादनाच्या साधनाची मालकी असणारा एक वर्ग तर ज्याच्याकडे उत्पादनाच्या साधनाची मालकी नाही असा दुसरा वर्ग आहे. यांच्यातील सबंध हे द्वंद्वात्मक असल्याने वर्ग संघर्ष हा अटळ आहे असे स्पष्ट केले आहे. या सर्व प्रक्रियेत वाद-प्रतिवाद-संवाद ही विकासात्मक प्रक्रिया घडून येते व ही प्रक्रिया नवीन समाज व्यवस्थेला जन्म देते, असे ही स्पष्ट केले आहे.

उत्पादनाच्या साधनाच्या मालकी विषयी स्पष्टीकरण देत असताना कार्ल मार्क्स यांनी विधी आचासंहिता, राज्य, धर्म, कला, आणि शिक्षणाची व्यवस्था या सर्व उच्च वर्गांच्या संस्कृतीचे संक्रमण करण्यासाठीच या व्यवस्था आहेत हे स्पष्ट केले आहे. हे मार्क्स यांनी विकासाच्या गतिशिल प्रक्रिये विषयी स्पष्ट केले आहे. मार्क्स यांनी विकासाच्या गतिशिल प्रक्रियेविषयी स्पष्ट करताना असे सांगीतले आहे की,

यामुळे फक्त आदर्शवादी विचार निर्माण केले जातात व वस्तुस्थिती ही काही वेगळीच असते. या बाबतीत वर्ग संघर्ष हा अटळ आहे. आणि त्याचा आदर्श हा 'साम्यवादी जाहिरनामा' आहे.

सध्याच्या परिस्थितीमध्ये अमेरिका हा भांडवलवादी देश जगावर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करत आहे. दहशतवादी हल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आफगणिस्तान आणि नैसर्गिक तेलाच्या मालकीसाठी इराक या देशावर हल्ले करून आपला भांडवलवाद वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे विश्वाची सत्ता मिळवण्यासाठी अनियंत्रीत भांडवलवाद पुढे येत आहे. त्यामुळे अविकसित देश व दारिद्रय रेषेखालील लोक यांच्या जिवनमानावर यांचा नकारात्मक परिणाम होत आहे. अर्थिक एकाधिकारशाही असणाऱ्या कंपन्यामध्ये वाढ होत आहे. त्यांचा मुख्य हेतू हा गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणात त्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. त्यातून मिळणारा माल फक्त नफा मिळवण्यासाठी वापरणे हे त्यांचे तत्व आहे. त्यामुळे छोटे-छोटे उद्योजक वित्त कंपन्या यांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. याचा परिणाम एकाधिकारशाही असणाऱ्या मोठ्या कंपन्या अस्तित्वात येत आहेत. त्यामुळे त्यांची मनमानी वाढण्याची भिती निर्माण झाली आहे. याचाच परिणाम पिळवणूक, अन्याय, इ. मध्ये वाढ होत आहे.

एकाधिकारशाही निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये जागतिकीकरणाखी भूमिका महत्वाची ठरत आहे. यामध्ये प्रामुख्याने बहू राष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार झपाटयाने वाढत आहे. यामुळे माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने साम्राज्वादी देश आपली संस्कृती जगाच्या काना-कोपऱ्यात पोहोंचवित आहेत. या प्रभावी संस्कृतीच्या अनुकरणामुळे अदिवासी, शेतकरी, भटके, गरिब यांच्या जिवनावर नकारात्मक परिणाम होत आहेत. कंपन्याकडून मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे. त्यांचा विरोध मोडण्यासाठी भांडवलवादी शाशन त्यांना त्यांच्या संस्कृतीपासून, सामाजिक जिवनापासून वंचीत करत आहे. यामुळे सहकारावर आधारित समतावादीसमाज अस्तित्वात येणे मृगजळ बनले आहे.

**स्वंय अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress) - **१**

१. भांडवलवादी विचारसरणीचा आधार कोणता?

२. भांडवलवादी विचारसरणीचे महत्वाचे वैशिष्टे कोणते?

३. भांडवली व्यवस्थेत कोणते दोन विसंगत वर्ग अढळतात?

### ४.३.२ विकासाचा समाजवादी मार्ग (Socialist Path of Development) -

उत्पादक वर्गाकडे उत्पादनाची साधने यांची मालकी व नियंत्रण हे सामुहिक असणे म्हणजे समाजवाद होय. म्हणजेच सर्वच कामगार मिळूण उत्पादनाच्या साधनावर सामुहिक मालक असतील. यामुळे खाजगी संपत्ती या संकल्पेनला या मध्ये कोणतेही स्थानद असणार नाही लक्षात घेण्यासारखे आहे. समाजवादी विचाराचा उदय हासुद्धा यूरोपीन देशात झाला आहे. असे असले तरी या विचारचा स्वीकार आणि अमंलबजावणी गैर यूरोपियन देशात झाला असल्याचे दिसून येते. समाजवादी विचारसरणी नुसार भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील नियोजन हे एक प्रकारे अपूर्ण नियोजन असते. या रचनेमध्ये व्यक्तीला दिले जाणारे अर्थिक स्वातंत्र्य, खाजगी मालमत्तेचा हक्क, नफ्याचा प्रबळ हेतू इ. वैशिष्ट्यामुळे भांडवलशाही मध्ये खऱ्या अर्थाने व पूर्णपणे नियोजनाचा अवलंब शक्य नाही. विकासाचे नियोजन यशस्वी होण्यासाठी आवश्यक अशी चौकट

किंवा प्रारूप भांडवलशाहीचे विरूधी टोक असलेल्या समाजवादाने उपलब्ध करून दिले आहे.

**समाजवादात नियोजनाची अपरिहार्यता** (Invitability of Planning in Socialism)-

समाजवाद आणि अर्थिक नियोजन एकच आहेत की भिन्न याविषयी अर्थशास्त्रज्ञामध्ये बराच मतभेद दिसून येतो. काही अर्थशास्त्रज्ञानी सैद्धातिक आधारावरच या दोन कल्पनांना भिन्न मानले आहे. पण प्रत्यक्षात मात्र त्यात फारसा फरक अढळत नाही. काही विचारवंताच्या मते या दोन कल्पनामधील साम्य मान्य करूनही त्यांच्यातील मूलभूत फरक विसरता येत नाही. परंतु शेवटी व्यापक अर्थाने विचार करता समाजवाद व नियोजन सारखेच असल्याचे काही विचारवंतानी मान्य केले आहे. डाल्टानने सुद्धा 'अनियोजित समाजवाद' हा सैद्धातिकदृष्ट्या शक्य आहे असे म्हटले असले तरी शेवटी मात्र त्यानी हे सुद्धा स्पष्ट केले आहे की समाजवादाच्या तत्वानुसार उत्पदनाची साधने क्रियाशील करण्याची जबाबदारी राज्याची असल्याने अनियोजित समाजवादातही नियोजन अपरिहार्य ठरेल. समाजवादी विचार धारेचे सर्वात महत्वाचे तत्व म्हणजे उत्पादनाच्या सर्व प्राथमिक साधनांची मालकी ही राज्याकडे (State) असणे गरजेचे आहे. ज्यामध्ये सर्व जमीनीचे राष्ट्रीयकरण होणे गरजेचे आहे. जमीन शासनाच्या मालकीची झाल्यानंतर त्यासाठी लागणारे कामगार ठेऊन बाकी सर्व कामगार इतर व्यवसायाकडे वळवणे ही गरजेचे आहे. थोडक्यात महत्वाच्या उत्पादक गोष्टीची मालकी समाजाकडे असणे अपेक्षीत आहे.

**समाजवादी नियोजनाचे स्वरूप** (Nature of Socialist Planning)-

१९१७ मधील बोल्शेविक क्रांतीनंतर सोविएत संघात समाजवादी नियोजन अस्तित्वात आले. पुढे पूर्व युरोपीय देशात याचा स्वीकार करण्यात आला. समाजवादी देशातील तत्कालीन नियोजन आणि आजची परिस्थिती यात मात्र बराच फरक पडला आहे. उत्पादनाच्या साधनावर सामाजिक मालकी शासनाचे प्रभावी नियंत्रण अशी वैशिष्टे जाऊन त्याजागी आता खाजगीकरण, स्पर्धा, बाजार यंत्रनेला वाव व व्यक्तीगत नफा यासारख्या भांडवलशाही तत्वांच्या शिरकाव झाला आहे. १९९० नंतरच्या पुनर्रचनेच्या काळात हे बदल वेगाने घडून आले आहेत. अर्थात सध्या समाजवादी नियोजनाचे स्वरूप स्थित्यंतरावथ्येतून जाते आहे. खालील भागात जे स्वरूप स्पष्ट केले आहे ते पूर्वीच्या रचने नुसार अस्तित्वात होते ते मांडले आहे.

**विकासाच्या समाजवादी मार्गातील नियोजन पद्धती** (Planning Method of Socialist Path in Development)-

**१) उत्पादन प्रक्रिया** (Production Process)-

समाजवादी व्यवस्थेमध्ये केंद्रिय सतेला कशाचे उत्पादन करायचे यावर सखोल विचारकरून निर्णय घ्यावे लागतात, व त्यासाठी नियोजनाची यंत्रना उपयोगात आणली जाते हे निर्णय विविध क्षेत्राबाबत असतात. उदा- समाजवादी प्रारूपाच्या उद्देशाप्रमाणे कोणत्या उद्योगांना प्राधान्य द्यावे, त्यामध्ये उपभोग, पुढील औद्योगीक विकास, संरक्षणाची गरज इ. दृष्टीना उदयोगाचे स्थान काय असावे या तऱ्हेचे निर्णय केंद्रिय सत्ता घेते. एकदा निर्णयाची निश्चिती झाल्यानंतर अनेक अधिकारी व श्रमिकांद्वारे त्याची अमलबजावणी करण्यात येते वरवर पाहाता हे काम सोपे वाटत असले तरी प्रत्यक्षात अतिशय गुंतागुतीचे असते. अर्थात त्यासाठी प्रत्येक वर्षी नव्याने सुरूवात करण्याची गरज नसते. त्यासाठी मागील वर्षे हे आधार म्हणून गरज असते.

त्यासाठी मागील वर्षे हे आधार म्हणून निवडण्यात येते.

थोडक्यात योजनेची आखनी; योजनेची अमलबजावणी सक्षमपणे करणे यासाठी भरीव तरतुद असते. व त्याच बरोबर योजनेचे मुल्यमापन वस्तुनिष्ठ पद्धतीने करण्याची यंत्रणाही अस्तित्वात असते.

### २) **उत्पादनाचे वितरण** (Distribution of Production)-

समाजवादी अर्थव्यवस्थेत व्यक्तीचे उत्पन्न हे कामाचे स्वरूप व प्रमाण यावर अवलंबून असते. म्हणजे समाजवादात सुद्धा उत्पनाची विषमता असते. पण ती भांडवलशाही प्रमाणे अनर्जित उत्पन्न किंवा अवास्तव नफा व शोषणातून उद्‌भवलेली नसते. शास्त्रज्ञ व्यवस्थापक सरकारी अधिकारी या सारख्या वर्गाचे उत्पन्न शारीरीक श्रम करणाऱ्या मजुरांपेक्षा जास्त असते, कारण कामानुसार वेतन हे तत्व येथे लागू असते. परंतु काही सेवा गरिब लोकांना मोफत/ किवां अल्पदराने पुरवल्या जातात. अशा पद्धतीनत वितरणाच्या पैलुकडे लक्ष दिले जाते. त्याच बरोबर विशेष म्हणजे सामान्य उपयोगाच्या वस्तुंची किंमत अतिशय कमी व काही वेळा उत्पादन खर्चापेक्षाही कमी निश्चीत केली जाते अशा वस्तुंच्या किंमती कर आकाराचीद्वारे उच्च पातळीला निश्चित केल्या जातात. अर्थात या मागील हेतू अनावश्क उपभोग कमी करणे, उत्पन्नाचे पुनर्वितरण, हा असतो. अशा पद्धतीने समाजवादी अर्थव्यवस्थेत मूल्यनियंत्रणाचा वापर करून सामान्य लोकांना दिलासा दिला जातो, तर प्रागतिककर आकारणीद्वारे उभारलेल्या पैशातून सामाजिक सेवा उपलब्ध करून उत्पन्नाचे समान वितरण करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थे प्रमाणे जलद विकास की उपयोग हा प्रश्न समाजवादात विशेष महत्वाचा ठरत नाही. वर्तमान उपभोगाचा त्याग व जलद विकासाला प्राधान्य हेच मुख्य सुत्र समाजवादी उपभोगाची प्रवृत्ती दडपते व विकासाच्या गरजांना प्राधान्य देणे हे तत्व समाजवादी विकासाच्या नियोजनात अढळते.

### **स्वंय अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress)– २

१. जगातील सर्वात मोठा समाजवादी देश कोणता होता?

२. समाजवादी विचारसरणीचा जनक कोण?

३. समाजवादी सर्वात महत्वाचे वैशिष्ट्ये कोणते?

### **४.३.३ मिश्र अर्थव्यवस्था : विकासाचा एक मार्ग** (Mixed Economy as a Puth or Development)

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशाला उपयुक्त असे विकासाचे प्रारूप स्वीकारणे हा मोठा प्रश्न तात्कालीन राजकीय पक्षापुढे होता. कारण विकासाचे भांडवलवादी प्रारूप व समाजवादी प्रारूप हे दोन्ही यूरोपीयन देशामध्ये विकसित झाल्याने आपल्या देशाच्या विकासात हे कितपत लागू पडतात हा प्रश्न त्यांच्या समोर होता. या दोन्ही प्रारूपाचे अध्ययन करून चिंतन करून शेवटी भारताने दोन्ही प्रारूपाचे काही महत्वाचे भाग आपल्या विकासाच्या नियोजनासाठी स्वीकारले. म्हणून भारत देशाचे विकासाचे प्रारूप हे मिश्र प्रारूप म्हणून (Mixed Path) ओळखले जाते. थोडक्यात भांडवलशाही व समाजवाद यांचे गुण एकत्रित करून व दोष टाळून अर्थिक विकास साधण्याचा जो मार्ग काही देशांनी स्वीकारला त्यांच्या अर्थिक रचनेला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात. त्या पैकी एक भारत हा देश आहे. हे सर्व १९५० मध्ये स्थापन केलेल्या

भारतीय नियोजन आयोगाचे कार्य आहे. हे नियोजन पंचवार्षीक योजनाद्वारे राबवले जाते.

मिश्र अर्थव्यवस्था ही विचारप्रणाली काही प्रमाणात संदिग्ध आहे. कारण तसे पाहिले तर प्रत्येक विकासाचा मार्ग थोडयाफार प्रमाणात मिश्र असतो. अमेरिका हा देश भांडवलवादी देश म्हणून ओळखला जातो. परंतु तेथे सुद्धा मर्यादित प्रमाणात का हाईना सरकारी हस्तक्षेप मान्य झाला आहे. हीच गोष्ट रशियाच्या समाजवादाची आहे. म्हणजे पूर्ण समाजवादी किंवा भांडवलवादी विकासाचे मार्ग हे केवळ आता दिखाऊपणा राहिलेला आहे. कारण, कोणताही एकच विकासाचा मार्ग शुद्ध स्वरूपात अस्तित्वात दिसून येत नाही. म्हणूनच प्रत्येक अर्थव्यवस्था थोडयाफार प्रमाणात मिश्र स्वरूपाची असते हे विसरून चालणार नाही. जेव्हा आपण ङ्गविकासाचा मिश्र मार्गफ असे एखादया विकासाच्या मार्गाचा उलेख करतो, तेव्हा त्याचा अर्थ असा की त्या रचनेत या दोन विकासाच्या मार्गाचा मध्य काढण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या अर्थाने भारताने विकासाचा मिश्र मार्ग अवलंबिला आहे. भारताने १९४८ च्या औद्योगिक धोरणापासून अधिकृतपणे मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. विकासाच्या मिश्र मार्गाचे काही ठळक वैशिष्टे आहेत जे समाजवादी आणि भांडवलशाही मार्गापेक्षा वेगळी आहेत हे विसरून चालणार नाही. यामध्ये प्रामुख्याने क्षेत्राचे सहअस्तित्व हे महत्वाचे वैशिष्टे आहे. यामध्ये प्रामुख्याने वस्तु व क्षेत्र यांचे सहअस्तित्व दिसून येते. त्याच बरोबर प्रेरणांचा सहभाग जितका जास्त व स्वंयपूर्ण असेल तेवढा विकास जलद होतो. याच दृष्टीने अर्थव्यवस्थेत खाजगी संघटकांच्या उत्पादन विषयक प्रेरणा जागृत ठेवणे गरजेचे असते याची जाणीव असणे गरजेचे असते. त्याच बरोबर सर्वात महत्वाची बाब म्हणजे समाजहितांची जाणीव असणे म्हणजे अर्थिक दृष्टया दुर्लक्षित क्षेत्रांना योग्य असा वित्तपुरवढा करणे व समाजहिताला पुरक असे धोरण राबवणे होय.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळखंडात भारताचा औद्योगिक विकास फारसा झालेला नव्हता. नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असलेल्या भारताचा औद्योगिक होऊ नये. अशी जाणीव पुर्वक भुमिका त्या वेळच्या ब्रिटीश शासन व्यवस्थेने केली होती. कारण त्यांच्या वसाहतवादी व्यवस्थेला भारत ही एक मोठी बाजारपेठ होती. म्हणून त्यांनी उद्योगधंद्याचा विकास केलेला नव्हता. त्यामुळे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर औद्योगिक विकासाला कशा प्रकारे चालना द्यावयाची या संबंधी उलट-सुलट विचार प्रक्रियेला सुरूवात झाली. काही अभ्यासकांनी उद्योगधंद्याचा विकास पूर्णता सरकारी क्षेत्रा अंतर्गत सुरू करावेत असे मत मांडले, तर काही अभ्यासकांनी मुक्त अर्थ व्यवस्थेचा स्वीकार करून उद्योगधंद्याचा विकास खाजगी करणाच्या माध्यमातून करवून घ्यावा असा एक विचार पुढे आला व शेवटी या दोन पर्यायांच्या मधला सुवर्णमध्य म्हणजे मिश्र अर्थ-व्यवस्थेचा स्वीकार करावयाचा का? असा पर्याय पुढे आला. थोडक्यात औद्योगिकरणाचे तत्त्वज्ञान व अमलबजावणीचा तपशील या गोष्टी औद्योगिक वाढीची दिशा, स्वरूप आणि वेग ठरवितात.

- **मिश्र अर्थ व्यवस्था स्वीकारण्याचा भारतीय समाजाचा निर्णय :**

देशात व्यापक स्वरूपाचा औद्योगिक विकास घडवून आणावयाचा निर्णय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच झाला. उद्योगांचे खाजगीकरण करण्यामध्ये काही अडचणी होत्या. देशात चांगल्या प्रतीच्या उद्योजकांची कमतरता होती. उद्योजकाच्या मध्ये औद्योगिक विकासाच्या वाढीची जबाबदारी पेलण्यामध्ये असमर्थतता होती. तसचे संपूर्ण खाजगी क्षेत्रावर औद्योगिक विकासाची जबाबदारी दिल्यास, अर्थिक व सामाजिक न्याय साधता येणार नाही. याला पर्याय म्हणून सार्वजनिक क्षेत्राचा पर्याय पुढे आला. जर

समाजवादी अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून अर्थिक विकास करावयाचे झाले तर त्यामध्ये काही अडचणी होत्या. त्यामध्ये सरकारजवळ उद्योग उभारणीसाठीचे पुरेसे भांडवल उपलब्ध नव्हते.

अशा परिस्थितीमध्ये खाजगी क्षेत्र (Private Sector) आणि सार्वजनिक क्षेत्र (Public Sector) या दोन्हीचा परस्पर विरोधी विचार न करता संयुक्तिकरित्या जो विचार केला गेला तिला मिश्र अर्थ व्यवस्था म्हणतात. त्यावेळी भारतातील अर्थिक विकास घडवून आणण्याचे एक साधन म्हणून खाजगी भांडवलशाही आणि राज्य समाजवाद या दोन्हीच्या मधील एक पर्याय म्हणून मिश्र अर्थ व्यवस्थेचा (Mixed Economy) चा मार्ग स्वीकारला त्यावेळी त्यामध्ये खालील घटकांना विशेष स्थान देण्यात आले होते.

१) खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्या परस्पर सहाकार्यातून दोन्ही क्षेत्र परस्परांना उपयुक्त ठरतील.

२) मिश्र अर्थ व्यवस्थेमध्ये खाजगी उद्योग धंद्याचा उपयोग, सामाजिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठीच करून घेता येईल व जे खाजगी उद्योग सामाजिक उद्दिष्टांची पूर्तता अधिक चांगल्या प्रकारे करतील त्यांना विशेष प्रोत्साहान दिले जाईल.

३) खाजगी उद्योगांना अधिक संधी मिळवून दिल्यास, खाजगी उद्योजकांना प्रोत्साहान मिळून उद्योगांच्या विकेंद्रीकरणास चालना मिळेल.

४) खाजगी क्षेत्रासोबतच सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या उद्योगांचा देखील विकास होता राहिल. सार्वजनिक क्षेत्रा अंतर्गत उद्योगांनी औद्योगिक विकासाला चालना देत असताना, खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भांडवलच्या गुंतवणुकीची रचना निश्चित करावयाची आहे. अशा प्रकारे मिश्र अर्थ व्यवस्था सार्वजनिक क्षेत्रांच्या मार्गदर्शनाखाली काम करेल.

- **औद्योगिक विकासा संबंधीचे धोरण** (Industrial Policy) **:**

भारत सरकारने १९४८ पासून ते १९८० पर्यंत वारंवार औद्योगिक विकासा संदर्भात कांही धोरणे अमलात आणली.

**१) १९४८ चे औद्योगिक धोरण :**

स्वांतत्र्य प्राप्तीनंतर सरकारचे औद्योगिक क्षेत्राविषयी कोणत्या स्वरूपाचे औद्योगिक धोरण राहील या विषयी ६ एप्रिल १९४८ रोजी निर्णय घेतला, त्यानुसार भारतातील औद्योगिक विकासाचे चार प्रकारात वर्गीकरण करण्यात आले.

**अ) सर्वस्वी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग :**

संरक्षण साहित्याचे उत्पादन, अणुशक्ती, रेल्वे यांचा त्या मध्ये समावेश करण्यात आला.

**ब) सार्वजनिक क्षेत्रांच्या मर्यादेतील उद्योग :**

कोळसा, लोखंड, पोलाद, विमान वाहतूक, संदशेवहन खनिज तेल इ. क्षेत्रातील खाजगी उद्योग १० वर्षांनंतर राष्ट्रीय करणामुळे सरकारी मालकीचे होतील. नविन उद्योग माल सरकारी मालकीचे रहातील.

**क) नियंत्रणा खालील खाजगी क्षेत्र :**

साखर, कापड, सिमेंट, कागद २० उद्योगात खाजगी क्षेत्राना परवानगी देण्यात आली होती. परंतू त्याचे नियमन मात्र सार्वजनिक क्षेत्राकडून होईल व खाजगी क्षेत्राची कामगिरी योग्य नसल्यास सार्वजनिक क्षेत्रासाठी हे उद्योग खुले रहातील.

**२) लघु व कुटिर उद्योग :**

हे उद्योग खाजगी क्षेत्रातच रहातील व सहकारी प्रयत्नांना प्रोत्साहन दिले जाईल.

३) कामगार आणि मालक यांच्यातील संबंध योग्य असतील तरच उत्पादन वाढीला त्याचा उपयोग होईल त्यासाठी कामगारांना योग्य वेतन, नफा आणि औद्योगिक बाबीत सहाभार व्हावा म्हणून उपाय योजना केल्या जातील.

४) औद्योगिक वाढीसाठी विदेशी भांडवल मिळवत असताना भारताचे हित संबंध सुरक्षित रहातील या दृष्टीने प्रयत्न केला जाईल.

**२) औद्योगिक विकास नियमन कायदा १९५१ :**

खाजगी क्षेत्रातील उद्योगांचे नियमन ककरण्यासाठी १९५१ चा कायदा करण्यात आला. त्यानुसार खाजगी उद्योगांना सरकार कडून परवाना घ्यावा लागेल. या कायद्याचा दुरूपयोग करून बड्या उद्योग पतीनी औद्योगिक क्षेत्रात मक्तेदारी निर्माण केली. त्यानंतर १९५६ ला औद्योगिक धोरणाचा ठराव केला. तसेच १९७३ आणि १९७७ साली वेळोवेळी औद्योगिक धोरण तयार करून भारताचा औद्योगिक विकासाबाबत निर्णय घेण्यात आले.

मिश्र अर्थ व्यवस्थे अंतर्गत वेगवेगळ्या राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो ख्रिश्चन लोकमतवादी, सामाजिक मतवादी, डाव्या, उजव्या विचार सरणीच्या व्यक्ती मिश्र अर्थ व्यवस्थेचा पुरस्कार करतात. थोडक्यात मिश्र अर्थ व्यवस्था भांडवलवाद आणि समाजवाद यांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न करते.

- **मिश्र अर्थ व्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) बाजार पेठांच्या मध्ये असणाऱ्या दबावतंत्राचे सरकारकडून निरक्षण होत असते.

२) सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र यांचे एकत्रिकरण झालेले असते.

३) सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील कार्यांचे क्षेत्र निश्चित केलेले असते.

४) सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे शत्रूत्व नसते.

- **मिश्र अर्थ व्यवस्थेचे फायदे :**

१) मिश्र अर्थ व्यवस्थेमधील उत्पन्नामध्ये फारच कमी तफावत आढळते व शासनाकडून नियंत्रणाचे कार्य केले जाते.

२) उद्योग निवडीचे स्वातंत्र्य असलेतरी शासनाकडून उद्योग कोणत्या स्वरूपाचा आहे या बाबत चौकशी केली जाते.

- **मिश्र अर्थ व्यवस्थेचे तोटे :**

खाजगी आणि सार्वजनिक उद्योग यांच्यामधील कार्याबाबत निश्चित असे क्षेत्र नसल्याने त्यांच्यामध्ये परस्पर फेरफार होत असतो. मिश्र अर्थ व्यवस्था कालांतराने सरकारी अधिपत्याखाली येत असल्याने व्यक्तींना गौण स्थान मिळत जाते. त्यामुळे अनेकांच्या मते या दोन्हींच्या मध्ये निश्चित अशा स्वरूपाची तरतूद असली पाहिजे.

अशाप्रकारे मिश्र अर्थ व्यवस्थेचा आधार घेवून भारतामध्ये औद्योगिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न स्वातंत्र्य कालखंडा पासून सुरू असला तरी, नंतरच्या काळात भारताचा विकास करण्यासाठी १९९१ साली अर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर मिश्र अर्थ व्यवस्थेचे महत्त्व कमी होत गेलेले दिसते.

**४.३.४ महात्मा गांधींचा विकाससंबंधीचा दृष्टीकोन** (M. Gandhi's Path of Development)

सप्टेंबर २००० मध्ये युनायटेड नेशन या संस्थेने अनेक वर्षापासून त्यांची असणारी ध्येये (विकाससंबंधी) मांडली त्यामध्ये 'अति दारिद्र्य आणि भूख बळीचे निर्मूलन, सार्वत्रिक स्वरूपाचे प्राथमिक शिक्षण, स्त्री-पुरूष समानता आणि महिला सबलीकरण; बालमृत्यूदर प्रसूतीधारक महिलांच्या आरोग्य, एड्स विरोधी लढा, मलेरिया आणि इतर रोग, शाश्वत पर्यावरणाची हमी इ. विकासाबद्दल ज्या वेळी विचार केला जाते. त्यावेळी यासंबंधी म. गांधींचे विचार महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांच्या एकूण जीवन कालखंडामध्ये ते सातत्याने काम करत राहिले त्यांचा विचारांचा केवळ इंग्लंड, भारत, आफ्रिका अशा देशांनाच फायदा झाला नाही तर त्यांच्या विचारांचा उपयोग संपूर्ण विश्वाला झाला. त्यांच्या सत्याच्या प्रयोगामुळे संपूर्ण विश्व प्रभावीत झाले होते.

शहरांची वाढती प्रगती, उर्जेचा वापर, नागरीकरण इ. मधून जरी प्रगती झाली असली तरी, किती तरी असंख्य दारिद्र्य लोकांच्या समस्या दिसून येतात. आर्थिक विषमतेमुळे दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच विकसित आणि बलाढ्य राष्ट्रे अविकसीत देशांवर प्रभुत्व निर्माण करून दहशतवादामुळे अनेक निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. गांधीच्या मते आर्थिक बाजारपेठांच्या पेक्षा मानवी मूल्ये चांगल्या प्रकारे मानवाचे संरक्षण करतात.

**गांधींच्या विकासाला मानवी विकासाचा चेहरा होता** (Human face of development)

गांधींच्या विकासाची काही प्रमुख वैशिष्ट्ये

१) मानवी विकासामध्ये मूल्याचा विकास

२) कुशल आणि श्रम करणाऱ्या कामगारांच्याद्वारे विकास

३) विकासामध्ये सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि स्वातंत्र्य

४) ग्रामीण विकासाद्वारे स्वयंपूर्ण खेड्यांची संकल्पना.

५) रोजगार निर्मितीमधून दारिद्र्य निर्मूलन

गांधींच्या मते मानवाचा अधिक विकास महत्त्वाचा नसून त्याच्या शरीर मन आणि आत्मा यांचे संतुलन झाले पाहिजे. आर्थिक विकासापेक्षा मानवाला समानता, स्वातंत्र्य आणि सन्मान मिळाला पाहिजे.

महात्मा गांधीनी ज्या घटकांना विकासामध्ये महत्त्व दिले त्यामध्ये

१) विकेंद्रीकरणाचे तत्त्व

२) समुदाय विकास योजना

३) स्वयंपूर्णता, हस्तकला, ग्रामीण विकास, स्वयंपूर्ण अर्थ व्यवस्था की ज्यामध्ये तांत्रिक आणि भांडवल कमी प्रमाणात असेल.

गांधींच्या मते निसर्गातील साधन संपत्ती आपल्या गरजा पूर्ण होण्याइतपत असते. त्यातून सर्वच गरजांची पूर्तता होत नसते. गांधींच्या मते, समाज आणि व्यक्ती यांचा एकत्रित विकास आवश्यक आहे. म. गांधींच्या 'सर्वोदया'च्या विचारातून केवळ आर्थिक विकासाला महत्त्व दिले नसून व्यक्ती आणि समाज यांच्या एकत्रित विकासाला महत्त्व दिले आहे. गांधींनी व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीगत, सवयी मान्य केल्या आहेत. त्यामुळे खेड्यांचा विकास खेड्यांच्यावर अवलंबून नसून सर्वच खेड्यांनी एकत्रित कार्य केल्यास ती स्वयंपूर्ण होऊ शकतात.

गांधींची मानवी जीवनाबद्दल व्यापक कल्पना होती. मानवाचा सर्वांगिन विकास हे त्यांचे मूळ तत्त्व होते. त्यांच्या मते समाजातील व्यक्तीकडे आपल्या गरजा पूर्ण होतील इतपतच संपत्ती असावी अन्यथा आर्थिक विषमता निर्माण होऊ शकते. समाजाच्या विकास होण्यासाठी मुख्यता सत्य, अहिंसा आणि गरजेपेक्षा अधिक संपत्तीचा साठा टाळणे आवश्यक आहे.

महात्मा गांधींच्या विकास दृष्टीकोणाचा आणखी एक पैलू म्हणजे Trusteeship किंवा (विश्वस्तनिधी)ची संकल्पना ज्यामध्ये समाज विकासासाठी एकत्रितरित्या कार्य करणे. त्यांच्या मते व्यक्ती आपल्या मर्जीप्रमाणे आर्थिक व्यवहार करू शकणार नाही. विश्वस्त निधीच्या कल्पनेतून, मालमत्ता अथवा भांडवलावर सर्वांची समान मालकी, भांडवलदार-कामगार एकत्रित स्वरूपात, सामुहिक भांडवल, काही मोजक्या लोकांच्या हाती आर्थिक अधिकार रहात नाहीत. तसेच त्यांनी मोठ्या स्वरूपाच्या तांत्रिक मशिनचा उपयोग टाळून खादी कपडा निर्माण करण्यासाठी चरख्यासारखे साधे यंत्र उपयोगत आणले.

महात्मा गांधींच्या मते, ग्रामीण भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे खेड्यातील दारिद्र्य बेरोजगारी व अन्य इतर समस्या सोडवण्यासाठी स्वयंपूर्णता आणि स्वयंशासन उपयोगाचे आहे. त्यांच्या मते युरोपखंडातील भांडवलशाहीची कल्पना भारतामध्ये उपयोगाची नाही. म्हणून त्यांनी मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊन ज्यामुळे मानवाचे अमानवीकरण होते. अशा पाश्चात्त्य भांडवलशाहीला त्यांनी विरोध केलेला दिसतो. पाश्चात्त भांडवलशाही मधून निर्माण होणाऱ्या चंगळवादी प्रवृत्तीला त्यांनी विरोध केला होता.

पर्यावरण आणि विकास संबंधी गांधी यांनी विचार स्पष्ट करताना विकासामुळे पर्यावरणाचा आणि साधन संपत्तीचा विनाश होतो. त्यामुळे मोठे उद्योग, धरणे व अन्य इतर विकास प्रक्रियेतून पाणी प्रदूषण, जमिनीचे प्रदूषण, जंगलतोड, नद्यांचे प्रदूषण इ. सारख्या गंभीर समस्या निर्माण होऊन जो पर्यावरणाचा एक संतुलन बिघडतो तो कमी करण्याचा असेल तर अशा प्रकारच्या विकासाचा विचारवंतांनी दुसऱ्यांदा विचार करून

त्याबद्दल निर्णय घ्यावा. या प्रकाराच्या विकासातून जरी मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास होत असला तरी तो एकूण मानवी जीवनाला हानीकारक स्वरूपाचा आहे.

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करून जो औद्योगिक विकास किंवा धरण प्रकल्प उभे केले जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरण विनाश चालू आहे. अशा वेळी अनेकांचे विस्थापन, तसेच जंगलतोड आणि प्रदुषणासारख्या समस्या होत आहेत. नर्मदा प्रकल्पामुळे अनेकांचे विस्थापन होत असताना मानवी हक्क आणि अधिकार नाकारले जात होते. तसेच आजच्या आर्थिक विकासामुळे जे दुष्परिणाम पुढे आले आहेत. त्यामध्ये बेरोजगारीची समस्या प्रामुख्याने आढळते. तसेच मोठ-मोठ्या वित्तीय संस्थांच्या मार्गदर्शनामुळे किंवा निर्णयामुळे अनेक आर्थिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे अशा स्वरूपाच्या आर्थिक विकासाच्या अस्थिरतेमध्ये गांधींच्या विकासाचा दृष्टीकोन उपयुक्त ठरतो. कारण ज्या स्वरूपाचे आज आपण मानवी जीवन जगत आहे. त्यामध्ये विकासाला मानवी चेहरा दिसून येत नाही. आर्थिक विषमता, दारिद्र्य तसेच खेड्यांचे एकूण जीवन विविध समस्यांमध्ये असलेले आढळते.

शेवटी, भारतासारख्या विकसनशील देशाला परकीय भांडवलशाही अर्थव्यवस्थेपेक्षा, स्वदेशी भांडवल, स्वयंपूर्णता आणि स्वयंशासीत मूल्ये विचारात घेऊन म. गांधींच्या विकासाबद्दलचे विचार साकार केले पाहिजेत.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न** (Check Your Progress-4)

१. गांधीच्या मते आर्थिक विकासापेक्षा कशाला सन्मान मिळाला पाहिजे.

२. ग्रामीण भारत हा खेड्यांचा देश आहे असे कोणी म्हटले.

३. आर्थिक विकासाच्या दुष्परीणामामुळे कोणती समस्या निर्माण होते.

## ४.४ सारांश (Let us sum up) :-

जगातील प्रत्येक समाजाची व देशाची विकासाची पार्श्वभूमी व विचारप्रणाली ही सारख्या स्वरूपाची नाही. जगातील विकसित देश हे व्यक्तीवादाचा पुरस्कार करणारे असल्याने त्यांनी विकासाचा भांडवलवादी मार्ग स्वीकारलेला दिसून येतो. कारण व्यक्ती स्वातंत्र्य त्या समाजव्यवस्थेत उदारपणे स्वीकारलेले तत्व आहे. त्यामुळे या देशामध्ये भांडवलशाही हा विकासाचा मार्ग स्वीकारलेला आहे व ते या मार्गाचे समर्थनही करतात. कारण ते व्यवहारीक पातळीवर जास्त भर देतात. म्हणून भांडवलवादी देश जगामध्ये विकसित देश म्हणूनही ओळखले जातात. या देशामध्ये अर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकासही झाला आहे.

विशेषतः पूर्व यूरोपामध्ये विकासाच्या समाजवादी मार्ग स्वीकारण्यात आला पण आज तो व्यवहारीक पातळीवर टिकु शकला नाही. कारण नियोजन करणाऱ्या व्यक्तीनी प्रत्यक्ष स्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. बाजारातील स्थिती ठरवण्यासाठी व्यवहारीक धोरण मांडने गरजेचे आहे हेच यावरून सिद्ध झाले आहे. विकासाचा मिश्रित मार्ग ज्या देशांनी (भारत) स्वीकारला आहे त्या देशाची पार्श्वभूमी ही इतर दोन विकासाचे मार्ग स्वीकारणाऱ्या देशापेक्षा वेगळी आहे हे विसरून चालणार नाही. आणि आपली स्वतःची पार्श्वभूमी विचारात न घेता इतर देश विकासाचा मार्ग सांगतील त्या प्रमाणे नियोजन केल्यास त्याचा आपणास उपयोग होणार नाही हे लक्षात घेणे गरजेचे आहे भारताने स्वीकारलेल्या मिश्र मार्गाचे मुल्यमापन होणे गरजेचे आहे

कारण आजही भारताच्या विकासाची स्थिती (सामाजिक-अर्थिक) पाहीजे तेवढी सुधारलेली नाही. पर्यायाने सामाजिक विषमता वाढत आहे. त्यामुळे समन्याची विकास घडवून आणण्यासाठी सर्व समावेशक धोरणाची गरज आहे.

## ४.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress):-

### स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे

१. भांडवलवादी विचारसरणीचा आधार व्यक्तीस्वातंत्र्य आणि उदारमतवादी धोरण हे आहे.

२. भांडवलवादी विचारसरणीचे महत्वाचे वैशिष्टे म्हणजे खाजगी संपत्ती जमवण्याचा अधिकार हे होय.

३. भांडवली व्यवस्थेत मालक (कारखानदार) आणि श्रमीक हे दोन वर्ग अढळतात. यालाच आहेरे आणि नाहीरे या नावानेही ओळखले जाते.

### स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे

१. रशिया हा जगातील सर्वात मोठा समाजवादी देश होता.

२. समाजवादी विचारसरणीचा जनक कार्ल मार्क्स होय.

३. समाजवादाचे सर्वात महत्वाचे वैशिष्टये म्हणजे उत्पादनाच्या साधनाची सामुहिक मालकी हे होय.

### स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे

१. भारताने विकासाचा मिश्रमार्ग स्वीकारला आहे.

२. अमेरिका आणि ब्रिटन हे भांडवलवादी देश आहेत.

३. भारतीय नियोजन आयोगाची स्थापना १९५० मध्ये झाली.

### स्वयं अध्ययन प्रश्न ४ ची उत्तरे

१. गांधींजींच्या मते आर्थिक विकासापेक्षा मानवाला समानता, स्वातंत्र्याचा सन्मान मिळाला पाहिजे.

२. ग्रामीण भारत ही खेड्यांचा देश आहे असे महात्मा गांधींनी म्हटले.

३. आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनामुळे बेरोजगारीची प्रामुख्याने समस्या निर्माण होते.

## ४.६ अधिक वाचनासाठीची पुस्तके (Suggested Readings) :–


1) John Rapley ( 2002) :- Understanding Development : Theory and Practice in the third world. Lynne Rienner, Publications, Boulder London.

2) Javed Ali ( 1999) :- Development and Social Order : A World Prspective, Anmol Publications, New Delhi.

३) विजय कविमंडल (१९९८) :- विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

4) P.N.Fedoseyev (1983) :- Scientific Communism, Progress Publishers, Moscow.

5) Marx & Engels (2010) :- The Holy Family, or Critique of Critical Criticism.

6) S.K.Sharma (2011) :- “New Political Framwork For Peaceful Co-existence and Jast World : A Marxiam Critique”. (Joint Dereetor, Indian Institete of Marxist Theory and Practice) Habli.

7) Marx Karl (2010) :- A Contribution to the Critique of Political Economy. Peoples Publishing House (P) Ltd.

8) Dr. Ravindra Joshi, ‘विकसनशील भारत’ अजब पुस्तकालय, कोल्हापूर. जाने-१९८१

9) Sheobahal Singh : Sociology of Development, Rawat Publications 2010.

❑❑❑